




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार ३० सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०







## आज शेवटचा माणूस खरंच सुखी आहे का?

# समाजातील शेवटच्या माणसाचा विचार केंद्रस्थानी असला पाहिजे-मोहन भागवत



**यवतमाळ/प्रतिनिधी :** : देशात विकास होत असला तरी त्याचा लाभ समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचत नसेल, तर त्या विकासाचा विचार पुन्हा करण्याची गरज आहे. जगातील सर्वांना सुखी ठेवायचे असेल तर देश सुखी असला पाहिजे आणि देशातील माणूस सुखी असला पाहिजे. त्यामुळे विकासाची दिशा ठरविताना समाजातील शेवटच्या माणसाचा विचार केंद्रस्थानी असला पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी आज मंगळवारी यवतमाळ येथे केले.

**अंत्योदय हे जगण्याचे तत्व-** पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यवतमाळमधील दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या कार्याला यंदा तीन दशके पूर्ण झाली आहेत. पारधी समाजातील विद्यार्थ्यांसाठी १९९७ मध्ये विवेकानंद छात्रावासाच्या माध्यमातून सुरू झालेला सेवाप्रवास पुढे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन आणि कमी खर्चातील जैविक शेतीच्या प्रयोगांपर्यंत विस्तारला आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी अंत्योदय हे तत्त्व मांडले. पूर्वी देशात गरीब माणसाला कसेबसे पोटभर अन्न मिळत होते, मात्र ते आनंदी आणि सुखी असायचे. आता मात्र पोटभर अन्न मिळते, पण आज शेवटचा माणूस खरंच सुखी आहे का? विकासाची प्रक्रिया पुढे नेताना शेवटच्या माणसाचे जीवन अंतर्बाह्य समृद्ध आणि शुद्ध कसे होईल, याचा विचार झाला पाहिजे, असे भागवत म्हणाले. देशातील पहिला माणूस आणि शेवटला माणूस यांच्यातील दरी मिटली पाहिजे, असे ते म्हणाले.

**शेती जगाच्या कल्याणाचे कर्तव्य-** शेतीकडे केवळ उत्पादनाचे साधन म्हणून पाहता कामा नये, असे सांगताना त्यांनी शेतक-यांच्या शेतीविषयक भूमिकेवरही भाष्य केले. शेतकरी शेतीला केवळ व्यवसाय म्हणून नव्हे, तर जगाच्या कल्याणासाठीचे कर्तव्य म्हणून पाहतो. हीच भूमिका एकात्म मानववादाच्या विचाराशी जोडलेली आहे, असे त्यांनी सांगितले. रासायनिक शेतीमुळे उत्पादन वाढू शकते; मात्र त्यातून निर्माण होणा-या परिणामांचा विचार करणेही आवश्यक आहे. त्यामुळे सेंद्रिय शेती, मिश्र शेती आणि पशुपालक शेतीला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. शेतीसाठी आवश्यक खत शेतक-याला शक्य तितके स्वतःच्या शेतात आणि घरच्या साधनांतून तयार करता आले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

**सेवाकार्यातून कृतीयुक्त काम-** दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या कार्याचा उल्लेख करताना भागवत यांनी सरकारवर पूर्णपणे अवलंबून न राहता समाजाच्या विश्वासावर प्रकल्प उभे करण्याच्या कार्याचे कौतुक केले. दीनदयालजींची जयंती केवळ कार्यक्रमापुरती मर्यादित न ठेवता त्यांच्या विचारांचे प्रत्यक्ष सेवाकार्यात रूपांतर करण्याचा वस्तुपाठ➪(पान २ वर)

## दुष्काळाच्या झळा;

### शेतक-याने कीटकनाशक प्राशन करून जीवन संपविले

**चंद्रपूर :** दुष्काळ, नापिकी आणि वाढत्या आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर वरोरा तालुक्यातील भटाळा येथील ६३ वर्षीय अल्पभूधारक शेतक-याने कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. चिंधू रामचंद्र बावणे असे मृत शेतक-याचे नाव आहे. चंद्रपूर येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू असताना सोमवारी त्यांचा मृत्यू झाला.बावणे यांच्याकडे अवघी दीड एकर शेती होती. याच अल्पशा शेतीच्या उत्पन्नावर त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून होता. गेल्या शुक्रवारी त्यांनी शिंगाड्याच्या पिकावर फवारणी करण्यासाठी आणलेले कीटकनाशक प्राशन केले. ही बाब कुटुंबीयांच्या निदर्शनास येताच त्यांना तातडीने उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना चंद्रपूरच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून डाक्टरांचे पथक त्यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी प्रयत्नशील होते. मात्र, उपचारादरम्यान सोमवारी त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेने भटाळा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, जिल्ह्यातील काही भागांत दुष्काळसदृश परिस्थिती, नापिकी आणि शेतीशी संबंधित आर्थिक अडचणींचा सामना शेतक-यांना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर बावणे यांच्या आत्महत्येने अल्पभूधारक शेतक-यांच्या वाढत्या संकटाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## जम्मू-काश्मीरच्या कठुआमध्ये CISF जवानाचा सहका-यांवर गोळीबार,

# 4 जवान शहीद

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जम्मू-काश्मीरच्या कठुआ जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. सीआयएसएफच्या (CISF) एका जवानाने आपल्याच सहकारी जवानांवर कथित वादातून हा गोळीबार झाल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेत चार सीआयएसएफ जवानांचा मृत्यू झाला असून यामध्ये एका असिस्टंट कमांडंट अधिका-याचाही समावेश आहे. या



गोळीबार केल्याची घटना घडली आहे. या गोळीबाराच्या घटनेत चार जवान शहीद झाले आहेत. शहीद झालेल्या चार जवानांमध्ये एका अधिका-याचाही समावेश आहे. या घटनेमुळे लष्करी व सुरक्षा यंत्रणेसह संपूर्ण जम्मू-काश्मीरमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

कठुआ जिल्ह्यातील बसोली भागात असलेल्या जलविद्युत प्रकल्पाच्या कॅम्पमध्ये ही गोळीबाराची घटना घडली आहे. या ठिकाणी तैनात असलेल्या सीआयएसएफ जवानांमध्ये झालेल्या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.

वृत्तानुसार, सीआयएसएफ जवानांवर गोळीबार करणा-या जवानाबाबतची अधिक माहिती अद्याप समोर आलेली नाही. ही घटना घडल्यानंतर तात्काळ पोलीस घटनास्थळी पोहोचले असून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. ही घटना मंगळवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास जलविद्युत प्रकल्पाच्या ठिकाणी घडल्याची माहिती सांगितली जात आहे.➪(पान २ वर)

# ‘ईव्हीएम असो वा मतदार यादी, दोन्हींमध्ये फेरफार’-खा.राहूल गांधी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**मुख्य निवडणूक आयुक्तांनी पूर्णपणे समझोता केला असून देशाची निवडणूक प्रणाली ‘फिक्स’ आहे. अलीकडील सर्व निवडणुका बेकायदेशीर आहेत, अशा शब्दात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी



यांनी हल्लाबोल केला. अडीच तासांच्या काँग्रेस कार्यकारिणी समितीच्या बैठकीत राहुल यांनी गंभीर आरोप केले. राहुल म्हणाले की, ‘ईव्हीएम असो वा मतदार यादी, दोन्हींमध्ये फेरफार करण्यात आला आहे. भाजप निवडणुका जिंकण्यासाठी या दोन्हींचा एक रणनीती म्हणून वापर करत आहे.’ बैठकीत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, एसआयआर (SIR) तत्काळ थांबवावा आणि वगळलेली १३ कोटी ३० लाख नावे पुन्हा समाविष्ट करावीत, अशा मागण्यांचे ठराव मंजूर करण्यात आले. या बैठकीत ६८ सदस्य सहभागी झाले होते. काँग्रेसने सांगितले की, त्यांचा पक्ष मतदार यादी आणि निवडणूक प्रक्रियेतील अनियमिततेचे मुद्दे संसदेत उपस्थित करेल आणि आंदोलन करेल.

**ज्ञानेश कुमार हे मोदी सरकारचे बाहुले**

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, ‘मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) ज्ञानेश कुमार हे मोदी सरकारचे बाहुले बनले आहेत. त्यांना तत्काळ हटवले पाहिजे. मोदी सरकारने आपल्या पूर्वजांनी उभारलेला मजबूत लोकशाहीचा पाया पद्धतशीरपणे कमकुवत केला आहे. तरुणांना मतदानापासून रोखण्याचा कट केला आहे. पंतप्रधान मोदींनी तरुणांना मतदानापासून रोखण्याचा कट रचला आहे. फार्म ६➪(पान २ वर)

## मुंबईत मुसळधार

### विमानसेवा विस्कळीत

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात एका बाजुला दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यातील बहुतांश भागात पावसानं दडी मारल्यामुळं शेतक-यांची



पिकं करपून गेली आहे. असं असतानाच सध्या दुसरीकडे मुंबईत मात्र, सध्या वादळी वा-यासह मुसळधार पाउस सुरु आहे. मुंबईच्या पश्चिम उपनगरात सुरु असलेल्या जोरदार पावसामुळे जोगेश्वरी पश्चिम वीरा देसाई रोड पाण्याखाली गेला आहे. वीरा देसाई रोडवर दीड ते दोन फूट पाणी भरले आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी भरल्यामुळे वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. तर या मुशळधार पावसाचा विमान सेवेवर देखील परिणाम झाला आहे. मुंबईतील हवाई सेवा अचानक झालेल्या ➪(पान २ वर)

# भारतीय मुलींची मोठी कामगिरी!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिलांना उल्लेखनिय कामगिरी केली आहे. महिलांच्या ४ × ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक जिंकले आहे. २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताचे हे सहावे सुवर्णपदक होते. सुवर्णपदक विजेत्या भारतीय संघात किरण, मचेत्तिरा पूवम्मा, प्राची आणि विथ्या रामराज यांचा समावेश होता. भारतीय संघाने ही शर्यत ३:२९.६९ मिनिटांत पूर्ण केली.

**बहरीन संघाने या स्पर्धेत दुसरे स्थान पटकावून रौप्यपदक जिंकले**

बहरीन संघाने या स्पर्धेत दुसरे स्थान पटकावून रौप्यपदक जिंकले. बहरीनच्या खेळाडूंनी ३:३०.२१ मिनिटांत शर्यत पूर्ण केली. भारत आणि बहरीन यांच्या वेळेत ०.५२ सेकंदांचे अंतर होते. चीन संघाने तिसरे स्थान पटकावून कांस्यपदक मिळवले. चीनच्या खेळाडूंनी ३:३१.०२ मिनिटांत शर्यत पूर्ण केली. दरम्यान, भारताने आशियाई




क्रीडा स्पर्धेत उत्तम कामगिरी केली आहे. यामध्ये भारतीय महिलांनी उल्लेखनिय कामगिरी केली आहे. भारताला एकूण ६ सुवर्णपदक आत्तापर्यंत मिळाले आहेत.

**ॲथलेटिक्समध्ये भारताचे पहिले सुवर्णपदक-** भारताने क्रिकेट, कबड्डी आणि नेमबाजीमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. आता ॲथलेटिक्समध्येही सुवर्णपदकाची भर पडली आहे. यासह भारताने पदक तालिकेत ५० चा आकडा पार केला आहे.

**वित्या रामराजचे दुसरे पदक-**धावपटू वित्या रामराजचे आशियाई क्रीडा स्पर्धेतील हे दुसरे पदक होते. यापूर्वी तिने ४०० मीटर अडथळा शर्यतीत ➪(पान २ वर)

## *सार्वजनिक ठिकाणी हुक्का बंदी*

**लखनौ /वृत्तसंस्था :** सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करण्यास सक्त मनाई असून, एखाद्या ठिकाणी धूम्रपानासाठी स्वतंत्र क्षेत्र निश्चित केले असले, तरी त्याचा अर्थ रेस्टारंटला तेथे ग्राहकांना हुक्का देण्याची परवानगी मिळते, असा होत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय अलाहाबाद खंडपीठाने मंगळवारी दिला.न्या. शेखर बी. सराफ आणि न्या. अब्धेश कुमार चौधरी यांच्या खंडपीठाने हुक्का बार आणि रेस्टारंट्समधील हुक्का सर्व्हिसशी संबंधित सर्व याचिका फेटाळून लावल्या. उत्तर प्रदेशात हुक्का बार चालवता येणार नाहीत, तसेच रेस्टारंटमधील निर्धारित धूम्रपान क्षेत्रातही ग्राहकांना हुक्का उपलब्ध करून देता येणार नाही, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. रेस्टारंटमधील निर्धारित धूम्रपान क्षेत्रात ग्राहकांना हुक्का उपलब्ध करून देता येतो का, हा या प्रकरणातील प्रमुख प्रश्न होता. न्यायालयाने या प्रश्नाचे उत्तर नाही असे दिले. न्यायालयाने सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने कायदा, २००३ तसेच पबमध्ये धूम्रपान करण्यास मनाई मधील २०१७ मध्ये करण्यात आलेल्या सुधारित नियम ४(३)चा संदर्भ दिला.निर्धारित धूम्रपान क्षेत्रात धूम्रपान करण्यास परवानगी असली, तरी तेथे कोणत्याही प्रकारची सेवा देता येणार नाही, असे न्यायालयाने नमूद केले. सार्वजनिक ठिकाणी सामान्यतः धूम्रपानास बंदी आहे आणि धूम्रपानासाठी निश्चित केलेल्या जागा हा या बंदीचा अपवाद आहेत; मात्र, या अपवादामुळे रेस्टारंटला ग्राहकांना हुक्का सेवा देण्याचा अधिकार मिळत नाही, असे खंडपीठाने स्पष्ट केले. याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला होता की, रेस्टारंट हुक्का तयार करून ग्राहकाला देउ शकते आणि त्यानंतर ग्राहक स्वतः त्याचा वापर करू शकतो. त्यामुळे ही सेल्फ सर्व्हिस मानली जावी. मात्र, उच्च न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावला. हुक्का तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये उपकरणे जोडणे, तंबाखू भरणे, बेसमध्ये पाणी ओतणे, फाइल व गरम कोळसा ठेवणे यांसारख्या गोष्टींचा समावेश होतो. तसेच, वापरदरम्यान कोळसा व तंबाखू बदलणे आणि राख काढणे यांसारख्या कामांसाठी विशिष्ट कौशल्याची गरज असते.

# इंडिया आघाडीची SIR वर आज बैठक, ज्ञानेश कुमार हटाव मोहिमेला आणखी जोर येणार!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इंडिया आघाडीची च्क्ष्ड आणि निवडणूक आयोगातील मतभेदांसंदर्भात विरोधी पक्षांच्या रणनीतीवर उद्या (३० सप्टेंबर) बैठक होणार आहे. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव या बैठकीला उपस्थित राहणार नाहीत. त्यांच्या जागी पक्षाचे दुसरे नेते उपस्थित राहतील. शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे व्हिडिओ कान्फरन्सिंगद्वारे सहभागी होतील. पक्षाचे खासदार संजय राउत यांनी सांगितले की, ४ ऑक्टोबर रोजी ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात होणा-या मोर्चाच्या तयारीत व्यस्त आहे. शिवसेना अभिजित दिपके यांना सुद्धा पाठिंबा देणार असल्याचे राउत यांनी म्हटलं आहे. इंडिया आघाडीची बैठक जवळपास साडेतीन महिन्यांनंतर होत आहे. यापूर्वी ८



जून रोजी झालेल्या बैठकीत २३ पक्ष सहभागी झाले होते. मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, सोनिया गांधी, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, उद्धव ठाकरे, ओमर अब्दुल्ला आणि मेहबूबा मुफ्ती यांच्यासह अनेक प्रमुख नेते उपस्थित होते. डीएमके आणि आम आदमी पार्टी उपस्थित राहिले नाहीत.

**अखिलेश शेतकरी परिषदेला उपस्थित राहणार**

समाजवादी पक्षाने (एसपी) घोषणा केली आहे की, अखिलेश यादव लखनौ येथे होणा-या शेतकरी परिषदेला उपस्थित राहतील. पक्षाच्या म्हणण्यानुसार, अखिलेश यांनी या संदर्भात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याशी चर्चा केली आहे. काँग्रेस सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी सांगितले की, पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे अखिलेश या बैठकीला उपस्थित राहू शकणार नाहीत. राज्यसभा निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज भरण्यात आपण व्यस्त असल्याचे कारण त्यांनी दिले.

**ममता बॅनर्जी आणि तेजस्वी यादव उपस्थित राहण्याची शक्यता**

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी बैठकीला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी आणि खासदार अभिषेक बॅनर्जी हे देखील उपस्थित राहण्याची शक्यता आहे. याव्यतिरिक्त, आरजेडी नेते तेजस्वी यादव, जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि सीपीआय➪(पान २ वर)

## MPSC च्या दोन सदस्यांवर टांगती तलवार, SIT कारवाईची शक्यता

**नागपूर/प्रतिनिधी :**स्पर्धा परीक्षांतील पेपरफुटी थांबवा आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार आणि सचिव महेंद्र हरपाळकर यांचा राजीनामा घेण्याच्या प्रमुख मागणीसाठी राज्यातील हजारो विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परीक्षा पद्धतीत




सुधारणा करण्यासाठी अपर आयुक्त व्ही राधा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. तसेच स्थापन करून परीक्षा पद्धतीतील गैरप्रकारचा तपास केला जाणार आहे. या कमिटीच्या मदतीने काही जणांना अटकही करण्यात आलेली आहे. मात्र यानंतर आयोगातील दोन सदस्यांची चौकशी होणार असल्याची माहिती आहे.

**तीन दिवसांपूर्वी झाली कारवाई-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) औषध निरीक्षक परीक्षा पेपरफुटी प्रकरणात मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत आणखी चार ➪(पान २ वर)

# राज्यात प्रथमच वैरण विकास धोरण लागू

**मुंबई / प्रतिनिधी-** दुष्काळात राज्यातील पशुधनासाठी चा-याची टंचाई निर्माण होउ नये आणि दुग्धव्यवसाय-पशुपालनाला उद्योगाचे स्वरूप मिळावे, यासाठी राज्य सरकारने महाराष्ट्रात प्रथमच वैरण विकास धोरण लागू केले आहे. या निर्णयास मंगळवारी मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून जिल्हानिहाय चारा उत्पादनापासून ते चारा साठवणूक, पर्यायी चारा स्रोत आणि टंचाईग्रस्त भागात पुरवठ्यापर्यंतचे सर्वंकष नियोजन या धोरणातून केले जाणार आहे. तसेच विविध शासकीय वैरण विकास योजनांचे प्रभावी नियोजन आणि अंमलबजावणी करण्यावरही भर देण्यात येणार आहे.

राज्यात यंदाच्या खरीप हंगामात २६५ तालुक्यांमध्ये ट्रिगर-१ लागू झाला आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळ आणि टंचाईच्या काळात पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्यासाठी या धोरणाचा उपयोग होणार आहे. कमी पाण्यात चारा उत्पादन, उपलब्ध चा-याची साठवणूक आणि त्याचा टंचाईग्रस्त भागात पुरवठा यासाठी विविध उपाययोजना केल्या जाणार आहेत. चारा लागवडीचे क्षेत्र वाढविण्यासाठी महसूल आणि वन विभागाच्या शासकीय पडिक, गायरान तसेच मुलकीपड जमिनींचा वापर करण्याचा विचार धोरणात करण्यात आला आहे. कुरण आणि गायरान जमिनींमध्ये सुधारित गवत व द्विदल चा-यांच्या जातींची लागवड केली जाणार आहे.



अल्पकालीन उपाय म्हणून सध्याच्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी कमी पाण्यात चारा उत्पादन वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. उपलब्ध चा-याची टिकवण क्षमता वाढवून तो पुढील काळात टंचाईग्रस्त भागात पोहोचविणे सुलभ केले जाणार आहे. दीर्घकालीन दृष्टीने राज्यात पशुपालन व्यवसायातून उद्योजकता निर्माण करण्याच्या धोरणाला चालना देताना पशुपालकांसाठी अत्यावश्यक असलेल्या चा-याची वर्षभर पुरेशा प्रमाणात उपलब्धता सुनिश्चित करण्याचा प्रयत्न या धोरणातून केला जाणार आहे.

**फळबागांमध्येही चारा लागवड-** फळबागांमध्ये दोन झाडांमधील मोकळ्या जागेत चारा पिकांची लागवड करून हार्टी-पाश्चर पद्धतीने दुहेरी उत्पन्न मिळविण्यास प्रोत्साहन दिले जाणार आहे. तसेच पडिक, खडकाळ आणि डोंगराळ जमिनींवर सुबाभूळ, अंजन, शेवगा यांसारख्या वैरणीला उपयुक्त वृक्षांसोबत बहुवार्षिक गवताची लागवड करण्यासाठी सिल्वी-पाश्चर पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

**बांध, बंधा-यावरही गवत लावणीवर भर-** शेतातील बांध, बंधारे, तलावांचे बांध, परसबागा, जलमार्ग तसेच नापीक आणि मशागतीस अयोग्य जमिनींवर गिनी गवत, सिग्नल गवत आणि स्टायलो गवताची लागवड करण्यावरही भर दिला जाणार आहे.




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
e paper www.janmadhyam.com

# लायन्स क्लब ऑफ अमरावती रिअलची तिसरी क्लब मीटिंग उत्साहात



अमरावती/प्रतिनिधीः-लायन्स क्लब ऑफ अमरावती रिअलची तिसरी क्लब मीटिंग हॉटेल देशी विलायती, कॉटन मार्केट, अमरावती येथे रविवार दिनांक २७ सप्टेंबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्लबचे अध्यक्ष लायन डॉ. दीपक कऱ्हे यांनी उपस्थित सर्व लायन्स सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. त्यानंतर ध्वजवंदना व राष्ट्रगीत झाले. क्लबचे सचिव लायन श्याम जाडीया यांनी सचिवांचा अहवाल सादर केला. तसेच मागील बैठकीतील कामकाज आणि चिखलदरा येथे आयोजित करण्यात आलेल्या संयुक्त पिकनिकचा अहवाल सदस्यांसमोर मांडण्यात आला. यावेळी क्लबच्या आगामी सर्व्हिस वीक बाबत सविस्तर माहिती देण्यात आली. २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर २०२६ दरम्यान विविध सेवाभावी उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. २ ऑक्टोबर २०२६ रोजी जयस्तंभ चौक ते राजकमल चौक येथे लायन्स क्लब तर्फे रीजन रॅली आयोजित करण्यात येणार असून, त्यानंतर ८ ऑक्टोबरपर्यंत विविध सामाजिक व सेवाभावी उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्याचप्रमाणे GAT conclave, तुली इंटरनॅशनल हॉटेल , नागपूर येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमाचा संक्षिप्त वृत्तांत अध्यक्ष डॉ. दीपक कऱ्हे यांनी सांगितला. यावेळी क्लबमध्ये नव्याने सहभागी झालेल्या लायन रितेश अग्रवाल व लायन मनीष अग्रवाल यांचा परिचय करून देण्यात आला. उपस्थित सदस्यांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

या बैठकीस लायन हरीश उदासी, मनोज मिश्रा, संजय विंचूरकर, दिनेश अग्रवाल, सुरेश केवलरामाणी, सुरेंद्र मावळे, संजीव पोटे, लक्ष्मीकांत जोशी, हेमंत पच्चीगर, नितीन टवलारे , सोहेल टापर, जितेंद्र झा, हेमंत वालचाले, प्रकाश आवतरमाणी, शैलेश शिरभाते , चंद्रदत्त मिश्रा यांच्यासह क्लबचे अनेक सदस्य उपस्थित होते. बैठकीतील सर्व विषयांवर सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. शेवटी सचिव लायन श्याम जाडीया यांनी आभार प्रदर्शन केले. अध्यक्ष डॉ. दीपक कऱ्हे यांनी बैठकीची सांगता घोषित केली.

# मुलींनी निभावला मुलांचा धर्म
# आईच्या चितेला दिली मुखाग्नि

अमरावती/प्रतिनिधीः- आजच्या काळात मुली कुठल्याही बाबतीत मुलांपेक्षा कमी नाहीत, हे विधान अमरावतीच्या दोन डॉक्टर मुलींनी खरे ठरवून दाखवले आहे. त्यांनी केवळ दिवंगत आईच्या अर्थीला खांदा दिला नाही, तर श्मशानभूमीत पोहोचून चितेला मुखाग्निही दिली. त्यांनी आदर्श संतान म्हणून तसेच पुत्रधर्मही पूर्णत्वास नेला.

अमरावतीतील संध्या संजय खडसे यांचे अल्प आजाराने अलीकडेच निधन झाले. ही बातमी ऐकताच सर्व नातेवाईक अंतिम दर्शनासाठी दाखल झाले. पुत्र नसल्याने दिवंगत आत्म्याला मुखाग्नि कोण देईल? क्रियाकर्म संबंधी सर्व विधिविधान कोण पूर्ण करेल? असे प्रश्न उपस्थित होत असताना त्यांच्या दोन्ही मुलींनी सर्वांच्या शंकांवर पूर्णविराम ठोकला. दोन्ही मुली डॉ. स्वाती वाटणे (शासकीय वैद्यकीय अधिकारी) आणि डॉ. स्वप्ना निम्भोरकर (इरविन रुग्णालयातील फिजिओथेरपिस्ट) यांनी आईच्या अर्थीला खांदा देण्याबरोबरच चितेला मुखाग्नि देण्याचा निर्णय घेतला. त्यांनी सर्व धार्मिक रीतीरिवाजांचे पालन करून दिवंगत आईला अश्रूंनी ओथंबलेला निरोप दिला. त्याचबरोबर समाजासमोर एक नवीन आदर्शही प्रस्थापित केला. मुलींच्या या कृतीची समाजाच्या सर्व स्तरांतून प्रशंसा होत आहे.



# स्मशानभूमीजवळ तलवार घेऊन फिरणारा तरुण ताब्यात

## राजापेठ पोलिसांची कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः- शहरातील हिंदू स्मशानभूमी परिसरात धारदार तलवार घेऊन फिरणाऱ्या तरुणाला राजापेठ पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याच्याकडून दोन हजार रुपये किमतीची लोखंडी तलवार जप्त केली. सचिन साहेबराव लोखंडे (वय २९, रा. मारोतीनगर, ड्रीमपार्क, आकोली रोड, अमरावती) असे ताब्यात घेतलेल्या तरुणाचे नाव आहे.

सोमवारी दिनांक २८ सप्टेंबर रोजी दुपारी राजापेठ पोलिसांचे पथक परिसरात गस्त घालत होते. त्यावेळी हिंदू स्मशानभूमीजवळील रस्त्यावर एक व्यक्ती धारदार शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती पथकाला मिळाली. माहितीची पडताळणी केल्यानंतर पोलिसांनी पंचांसह घटनास्थळी पोहोचून संबंधित व्यक्तीला ताब्यात घेतले.

झडतीदरम्यान लाल रंगाचे टेप लावलेल्या कव्हरमध्ये लोखंडी धारदार तलवार आढळली. पोलिसांनी पंचांसमक्ष ती जप्त केली. तलवारीची एकूण लांबी ३० इंच असून, पाते २५ इंच आणि मुठ पाच इंच लांबीची आहे. पात्याची रुंदी तीन इंच असल्याचे पोलिसांनी सांगितले. सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना धारदार शस्त्र बाळगल्याप्रकरणी लोखंडे याच्याविरुद्ध कलम ४/२५ आर्म्स अ‍ॅक्ट आणि कलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी शस्त्र बाळगण्यामागील कारणासह प्रकरणाच्या अन्य बाबींची चौकशी सुरू केली आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त शाम घुगे आणि सहायक पोलीस आयुक्त संजय खटाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, सहायक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे आणि पथकाने केली.

पान १ व १० वरून

## विद्यार्थिनीच्या गळयावर चाकूने वार

करण्यात आले. पोलिस अधिकाऱ्यांनी रुग्णालयात जाऊन तिच्या प्रकृतीची माहिती घेतली. तसेच तिचे नातेवाईक आणि घटनेच्या वेळी उपस्थित असलेल्या प्रत्यक्षदर्शींकडून माहिती घेण्यास सुरुवात करण्यात आली आहे. कॉलेज परिसरातील प्रत्यक्षदर्शींचे जबाबही नोंदविले जात आहेत. या प्रकरणाचा तपास पोहेकॉ सुधीर वांजळे, निलेश गुल्हाने, सागर सरवर, सचिन श्रीवास, रितेश चव्हाण, मोहम्मद समीर, वचन पडित, निरज बनारसे यांच्यासह बडनेरा पोलीस ठाण्याचे पथक करत आहे. आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्याकडून घटनेबाबत सविस्तर माहिती घेतली जात आहे. दरम्यान, महाविद्यालयीन परिसरातच विद्यार्थिनीवर झालेल्या या हल्ल्यामुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. काही दिवसांपूर्वी राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रेमसंबंधाच्या वादातून विद्यार्थिनीच्या हत्येची घटना घडली होती. त्यानंतर आता कॉलेज परिसरात विद्यार्थिनीवर चाकूने हल्ला झाल्याने या घटनांकडे गांभीर्याने पाहिले जात आहे

## शिक्षक मतदार संघ निवडणुक

पासून ६ ऑक्टोबर पर्यंत उमेस्वारांना नामनिर्देशनपत्र दाखल करता येणार या कालावधीत रविवारची सुट्टी वगळता नामांकन दाखल करण्यासाठी सात दिवस उपलब्ध राहणार आहेत. त्यानंतर छाननी आणि उमेदवारी माघारीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम उमेदवारांची यादी स्पष्ट होणार आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत उमेदवारांच्या नावांबाबत आणि निवडणुकीच्या तयारीबाबत हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे.निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार मतदान २३ ऑक्टोबर रोजी होणार असून मतमोजणी २७ ऑक्टोबरला होईल. नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत ६ ऑक्टोबर आहे.

अर्ज उचलणाऱ्यांमध्ये अशोक वामन हिवाले ग्राम पांगरी, जि. बुलढाणा -२ , शिवहरी नागोराव बोकडे करजगांव - २,किरण अर्जुन चौधरी कामठवाडा, जि. वाशीम - ३ अ‍ॅड. किरण सरनाईक यांच्यासाठी डॉ. शशांक देशमुख अमरावती यांनी तीन फॉर्म उचलले, दिलीप भीमराव कडू अमरावती - ३, उपेंद्र बाबाराव पाटील धामणी मानोरा, जि. वाशीम - ३, पवन देवराव आपकाजे अमरावती - १, उमाशंकर भगवान भादुले, वाठोडा, नागपूर - १,विद्याधर उर्फ भैय्यासाहेब मधुकर मेटकर अमरावती - २,डॉ. श्रीकांत देशपांडे अमरावती - ३,गजानन गोविंदराव ढोके बुलढाणा - २,गजानन रामचंद्र उल्हे यवतमाळ - ३,प्रा. तपोविन नामदेवराव पाटील अमरावती - ३,प्रा. प्रवीण परशराम शेलोकर अमरावती - ३,सुनील दुर्गादास राठोड यवतमाळ - ३,श्रीकृष्ण पहुरकर अकोला - १,अदिती ऋषिकेश पोहरे अकोला - ३, नितेश बिसनलाल किल्लेदार अमरावती - १,दाउद खाँ तैयब खाँ पुसद, जि. यवतमाळ - १, अभिजीत मुरलीधर देशमुख अमरावती - १ यांचा समावेश आहे.

## डॉक्टरांच्या हलगर्जीपणाने चिमुकलीचा

कारवाईची मागणी केली. तक्रारीची दखल घेत जिल्हा शल्यचिकित्सकांकडून प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन केली. दरम्यान, २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी अहवालातील निष्कर्षांच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई केली. याप्रकरणी धारणी पोलिस ठाण्यात डॉ. चंद्रकांत तमेवार यांच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात पोलिसांनी जिल्हा शल्यचिकित्सकांकडून वैद्यकीय अभिप्राय मागविला होता. संबंधित अहवाल पोलिसांना प्राप्त झाल्यानंतर त्यातील निष्कर्षांच्या आधारे गुन्हा नोंदविण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल राठोड व सहायक पोलीस निरीक्षक संध्या चव्हाण करीत आहेत.

## अन्सार नगरात अगरबत्ती कारखान्यात

आल्याने अग्निशमन दलाला आग विझविण्याच्या कारवाईला अधिक वेग देता आला. अग्निशमन दलाच्या जवानांनी काही काळ अथक प्रयत्न केल्यानंतर आगीवर नियंत्रण मिळविले. आग पूर्णपणे विझविल्यानंतर परिसरात पुन्हा आग भडकू नये, यासाठीही पाहणी करण्यात आली. या आगीत कारखान्यातील अगरबत्ती निर्मितीचे साहित्य आणि अन्य वस्तू जळाल्याने मोठे आर्थिक नुकसान झाल्याची शक्यता आहे. नुकसानीचा नेमका आकडा अद्याप स्पष्ट झालेला नाही. आग लागण्याचे निश्चित कारण आणि नुकसानीचे मूल्य पुढील तपासानंतर स्पष्ट होणार आहे. महापालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावणे यांच्या निर्देशानुसार सहायक आयुक्त नितीन बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशमन दलाने ही कारवाई केली. अग्निशमन अधीक्षक अजय पंधरे यांच्यासह अधिकारी व जवान घटनास्थळी उपस्थित होते. आगीच्या वेळी कारखान्यात कामगारांची उपस्थिती होती का, याबाबतची माहिती स्पष्ट झालेली नाही; मात्र कोणतीही जीवितहानी न झाल्याने मोठा अनर्थ टळला.

## शिक्षक महासंघाचे संस्थापक

भोयर यांनी केला. याशिवाय मागील निवडणुकीत साड्या वाटप आणि बोगस मतदानाच्या जोरावर सरनाईक विजयी झाल्याचा आरोपही त्यांनी केला. भोयर यांच्या या आरोपांमुळे अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातील राजकीय वातावरण तापले असून महायुतीसमोरील आव्हान वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काहीही झालं तरी मी निवडणूक लढणार असं शेखर भोयर यांनी यावेळी स्पष्ट केलं.

## कौटुंबिक वादात अल्पवयीन

त्यावेळी आरोपीने दोघांना धक्का दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. यानंतर आरोपीने अल्पवयीन मुलीसमोर अश्लील वर्तन केल्याचा आरोप आहे. तसेच मुलीला उद्देशून अश्लील स्वरूपाची वक्तव्ये केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकारामुळे मुलीला मानसिक धक्का बसला. मुलीच्या आईने आरोपीच्या वर्तनाला विरोध केला असता त्याने तिच्याशी शिवीगाळ केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. घडलेल्या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर पीडितेच्या जबानीवरून नागपुरी गेट पोलिसांनी प्रकरणाची नोंद केली. आरोपीविरुद्ध ँन्ए कलम ७५(२), २९६ तसेच पोस्को कायद्यातील कलम ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास नागपुरी गेट पोलिसांकडून सुरू आहे.

## मेळघाटातील पाच हजार मुलांकडे

पत्रासाठी खूप वेळ आणि पैसा खर्च करावा लागतो, त्यामुळे ते हैराण होतात आणि त्यांना मानसिक त्रासही सहन करावा लागतो. अचलपूर परिसरात आदिवासी मुलांसाठी आधार कार्ड किटची व्यवस्था करणे आवश्यक आहे, अशी मागणी ललिता बेठेकर यांनी केली. तसेच चिखलदऱ्याचे आधार कार्ड किट निलंबित करण्यात आले असून, ते तात्काळ पूर्ववत सुरू करावे, अशी मागणीही त्यांनी केली. २ ऑक्टोबर गांधी जयंतीची सुट्टी रद्द करून हजारो आदिवासी मुलांचे आधार कार्ड बनवण्यासाठी विशेष शिबीर लावण्यात यावे. गांधी जयंतीनिमित्त एक चांगला उपक्रम राबवला जावा, असे त्यांचे म्हणणे होते.

पत्रकार परिषदेत उपस्थित नेते आणि कार्यकर्त्यांनी मुंबई सावकार अधिनियम १९४६, १९५५ आणि महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ अस्तित्वात असून ही मेळघाटातील आदिवासी लोक सावकारांच्या पाशात अडकत असल्याचा मुद्दा मांडला. या कायद्यांचा मेळघाटात कोणताही उपयोग होत नसून, त्यांच्याकडून ३० ते ३६ टक्के व्याज वसूल केले जाते.त्यांनी गहाण ठेवलेले दागिने परत मिळवण्यासाठी प्रशासन कोणतीही मदत करत नसल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. दुष्काळाच्या गंभीर परिस्थिती कडे लक्ष वेधत शासकीय मदतीची मागणी करण्यात आली. सोबतच शासनाने मक्यासाठी जाहीर केलेला २८१० रुपये दर अनेक दिवसांपासून न मिळाल्याने आणि पैसे न मिळाल्याने त्याची भरपाई देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. पत्रकार परिषदेमध्ये एड. बंड्या साने,सरपंच ललिता बेटेकर, राम दहीकर, राम हिवराळे, गणेश बेलसरे आदि उपस्थित होते.

## १ ऑक्टोबरला गणेश विसर्जन

लेखुमल चौकाकडे वळवण्यात येणार आहे. रेल्वे स्टेशन चौकाकडून येणारी वाहतूक मिरवणूक मालवीय चौक पार करेपर्यंत पूर्णपणे बंद राहणार आहे. गद्रे चौकाकडून येणारी वाहतूक उड्डाणपूल, राजापेठ किंवा गांधी चौकामार्गे, तर हमालपुराकडून येणारी वाहतूक रेल्वे स्टेशन चौक व मर्क्युरी टी पॉइंटमार्गे वळवण्यात येणार आहे. राजकमल चौकाकडून ये-जा करणारी वाहतूक सरोज चौक व चित्रा चौकामार्गे धावेल. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी सर्व हलक्या व जड वाहनांना हे नियम लागू राहतील. नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन अमरावती शहर पोलिसांनी केले आहे.

## मंदिर विश्वस्तांचे राज्यस्तरीय

आणि सेवकांनी मोठ्या संख्येने संमेलनाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. नोंदणीसाठी ९४२३४२५८२०, ८६०००२२९५३, ७४९८३३२९१७, ९८२३३२२१५० आणि ९१२२९१५५६८ या क्रमांका वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र देवस्थान समितीच्या वेबसाईटवर संमेलनासंबंधी माहिती घेण्याची विनंती करण्यात आली आहे.

पत्रकार परिषदेला नागेश्वर महादेव संस्थान धामंत्रीचे अध्यक्ष कैलासकुमार पनपालिया, पिंगळा देवी संस्थान नांदुरा पिंगळाईचे सचिव आशिष मारुडकर, महाराष्ट्र देवस्थान समितीचे निलेश टवलारे, मारुती संस्थान जहाँगीरपूरचे अध्यक्ष ओमप्रकाश परतानी, चंद्रभागेश्वर महादेव संस्थान चांदूर रेल्वेचे अध्यक्ष कैलाश गिरोलकर, रघुनाथ महाराज संस्थानचे अध्यक्ष धनराज वेलणकर, रुक्मिणी जन्मभूमी विदर्भ पीठाचे श्रीकृष्ण माहोरे, देवस्थान समितीचे रोहन डोंगरे, नागेश्वर महादेव संस्थान धामंत्रीचे विश्वस्त मोहन इंगळे, विजय करडे, रवींद्र भोयर यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते.

## एसआयआर प्रक्रियेत भाजप

सांगत बीएलओला जाब विचारल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. कागदपत्रे योग्य अथवा अयोग्य आहेत की नाहीत, याची पडताळणी करण्याचा अधिकार संबंधित निवडणूक यंत्रणेला असतांना नगरसेवकांकडून त्यावर आक्षेप घेऊन बीएलओवर दबाव आणण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. तसेच उपस्थित महिलांचे मोबाईलद्वारे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात आले आणि उपस्थित नागरिकांना 'सगळ्यांना पाहतो' अशा स्वरूपाची धमकी देण्यात आल्याचाही आरोप उपस्थितांकडून करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे बूथवरील एसआयआरची प्रक्रिया सुमारे एक तास खोळंबल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. त्यानंतर पडताळणी प्रक्रिया थांबवून कर्मचारी निघून गेल्याने आवश्यक कागदपत्रांसह आलेल्या नागरिकांना विनाकारण परत जावे लागल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. मतदारांनी सादर केलेली कागदपत्रे ग्राह्य आहेत की नाहीत, याचा निर्णय संबंधित निवडणूक यंत्रणेकडून घेतला जातो. त्यामुळे बूथवरच कागदपत्रांवर आक्षेप घेऊन गोंधळ निर्माण करण्याचा अधिकार कुणाला, असा सवाल परिक्षित जगताप यांनी उपस्थित केला आहे. या संपूर्ण प्रकाराचे मोबाईलमध्ये व्हिडिओ रेकॉर्डिंग उपलब्ध असल्याचा दावाही त्यांनी केला असून, संबंधित व्हिडिओच्या आधारे संपूर्ण घटनेची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. शासकीय कामात अडथळा निर्माण झाल्याच्या आरोपाची तातडीने चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, तसेच एसआयआर प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी मागणी तक्रारदारांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केली आहे.

तक्रार देतेवेळी युवक काँग्रेसचे प्रदेश महासचिव परिक्षित जगताप, काँग्रेस नगरपरिषद गटनेते हाजी मोहम्मद अनीस सौदागर, माजी नगरसेवक सतपाल वरठे, शेख गफ्फार, हामिद कुरैशी, शेख तौफिक, शकील शाह, मोहसीन खान, शेख जावेद, अशफाक शाह, इरफान कुरेशी, अकबर सौदागर, मोहम्मद सलीम, कुंदनसिंग राठौड़, मोहम्मद वसीम, इमरान सौदागर, मोहम्मद शादाब, प्रदीप गवई, शेख साबीर, आसिफ खान, मोहम्मद दानिश, अरबाज खान, अब्दुल्ला कुरैशी यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

## समाजातील शेवटच्या माणसाचा

प्रतिष्ठानने घालून दिला आहे, असेही त्यांनी नमूद केले. दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांचे स्मरण करण्यासोबतच त्यांचे कार्य प्रत्यक्ष जीवनात आणि समाजकार्यात उतरविणे महत्त्वाचे आहे. शेवटच्या माणसाचे जीवन बदलणे हाच विकासाचा खरा अर्थ आहे, असा संदेश सरसंघचालक भागवत यांनी यावेळी दिला. कार्यक्रमास जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री डा. अशोक उईके, दीनदयाल सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष नरहर देव, सचिव विजय कद्रे यांच्यासह पदाधिकारी, शेतकरी, महिला, संघ स्वयंसेवक, भाजप पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 4 जवान शहीद

सीआयएसएफचे हे जवान बसोली येथील माश्का गावात असलेल्या सेवा-३ या वीज प्रकल्पाच्या सुरक्षेसाठी तैनात होते. यावेळी दोन सीआयएसएफ जवानांमध्ये एका मुद्द्यावरून वाद झाला आणि त्यानंतर त्यातील एकाने आपल्या सहका-यांवर अंदाधुंद गोळीबार केला. दरम्यान, आता वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून या घटनेच्या अधिक तपशीलांची प्रतीक्षा आहे. या संपूर्ण घटनेची चौकशी पोलिसांकडून करण्यात येत आहे.

**सीआयएसएफकडून चौकशीचे आदेश-** सीआयएसएफकडूनही या प्रकरणाची अंतर्गत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या घटनेचा घटनाक्रम आणि गोळीबारास कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीचा शोध घेण्यासाठी सीआयएसएफच्या मुख्यालयाने कोर्ट ऑफ इन्क्वायरीचे आदेश दिले आहेत. दरम्यान, वादाचं नेमकं कारण आणि गोळीबारास कारणीभूत ठरलेली परिस्थिती अद्याप स्पष्ट झालेली नाही.

## 'ईव्हीएम असो वा मतदार

शी संबंधित नियम बेकायदेशीरपणे बदलण्यात आले.'

**ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा दिलाच पाहिजे**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या मुद्द्यावरही प्रियांका गांधी बोलल्या. त्यांनी म्हटले की ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा दिलाच पाहिजे. ज्ञानेश कुमार राजीनामा कसा देणार नाहीत, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. काँग्रेस पक्ष आधीपासूनच ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्याची मागणी करत आहे. एसआयआर (SIR) आणि मतदार याद्यांशी संबंधित मुद्द्यांवरून पक्षाने निवडणूक आयोगाविरोधात आपले आंदोलन तीव्र केले आहे. या मुद्द्यावर पुढील रणनीती ठरवण्यासाठीही सीडब्ल्यूसी (कज्क) बैठक बोलावण्यात आली होती.

काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल म्हणाले, 'एसआयआर प्रक्रियेत आणि निवडणूक प्रणालीमध्ये हस्तक्षेप करणे हे पंतप्रधानांचे कर्तव्य आहे. या मुद्द्यावर भारताच्या पंतप्रधानांची नैतिक जबाबदारी आहे. परंतु पंतप्रधानपदी कायम राहण्याची नैतिक जबाबदारीही त्यांच्यावर नाही आणि नैतिक अधिकारही नाही. हे काँग्रेस कार्यकारिणी समितीचे (सीडब्ल्यूसी) मत आहे.' काँग्रेस खासदार कुमारी सेलजा म्हणाल्या, 'संपूर्ण काँग्रेस पक्ष आणि आम्हाला विश्वास आहे की संपूर्ण देशाने लोकशाही वाचवण्यासाठी एकत्र उभे राहिले पाहिजे. आम्ही राहुल गांधींसोबत आहोत. संपूर्ण काँग्रेस पक्ष त्यांच्यासोबत आहे आणि आम्ही सर्वजण या लढ्यात एकत्र पुढे जाउ.'

## मुंबईत मुसळधार

मुसळधार पावसामुळे आणि सोसाट्याच्या वा-यामुळे विस्कळीत झाली आहे. अनेक विमानांना विलंब झाला आहे. काही विमाने दुस-या मार्गाने वळवण्यात आली आहेत.

**जोरदार पावसामुळे अंधेरी सबवे पाण्याखाली गेला, वाहतुकीसाठी बंद-** मुंबईच्या पश्चिम उपनगरात तासाभरापासून मुसळधार पाउस सुरु आहे. या जोरदार पावसामुळे अंधेरी सबवे पाण्याखाली गेला आहे. अंधेरी सबवे मध्ये दोन ते तीन फूट पाणी भरल्यामुळे अंधेरी सबवे मागील एक तासापासून वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. अंधेरी सबवे वाहतुकीसाठी बंद केल्यामुळे अंधेरी पश्चिम एस. व्ही रोड परिसरात मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहे. तर सबवे मध्ये भरलेला पाणी काढण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून जनरेटर च्या माध्यमातून पाणी काढला जात आहे. वाहतूक सुरळीत करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून देखील युद्ध पातळीवर प्रयत्न केला जात आहे. अंधेरी सबवे मध्ये भरलेल्या पाण्यात ओमीनी कार आणि पोलिसांच्या बॅरिकेट वाहून गेल्या आहेत. गेल्या एक तासभरापासून मुंबईत झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि सोसाट्याच्या वा-यामुळे अनेक ठिकाणी झाडे कोसळल्याच्या घटना देखील घडल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, फिल्म सिटीमध्ये अनेक ठिकाणी झाडे पडली आहेत. दरम्यान, कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. वादळी वारा आणि मुसळधार पावसामुळं वाहतुकीवर देखील मोठा परिणाम झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. एका बाजुला विमानसेवा विस्कळीत झाली आहे. तर दुस-या बाजूला रोडवरील वाहतूक देखील संथ गतीने सुरु आहे. मोठ्या प्रमाणात ट्रॅफिक असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अंधेरी सब वे पाण्याखाली गेल्याने पाण्यासाठी तो रेड बंद करण्यात आला आहे.

## भारतीय मुलींची मोठी

कांस्यपदक जिंकले होते. आता तिने सुवर्णपदकही पटकावले आहे. स्पर्धेदरम्यान पाउस पडत होता, तरीही भारतीय खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. पावसामुळे त्यांना कोणताही अडथळा आला नाही. अनेकदा पावसात धावताना खेळाडूंना अडचणी येतात.

**पदक तालिकेत भारताचे १० वे स्थान-** सहाव्या सुवर्णपदकासह भारताने पदक तालिकेत १० वे स्थान पटकावले आहे. एकूण पदकांची संख्या ५१ झाली आहे. यामध्ये ६ सुवर्ण, २१ रौप्य आणि २४ कांस्य पदकांचा समावेश आहे.

## इंडिया आघाडीची SIR वर

(एम)चे महासचिव एम. ए. बेबी हे बैठकीला उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

**मी त्यांना बैठकीसाठी आमंत्रित केले नव्हते**

दुसरीकडे, दोन दिवसांपूर्वी केजरीवाल यांना भेटल्यानंतर, सीपीआय(एम)चे महासचिव बेबी म्हणाले की, इंडिया आघाडीच्या बैठकीसंदर्भात पक्षाच्या समन्वयाची देखरेख काँग्रेस करत आहे. 'मी अरविंद केजरीवाल यांना बैठकीसाठी आमंत्रित केले नव्हते.' बेबी यांच्या मते, केजरीवाल म्हणाले की निवडणूक आयोगाविरोधात एक जोरदार मोहीम सुरू करण्याची गरज आहे. केजरीवाल यांनी आपल्या पक्षाच्या नेत्यांशी या विषयावर चर्चा करण्याबद्दल सांगितले आहे. बेबी म्हणाले की, त्यांनी इंडिया ब्लाकबाहेरील पक्षांनाही पत्र लिहिले आहे. संसदेत मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोग प्रस्ताव आणण्यावर चर्चा होण्याची शक्यता आहे. या बैठकीत एसआयआर (SIR) संदर्भात निवडणूक आयोगामध्ये निर्माण झालेल्या मतभेदांवर चर्चा होईल. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्याच्या मागणीसाठी पुढील रणनीतीवरही चर्चा होउ शकते. वृत्तांनुसार, या बैठकीत त्यांच्या विरोधात संसदेत प्रस्ताव आणण्यावर आणि विरोधी पक्षांच्या संयुक्त कारवाईवरही चर्चा होउ शकते.

## MPSC च्या दोन सदस्यांवर टांगती

आरोपींना अटक केली आहे. विशेष तपास पथकाने कारवाई करत दोन मध्यस्थ आणि दोन उमेदवारांना बेड्या ठोकल्या आहेत. या नव्या अटकेमुळे एमपीएससीच्या संपूर्ण परीक्षा प्रक्रियेला नवीन वळण आले आहे. या प्रकरणामुळे आयोगातील हा घोटाळा एखाद्या विद्यार्थ्यापुरता किंवा जिल्हा पुरता मर्यादित नसून राज्यभर पसरल्याचे सिद्ध झाले. संयुक्त २०२५ च्या मुख्य परीक्षा दिलेले उमेदवारही अटक झाली आहे. त्यानंतर आता आयोगातील काहींची चौकशी होणार असल्याचे वृत्त आहे.

**अध्यक्षांनाच जाणीवपूर्वक लक्ष केले जाते ?**

राज्यातील परीक्षा पद्धतींमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी राज्य शासनाने एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. या समितीने राज्यभरातील परीक्षार्थी, शिक्षणतज्ज्ञ आणि इतर संबंधित घटकांशी सखोल चर्चा करून उत्तम परीक्षा पद्धतीचा अभ्यास केला आहे. या समितीचा अहवाल आणि आदर्श परीक्षा पद्धतीबाबतच्या शिफारशी लवकरच शासनाला प्राप्त होणार आहेत. मात्र यानंतरही अनेक राजकीय पक्ष अध्यक्ष यांनाच टार्गेट करताना दिसत आहेत. विशेष म्हणजे आयोगामध्ये झालेल्या परीक्षेतील गोंधळा दरम्यान अध्यक्ष पदावर भीमनवार नव्हते. यावेळी आयोगाचे सदस्य अभय वाघ यांच्याकडे अध्यक्ष पदाचा पदभार होता. असे असतानाही मनोहर यांना जाणीवपूर्वक लक्ष केला जात आहे का अशीही चर्चा सुरू आहे.

**या दोन सदस्यांची चौकशी होणार-** एमपीएससीच्या संपूर्ण रचनेमध्ये सदस्यांची भूमिका अंतिम महत्त्वाची असते. विविध मुलाखतीच्या पॅनलमध्ये सदस्य हे अध्यक्ष असतात. तसेच आयोगाच्या विविध निर्णय प्रक्रियांमध्ये हे त्यांचा महत्त्वाचा वाटा असतो. त्यामुळे परीक्षेतील गोंधळानंतर आता सदस्यांच्या भूमिकेवरही संशय उपस्थित केला जात आहे. त्यामुळे शासनाने घटित केलेल्या एसआयटी समिती समोर आयोगातील दोन सदस्यांचे चौकशी होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिलेली आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, ३० सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## पैनगंगा नदीवर बॅरेजचा प्रश्न कधी सुटणार ?

### भापुर, गोभणी, खडकी सदार, देगाव, लिंगापेन, किनखेडा, मसलापेन, चिंचाबापेनसह अनेक गावांच्या सिंचनाचा प्रश्न ऐरणीवर

■ प्रतिनिधी | रिसोड ■

पावसाळ्यात दुथडी भरून वाहणारी आणि हिवाळा सुरू होताच कोरडी पडणारी पैनगंगा नदी रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी एक मोठी विसंगती ठरत आहे. नदीचे पाणी उपलब्ध असतानाही त्याचा प्रभावी साठा आणि सिंचनासाठी उपयोग करण्यासाठी बॅरेज उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. मात्र, 'पैनगंगा नदीवर बॅरेज नेमके कधी होणार?' हा प्रश्न आजही कायम आहे.

रिसोड तालुक्यातील भापुर, गोभणी, खडकी सदार, देगाव यासह नदीकाठच्या अनेक गावांतील शेतीला या प्रकल्पाचा थेट फायदा होऊ शकतो, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. बॅरेजमुळे पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून त्याचा साठा करता येईल आणि त्याचा उपयोग रबी हंगामासह उन्हाळी पिकांसाठी तसेच भूजलपातळी वाढविण्यासाठी होऊ शकतो.



#### दोन आमदार, तरी पैनगंगा बॅरेजचा प्रश्न अनुत्तरित का?

रिसोड तालुक्यात दोन आमदारांचे राजकीय प्रतिनिधित्व असताना पैनगंगा नदीवरील बॅरेजचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित का आहे? पावसाळ्यात पाणी वाहून जाते आणि दुष्काळाच्या काळात शेतकरी पाण्यासाठी संघर्ष करतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी लोकप्रतिनिधींनी आतापर्यंत काय ठोस पाठपुरावा केला? बॅरेजमुळे किती गावांना आणि किती शेतीला लाभ होऊ शकतो, याचा अभ्यास आणि प्रस्ताव शासनाच्या कोणत्या टप्प्यावर आहे, हे जनतेसमोर येणे गरजेचे आहे. निवडणुकीच्या काळात विकासाची आश्वासने देणारे राजकीय नेतृत्व जलप्रश्नावर प्रत्यक्ष निर्णय कधी आणणार? दोन आमदार असताना बॅरेज का नाही? हा सवाल आता शेतकऱ्यांनी लोकप्रतिनिधींना थेट विचारण्याची वेळ आली आहे.

#### पावसाळ्यात पाणी मुबलक, पण रबीसाठी टंचाई

रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर पाण्याचे हे विरोधाभासी चित्र वर्षानुवर्षे कायम असल्याची भावना आहे. पावसाळ्यात अतिवृष्टी झाली की शेतीचे नुकसान होते; तर दुसरीकडे नदीतून मोठ्या प्रमाणात पाणी वाहून गेल्यानंतर हिवाळ्यात सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध राहत नाही. पावसाळ्यात अतिरिक्त पाण्यामुळे नुकसान आणि त्यानंतर नदीचे पाणी खाली नांदेड भागाकडे वाहून गेल्याने रबी पिकांसाठी पाण्याची कमतरता, असे दुहेरी संकट शेतकऱ्यांना सहन करावे लागते. त्यामुळे उपलब्ध जलस्त्रोताचा स्थानिक पातळीवर साठा आणि नियोजनबद्ध वापर करण्याची मागणी पुन्हा जोर धरत आहे.

#### प्रश्न केवळ बॅरेजचा नाही, जलनियोजनाचाही

पैनगंगा नदीवर बॅरेज उभारल्यास नेमक्या किती गावांना आणि किती क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळू शकतो, प्रकल्पासाठी किती खर्च अपेक्षित आहे, कोणत्या विभागाकडे प्रस्ताव आहे, तांत्रिक सर्वेक्षण झाले आहे का आणि प्रशासकीय मान्यता कोणत्या टप्प्यावर आहे, याबाबत शासनाने स्पष्ट माहिती जाहीर करण्याची गरज आहे.

पैनगंगा नदीवरील बॅरेजच्या मागणीसाठी विष्णुपंत भुतेकर यांनी पैनगंगा परिक्रमा केली होती, त्यानंतर या मागणीला सातत्याने पुढे नेण्यासाठी त्याच्याकडून वेळोवेळी प्रयत्न झाले.
**सुशांत भारती बाळखेडा** शेतकरी

....................

'पावसाळ्यात पैनगंगा भरून वाहते आणि काही महिन्यांत नदी कोरडी पडते. बॅरेज झाले असते तर पावसाळ्यातील पाणी काही प्रमाणात साठवून रबी पिकांना आधार मिळाला असता. आता दुष्काळाच्या परिस्थितीत या प्रश्नाचे गांभीर्य आणखी वाढले आहे.'
**भैयासाहेब देशमुख**
लिंगापेन (शेतकरी

..................

'वर्षानुवर्षे बॅरेजची मागणी होत आहे. पैनगंगा परिक्रमा झाली, आंदोलने आणि मागण्या झाल्या; मात्र त्यानंतर सातत्याने पाठपुरावा कुठे झाला, हा प्रश्न आहे. तालुक्यात दोन आमदार असताना या प्रकल्पासाठी ठोस निर्णय कधी होणार, हे लोकप्रतिनिधींनी स्पष्ट करावे.'
**पंजाब पांडुरंग अवचार**
किनखेडा (शेतकरी

## शेतकऱ्यांसाठी समनक जनता पार्टी आक्रमक

### हेक्टरी एक लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्यात पावसाअभावी निर्माण झालेल्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर समनक जनता पार्टीने राज्य सरकारकडे तातडीच्या मदतीची मागणी केली आहे. शेतकऱ्यांना तातडीने हेक्टरी एक लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी मागणी पक्षाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दि. २८ सप्टेंबर रोजी वाशिम जिल्हाधिकारी यांच्यामार्फत पाठविलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाच्या अनियमिततेमुळे शेतीसमोर संकट निर्माण झाले असून शेतकऱ्यांच्या पिकांवर त्याचा परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांनी पेरणीपासून पीक व्यवस्थापनापर्यंत मोठा खर्च केला आहे. मात्र, प्रतिकूल परिस्थितीमुळे अपेक्षित उत्पन्न मिळण्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळे संकटग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने तातडीने आर्थिक आधार देण्याची आवश्यकता असल्याचे पक्षाने नमूद केले आहे. समनक जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल राठोड यांच्या नेतृत्वात राज्यभरात एकाच दिवशी सादर करण्यात आलेल्या निवेदनात शासनाने शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे.



#### मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर

#### मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा

शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास समनक जनता पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी पक्ष आंदोलनाची भूमिका घेणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांना आर्थिक मदत, पीक नुकसान भरपाई आणि कर्जासंदर्भातील निर्णय याबाबत शासनाकडून पुढील भूमिका काय घेतली जाते, याकडे शेतकरी आणि संबंधित घटकांचे लक्ष लागले आहे. निवेदन देताना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल राठोड, वाशिम जिल्हाध्यक्ष गजानन धामणे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष शितलताई राठोड, नेमीचंद महाराज, ॲड. संगीता राठोड, लता राठोड, मीरा राठोड, सुरेखा राठोड, प्रतिभा राठोड, गणेश राठोड, सुशील राठोड आदिसह पदाधिकारी उपस्थित होते.

#### या निवेदनाच्या माध्यमातून चार प्रमुख मागण्या

समनक जनता पार्टीने शासनासमोर प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान देणे, सरसकट पीक कर्जमाफी करणे आणि चालू शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करणे या मागण्यांचा समावेश आहे.

शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी वाढत असताना शासनाने केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष मदतीचा निर्णय घ्यावा, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे. शेतकरी कर्जबाजारीपणातून बाहेर पडावा आणि त्याला पुढील हंगामासाठी आर्थिक आधार मिळावा, यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्याची मागणी पक्षाने केली आहे.

## वीर जीवाजी महाले चौकाच्या सौंदर्यीकरणासाठी नाभिक समाज संघटनेचे निवेदन



■ प्रतिनिधी | कारंजा ■

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे अंगरक्षक वीर जीवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त कारंजा नाभिक समाज संघटनेच्या वतीने वीर जीवाजी महाले चौकाच्या सौंदर्यीकरणाची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात कारंजा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले. येत्या ९ ऑक्टोबर २०२६ रोजी वीर जीवाजी महाले यांची जयंती असून, त्यानिमित्त चौकाचे सुशोभीकरण, स्वच्छता तसेच परिसराला आकर्षक स्वरूप देण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. वीर जीवाजी महाले यांच्या शौर्य व स्वराज्यनिष्ठेचे स्मरण जपण्यासाठी चौकाचे सौंदर्यीकरण होणे आवश्यक असल्याचे संघटनेने नमूद केले. या निवेदनावर संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर घोडसाड, उपाध्यक्ष श्रीकांत मोरस्कर, सचिव डॉ. सुनील गौंड, कोषाध्यक्ष दिलीप मर्दाने, सहकोषाध्यक्ष दीपक खरटकर, सदस्य सुधीर घोडसाड, शाम तायडे, अमोल घोडसाड, प्रकाश कवडेकर, निलेश सोनोलकर, तसेच कारंजा नाभिक समाज संघटनेचे अध्यक्ष पवन डुकरे व उपाध्यक्ष प्रज्वल वाघमारे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## कृष्णा येथे वि.जा.व भ.ज.दाखला शिबीर संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृष्णा (ता.वाशीम) येथे कृष्णा गावातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या ग्रामस्थांना शासनाच्या विवीध योजनांचा व प्रमाणपत्रांचा लाभ मिळण्याकरीता भटके विमुक्त समुह दाखला मेळावा वाशीमचे? तहसीलदार निलेश पळसकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.यावेळी कृष्णा येथील पोलिस पाटील रेखाताई बोडखे यांच्या हस्ते विमुक्त व भटक्या जमाती मधील पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.यावेळी तलाठी व से.नि.पोलीस पाटील आत्माराम बोडखे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी कृष्णा वाशीयांना संबोधित करताना तहसीलदार निलेश पळसकर यांनी सांगितले की,राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' या



#### पो.पा. रेखा बोडखेंच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान

अभियाना अंतर्गत राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा व प्रमाणपत्रांचा लाभ मिळवुन देण्याकरीता आपल्या वाशीम तालुक्यात सप्टेबर महिन्यात २७ ते २९ पर्यत शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच ऑक्टोबर मध्ये सुद्धा हा उपक्रम राबविण्यात येत आहे.या मध्ये आज आपल्या कृष्णा गावातील विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील जास्तित जास्त नागरिकांना शासकिय योजना व प्रमाणपत्राचा लाभ शिबीरात वितरीत करण्यात येत, थेट आपल्या गावात तहसील प्रशासनाने हा मेळावा आयोजित करण्यात आल्याने जाग्यावरच विविध प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आल्याने सर्व प्रमाणपत्रासाठी तालुकास्तरावर जाण्या येण्याचा श्रम वेळ आणि पैसा सुद्धा वाचल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली.विशेष म्हणजे कृष्णा गावातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या ग्रामस्थामध्ये पात्र लाभार्थ्यांना विवीध शासकीय ओळखपत्रे, प्रमाणपत्रे, प्राप्त झाले असल्याने त्यांना विवीध शासकिय योजनांचा लाभ मिळविण्याकरीता सोईस्कर झाले आहे.असे प्रतीपादन पोलीस पाटील रेखाताई बोडखे यांनी करून कृष्णा येथे या मेळाव्याचे आयोजन केल्याबद्दल आयोजन केल्याबद्दल तहसीलदार निलेश पळसकर व महसूल प्रशासनाचे आभार सेवानिवृत्त पोलीस पाटील आत्माराम पाटील बोडखे यांनी केले पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या तक्रारी अडी-अडचनीवर योग्य ते मार्गदर्शन करुन अनेक प्रकरणे तात्काळ निकाली काढल्या गेली.सदर मेळावा यशस्वी रित्या संपन्न झाला.

## प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा बाळगणाऱ्यांना मनपाचा दणका!

- भाजीपाला, फळ विक्रेत्यांवर २५ हजारांचा दंड
- प्लास्टिकमुक्तीसाठी तपासणी मोहीम तीव्र



■ प्रतिनिधी | अकोला ■

प्रतिबंधित प्लास्टिकच्या कॅरीबॅगचा सर्रास वापर करणाऱ्या व्यावसायिकांविरोधात अकोला महानगरपालिकेने कारवाईचा बडगा उगारला आहे. पूर्व झोनमधील सातव चौक ते गणेश स्वीट मार्टमार्गे उमरी रोड परिसरात केलेल्या तपासणीत प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा आढळून आल्याने संबंधित व्यावसायिकांवर तब्बल २५ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली.

मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार शहर स्वच्छ आणि प्लास्टिकमुक्त करण्यासाठी मनपाच्या स्वच्छता विभागाकडून मोहीम राबविण्यात येत आहे. मंगळवारी (२९ सप्टेंबर) पूर्व झोनअंतर्गत भाजीपाला व फळ विक्रेत्यांची तपासणी करण्यात आली. यावेळी अनेक किरकोळ व्यावसायिकांकडे शासनाने प्रतिबंधित केलेल्या प्लास्टिक कॅरीबॅगचा साठा आढळला. त्यामुळे संबंधितांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली.

#### 'कापडी पिशवी वापरा, प्लास्टिक टाळा'

प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर, विक्री आणि हाताळणी पूर्णपणे बंद करून त्याऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करावा. नागरिक आणि व्यावसायिकांनी मनपाच्या प्लास्टिकमुक्ती मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन मनपा सहायक आयुक्त गणेश शहाणे यांनी केले.ही कारवाई सहायक आयुक्त गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत करण्यात आली. स्वच्छता विभाग प्रमुख प्रशांत राजुरकर, पूर्व झोनचे स्वच्छता निरीक्षक सुनील कंडेरा, प्रवीण मनोहर यांच्यासह स्वच्छता विभागातील कर्मचारी या कारवाईत सहभागी झाले होते.

## मध्यरात्री पोलिसांची धडक शोधमोहीम; लोणारमध्ये अल्पवयीन मुलीचा सुरक्षित शोध

### फूस लावून नेल्याची तक्रार; चान्नी पोलिसांसह एलसीबी व बुलढाणा पोलिसांची संयुक्त कारवाई

■ प्रतिनिधी | पातूर ■

अल्पवयीन मुलीला फूस लावून घेऊन गेल्याची तक्रार मिळताच चान्नी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत रात्रभर शोधमोहीम राबविली. अकोला स्थानिक गुन्हे शाखा, चान्नी पोलिस तसेच बुलढाणा जिल्ह्यातील पोलिस पथकांच्या संयुक्त कारवाईत लोणार येथील घरकुलजवळील पट्टी परिसरातून बेपत्ता मुलीचा सुरक्षित शोध घेण्यात आला. या प्रकरणात तीन संशयितांसह एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

चान्नी पोलिस ठाण्यात २५ सप्टेंबर २०२६ रोजी अप.क्र. ३४१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. मुलगी अचानक बेपत्ता झाल्यानंतर तिच्या आई-वडिलांनी परिसरात तसेच नातेवाईक व परिचितांकडे शोध घेतला. मात्र, बराच वेळ उलटूनही तिचा ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे पालकांनी चान्नी पोलिस ठाणे गाठून मुलीला कोणीतरी फूस लावून घेऊन गेल्याचा संशय व्यक्त केला. तक्रार मिळताच चान्नी पोलिसांनी प्रकरण गांभीर्याने घेत तपास सुरू केला. उपलब्ध माहितीच्या आधारे संभाव्य ठिकाणांची माहिती घेत अकोला स्थानिक गुन्हे शाखेचे पथकही तपासात उतरले. लोणार, परतूर आणि बुलढाणा परिसरातील पोलिस पथकांची मदत घेत संशयित ठिकाणी शोधमोहीम राबविण्यात आली.



#### रात्रभर शोध अन् लोणारमध्ये धागा हाती

पोलिसांची शोधमोहीम रात्रभर सुरू होती. दरम्यान, मुलगी लोणार परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिस पथकाने लोणार येथील घरकुलजवळील पट्टी परिसर पिंजून काढला. अखेर मुलगी पोलिसांच्या हाती लागली. तिला सुरक्षित ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली. मुलगी सुखरूप सापडल्याची माहिती मिळताच तिच्या पालकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

#### तीन संशयितांसह बालक ताब्यात

या प्रकरणात शांताराम अश्रू कराळे (४०, रा. लोणार), अनुसया गुणाजी साखरकर (४०, रा. वढव, लोणार) आणि चंद्रकला देविदास कोकाटे (५०, रा. आदर्श गोरक्षण संस्था, आलेगाव) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तसेच घटनेत सहभागी असल्याचा संशय असलेल्या एका विधीसंघर्षग्रस्त बालकासही ताब्यात घेण्यात आले आहे.

#### वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी बाळापूर गजानन पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. चान्नी पोलिस ठाण्याचे परि. पोलीस उपअधीक्षक तथा प्रभारी अधिकारी धनराज देवर्जनकर, अकोला स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी तसेच लोणार, परतूर आणि बुलढाणा पोलिस पथकाने शोधमोहीमेत महत्त्वाची भूमिका बजावली.

## भटक्या कुत्र्यांचा हैदोस; ११ बकऱ्या, ३ पिल्लांचा बळी



■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरातील बिलाल नगर परिसरात भटक्या कुत्र्यांनी अक्षरशः हैदोस घालत बकऱ्यांवर हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात पशुपालक जुम्मा दाऊ रेघीवाले यांच्या तब्बल ११ बकऱ्या आणि ३ बकरीची पिल्ले मृत्युमुखी पडली आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पशुपालकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे नागरिकांसह पशुपालकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. कुत्र्यांच्या हल्ल्यात एवढ्या मोठ्या संख्येने पशुधन दगावल्याने प्रशासनाच्या भटक्या कुत्र्यांबाबतच्या उपाययोजनांवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेचा तातडीने पंचनामा करून जुम्मा दाऊ रेघीवाले यांना शासनाच्या नियमानुसार आर्थिक मदत व योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे. तसेच बिलाल नगर व परिसरातील भटक्या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करून भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिक व पशुपालकांकडून करण्यात येत आहे.भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त कधी होणार? असा संतप्त सवाल आता परिसरातील नागरिकांकडून उपस्थित केला जात असून प्रशासनाने या गंभीर घटनेकडे तातडीने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

## डीजेला फाटा देत पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाला निरोप

### वनोजातील ऋषिश्वर महाराज गणेशोत्सव मंडळाचा अनोखा उपक्रम; लाठीकाठीच्या प्रात्यक्षिकांनी वेधले लक्ष, महिलांचाही उत्स्फूर्त सहभाग

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीत सध्या मोठ्या आवाजातील डीजेचा वापर वाढताना दिसत आहे. डीजेच्या दणदणाटात मिरवणुकीचा उत्साह साजरा करण्याची पद्धत अनेक ठिकाणी रूढ होत असताना, मंगरुळपीर तालुक्यातील आदर्श ग्राम वनोजा येथील ऋषिश्वर महाराज गणेशोत्सव मंडळाने मात्र पारंपरिक संस्कृती आणि सामाजिक संदेशाची सांगड घालत वेगळा आदर्श निर्माण केला. मंडळाने डीजेला पूर्णपणे फाटा देत टाळ, लेझीम आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणेश विसर्जन मिरवणूक काढली.

गणेशोत्सवातील उत्साहाला कोणतीही कमी न आणता पारंपरिक पद्धतीने काढण्यात आलेल्या या मिरवणुकीला ग्रामस्थ आणि गणेशभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने दुमदुमलेला परिसर, टाळ-मृदंगासह पारंपरिक वाद्यांचा निनाद आणि लेझीमच्या तालावर सहभागी झालेल्या गणेशभक्तांमुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. विसर्जन मिरवणूक म्हटले की मोठ्या आवाजातील डीजे, ध्वनिक्षेपक आणि त्याच्या तालावर नाचणारी तरुणाई, असे चित्र सध्या अनेक ठिकाणी पाहायला मिळते. मात्र वनोजातील ऋषिश्वर महाराज गणेशोत्सव मंडळाने याला छेद देत पारंपरिक वाद्यांच्या साथीने मिरवणूक काढण्याचा निर्णय घेतला. टाळ, लेझीम आणि विविध पारंपरिक वाद्यांच्या तालावर गणेशभक्त सहभागी झाले होते. मोठ्या आवाजाच्या डीजेऐवजी पारंपरिक कला आणि वाद्यांना प्राधान्य देत मंडळाने गणेशोत्सवातील उत्साहासोबतच संस्कृतीचेही जतन करण्याचा संदेश दिला.



या विसर्जन मिरवणुकीचे आणखी एक विशेष आकर्षण ठरले ते मंगरुळपीर येथिल गुरुध्वज आखाड्याच्या लहान मुलांनी सादर केलेले लाठीकाठी आणि विविध साहसी खेळांचे प्रात्यक्षिक. चिमुकल्यांनी आत्मविश्वासाने आणि कौशल्यपूर्ण पद्धतीने विविध कसरती व खेळ सादर करत उपस्थितांची दाद मिळवली.

पारंपरिक खेळ आणि शारीरिक कौशल्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देत या माध्यमातून नवीन पिढीला आपल्या पारंपरिक कला व खेळांची ओळख करून देण्याचा प्रयत्न मंडळाकडून करण्यात आला. दरम्यान, मंगरुळपीर पोलीस स्टेशनचे ठाणेदार किशोर शेळके यांनी विसर्जन मिरवणुकीला भेट देऊन पाहणी केली. डीजेचा वापर टाळून पारंपरिक पद्धतीने गणेश विसर्जन मिरवणूक काढल्याबद्दल त्यांनी मंडळाचे कौतुक केले.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३०३ ■ बुधवार ३० सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु



# अखेर 'टीएफ-२' जेरबंद

## करूर-पवनगावची दहशत संपली

### अडीच वर्षीय वाघिणीला डार्ट मारून पिंजराबंद शेतकरी, शेतमजुरांनी सोडला सुटकेचा निःश्वास

**समुद्रपूर जनमाध्यम** तालुक्यातील करूर-पवनगाव परिसरात पाळीव प्राण्यांची शिकार करून दहशत निर्माण करणाऱ्या 'टीएफ-२' या अडीच वर्षीय वाघिणीला अखेर मंगळवारी २९ सप्टेंबर रोजी वनविभागाने पिंजराबंद केले. गेल्या काही दिवसांपासून वाघिणीचा शेतशिवारात मुक्तसंचार सुरू असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. वाघिणीच्या बंदोबस्तामुळे शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

वाघिणीच्या वाढत्या वावरामुळे मानव-वन्यजीव संघर्षाचा धोका निर्माण झाला होता. ग्रामस्थांच्या मागणीनंतर वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पिंजराबंद करण्याची परवानगी मागण्यात आली. १५ सप्टेंबर रोजी परवानगी मिळाल्यानंतर



वनविभागाने शोधमोहीम सुरू केली. या मोहिमेत एनएनटीआर रेस्क्यू टीम आणि पीपल फॉर ॲनिमल्सच्या पथकाचीही मदत घेण्यात आली.

शोध घेत असताना पवनगाव परिसरातील सर्व्हे क्रमांक ५८ मधील रोपवनात वाघिणीचा ठावठिकाणा लागला. ओळख निश्चित झाल्यानंतर सकाळी साडेसातच्या सुमारास तिला गुंगीच्या औषधाचा डार्ट मारण्यात आला. बेशुद्ध झाल्यानंतर सुरक्षितरीत्या रेस्क्यू करून तिला पिंजराबंद करण्यात आले.

ही कारवाई उपवनसंरक्षक हरविर सिंग, सहाय्यक वनसंरक्षक हरिलाल सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी स्वप्नील ढोणे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

आमदारांची रेस्क्यू पथकाला कौतुकाची थाप

ग्रामस्थांनी आ. समीर कुणावार यांच्याकडे वाघिणीला पिंजराबंद करण्याची मागणी केली होती. कुणावार यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्याशी संपर्क साधून समस्या मांडली. वाघिणी पिंजराबंद झाल्यानंतर कुणावार यांनी घटनास्थळी भेट देत रेस्क्यू पथकाचे कौतुक केले.

# सेलूत आचारसंहितेला ठेंगा

**सेलू जनमाध्यम** : निवडणुकीचा बिगुल वाजला, आचारसंहिता लागू झाली; मात्र सेलू शहरातील राजकीय फलकांचा झगमगाट काही कमी झालेला दिसत नाही. आचारसंहितेचे नियम सर्वांसाठी समान असताना प्रमुख चौक, सार्वजनिक ठिकाणे आणि वर्दळीच्या रस्त्यांवर राजकीय नेते व पदाधिकाऱ्यांचे बॅनर अद्यापही दिमाखात झळकत आहेत. त्यामुळे आचारसंहिता नेमकी कुणासाठी, असा संतप्त प्रश्न सेलूकरांकडून उपस्थित केला जात आहे.

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर संबंधित क्षेत्रात आदर्श




आचारसंहितेची अंमलबजावणी सुरू झाली आहे. २३ ऑक्टोबरला मतदान तर २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे. निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाने नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. मात्र, आचारसंहिता लागू होऊन आठवडा उलटत आला तरी शहरातील अनेक राजकीय फलक हटविले गेले नसल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेषतः सत्ताधारी पक्षाशी संबंधित नेते आणि पदाधिकाऱ्यांचे फलक अद्याप कायम असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे. सर्वसामान्यांच्या बाबतीत नियमांचा बडगा आणि राजकीय फलकांबाबत

## आचारसंहिता कागदावर, राजकीय फलक रस्त्यावर

## सेलूत राजकीय फलकांचा दबदबा कायम, प्रशासनाच्या डोळेझाकीवर नागरिकांचा संताप

मवाळ भूमिका का, असा थेट सवाल नागरिक विचारत आहेत. प्रशासनाच्या या कथित डोळेझाकीमुळे निवडणुकीतील समानतेच्या तत्त्वावरच प्रश्न उपस्थित होत आहे.

राजकीय फलक आचारसंहितेचा भंग करतात की नाही, याची तातडीने तपासणी करून नियमबाह्य फलक हटविण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. आता निवडणूक प्रशासन आणि पालिका प्रशासन कारवाईचा हातोडा चालवणार की राजकीय फलकांना अभय देणार, याकडे सेलूकरांचे लक्ष लागले आहे.

# कापूस विक्रीच्या आमिषाने आडत्याला ७.२५ लाखांचा गंडा

### १५० क्विंटल कापूस देतो सांगून पैसे उकळले; हिंगणघाट पोलिसांत गुन्हा

**वर्धा जनमाध्यम ,** १५० क्विंटल कापूस विक्रीचे आमिष दाखवून आडत्याकडून तब्बल १२ लाख ५० हजार रुपये उकळल्यानंतर केवळ ५ लाख रुपये परत करून उर्वरित ७ लाख २५ हजार रुपयांवर डल्ला मारल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी चंद्रपूर जिल्ह्यातील शेगाव बु. येथील प्रवीण टिकाराम खाटीक याच्याविरुद्ध हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. हिंगणघाट तालुक्यातील नांदगाव येथील प्रभाकर सूर्यभान कलोडे हे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शिवाजी मार्केट यार्डातील नोंदणीकृत आडते आहेत. प्रवीण खाटीक याच्याशी पूर्वीपासून ओळख असल्याने कलोडे यांचा त्याच्यावर विश्वास होता. २२ एप्रिल २०२५ रोजी खाटीकने जिनिंगमध्ये कापूस आणला होता. त्याच्या व्यवहारातील १ लाख २५ हजार रुपये आरटीजीएसने देण्याचे ठरले.

याचवेळी खाटीकने गावातील शेतकऱ्यांचा १५० क्विंटल कापूस विक्रीसाठी असल्याचे सांगितले. कलोडे यांनी ११ लाख २५ हजार रुपयांना कापूस खरेदी करण्याचे ठरविले. आधीच्या १ लाख २५ हजारांसह तब्बल १२ लाख ५० हजार रुपये खाटीकच्या खात्यावर आरटीजीएसने पाठविण्यात आले.

मात्र दहा दिवस उलटले तरी कापूस बाजार समितीत पोहोचला नाही. वारंवार मागणी करूनही टाळाटाळ सुरूच राहिली. अखेर खाटीकने दोन टप्प्यांत ५ लाख रुपये परत केले. उर्वरित ७ लाख २५ हजार रुपये देण्यास त्याने नकार दिल्याचा आरोप आहे. पैसे मागितल्यावर शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. अखेर कलोडे यांनी पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी खाटीकविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# भरधाव कारने दुचाकी उडवली; तरुणाचा करुण अंत

### जुनगड चौकातील भीषण अपघातात २६ वर्षीय एकनाथ सावरकर ठार

**वर्धा जनमाध्यम** भरधाव कारच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना सेलू तालुक्यातील जुनगड चौक परिसरात २९ रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास घडली. एकनाथ नामदेव सावरकर (वय २६) असे मृत तरुणाचे नाव आहे. अपघाताच्या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, एकनाथ सावरकर हा एमएच ४० एव्ही ७७५६ क्रमांकाच्या दुचाकीने कान्होली बारा येथून जुनगडच्या दिशेने जात होता. दुचाकी जुनगड चौक परिसरात पोहोचताच समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या एमएच ४७ व्यू ५४५६ क्रमांकाच्या कारने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की एकनाथ गंभीर जखमी झाला.

अपघाताचा आवाज होताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. रक्तबंबाळ




अवस्थेत असलेल्या एकनाथला नागरिकांनी तातडीने उपचारासाठी सेलू येथील रुग्णालयात हलविले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. तरुणाचा मृत्यू झाल्याची बातमी समजताच कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला.

या घटनेची नोंद सेलू पोलिसांनी घेतली असून अपघातग्रस्त कार पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. पुढील तपास सेलू पोलिस करीत आहेत.

# मकोकातील फरारांची अखेर 'धरपकड'

**वर्धा जनमाध्यम** महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्याअंतर्गत कारवाई झाल्यानंतर पोलिसांना चकवा देत फरार असलेल्या दोघांना वर्धा पोलिसांनी शिताफीने जेरबंद केले. भूषण संतोष राऊत रा. सोमनाथे लेआऊट आणि जतीन सतीश राऊत रा. इंदिरानगर अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

दोन्ही आरोपी विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असल्याची माहिती असून त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. कारवाईनंतर दोघेही पोलिसांच्या हाती लागण्यापासून बचाव करत फरार झाले होते. त्यांचा जिल्हाभर शोध सुरू होता.

दरम्यान भूषण राऊत हा घरी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तत्काळ सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. दुसरीकडे जतीन राऊत हा वर्धा शहरातून पसार होण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी बसस्थानक परिसरात धाव घेत त्याला ताब्यात घेतले.

ही कारवाई अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल आत्राम यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार नागेशकुमार चतरकर यांच्या निर्देशानुसार सहाय्यक पोलिस निरीक्षक अमोल जाधव, पोलिस उपनिरीक्षक शरद गायकवाड, राधेश्याम टेंभरे, प्रशांत वंजारी, नरेंद्र कांबळे, अनिल चव्हाण, वैभव जाधव, श्रावण पवार आणि पांडुरंग फुगनर यांनी केली.

# गरीब विद्यार्थ्यांसाठी आर्वीत इंजिनिअरिंग कॉलेज उभारा

### खासदार अमर काळेंचे तंत्रशिक्षण मंत्र्यांना पत्र; तंत्रनिकेतनमध्येच महाविद्यालय सुरू करण्याची मागणी

**आर्वी जनमाध्यम** आर्वी विधानसभा क्षेत्रातील गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीचे पदवी शिक्षण स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हावे, यासाठी आर्वी येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. खासदार अमर काळे यांनी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांना २६ सप्टेंबर रोजी पत्र देत आर्वीच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्येच अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याची मागणी केली आहे.

आर्वी परिसरातील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीच्या पदवी शिक्षणासाठी वर्धा, अमरावती किंवा नागपूरकडे धाव घ्यावी लागते. आर्थिक परिस्थिती सक्षम असलेल्या विद्यार्थ्यांना हे शक्य होते. मात्र ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासोबत प्रवास, निवास




आणि इतर खर्चाचा अतिरिक्त भार पडतो. त्यामुळे गुणवंत असूनही अनेक विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या संधींवर मर्यादा येऊ शकतात, असा मुद्दा काळे यांनी पत्रातून मांडला आहे.

आर्वी येथे तांत्रिक शिक्षणाची सुविधा निर्माण करण्यासाठी माजी राज्यमंत्री तथा माजी आमदार स्व. डॉ. शरदराव काळे यांनी प्रयत्न केले होते. त्यातून शासकीय तंत्रनिकेतन सुरू झाले. मात्र सध्या प्रामुख्याने पदविका स्तरावरील शिक्षणाची सुविधा असल्याने अभियांत्रिकी पदवीसाठी विद्यार्थ्यांना बाहेर जावे लागत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

आर्वी तालुक्यातील मोठा ग्रामीण भाग शेती आणि शेतमजुरीवर अवलंबून असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा अतिरिक्त आर्थिक खर्च कुटुंबांसाठी अडचणीचा ठरतो. त्यामुळे स्थानिक पातळीवरच अभियांत्रिकी पदवी शिक्षणाची दारे खुली करण्यासाठी आर्वीत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

शासकीय तंत्रनिकेतनची विद्यमान इमारत आणि उपलब्ध सुविधा लक्षात घेता त्याच ठिकाणी अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी खासदार अमर काळे यांनी केली आहे.

# मेडिकल कॉलेजच्या कामाला आता डेडलाईन

## संघर्ष समितीचा शासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम आमदार म्हणाले आचारसंहिता संपताच कामाला गती

**समुद्रपूर जनमाध्यम** : हिंगणघाट-जाम येथे मंजूर झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ४३० खाटांच्या रुग्णालयाच्या बांधकामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्याच्या मागणीवरून समुद्रपूरमध्ये संघर्षाची ठिणगी पडली आहे.

कोट्यवधींचा निधी मंजूर होऊनही बांधकाम सुरू नसल्याने मेडिकल कॉलेज संघर्ष समितीने प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. पुढील १५ दिवसांत प्रत्यक्ष काम सुरू न झाल्यास संपूर्ण समुद्रपूर तालुक्यात तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा समितीने दिला.

२९ सप्टेंबर रोजी समितीचे



अध्यक्ष प्रमोद भटे यांच्यासह सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि नागरिकांनी तहसीलदारांमार्फत शासनाला निवेदन दिले. ग्रामीण आणि शेतकरीबहुल समुद्रपूर तालुक्यातील नागरिकांना उपचारासाठी सेवाग्राम, सावंगी किंवा नागपूर गाठावे लागते. त्यामुळे हिंगणघाट-जाम येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली.

दरम्यान, आमदार समीर कुणावार यांनी मेडिकल कॉलेजची प्रक्रिया पूर्ण झाल्याचा दावा केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन ती प्रकाशितही झाली होती. मात्र आचारसंहिता लागू झाल्याने पुढील कार्यवाही थांबली आहे. आचारसंहिता संपताच काम पुढे जाईल. या विषयाला राजकीय रंग देऊन श्रेय घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

तहसीलदारांनी निवेदन तातडीने जिल्हाधिकारी व शासनाकडे पाठवून पाठपुरावा करावा, अशी मागणी समितीने केली. मुदतीत काम सुरू न झाल्यास उद्भवणाऱ्या आंदोलनाची जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही देण्यात आला.

# कुष्ठरुग्णांना नवजीवनाची आशा

## वर्धा जिल्हा रुग्णालयात पहिल्यांदाच पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया

### चार रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया, आरोग्य यंत्रणेच्या नव्या पावलाने रुग्णांना दिलासा

**वर्धा जनमाध्यम** कुष्ठरोगाच्या वेदनेसोबत जगणाऱ्या रुग्णांना आता उपचारासाठी जिल्ह्याबाहेर जाण्याची गरज भासणार नाही. वर्धा जिल्हा सामान्य रुग्णालयात प्रथमच चार कुष्ठरुग्णांवर पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत मंगळवारी २९ रोजी झालेल्या या विशेष शिबिरामुळे कुष्ठरुग्णांच्या उपचाराला जिल्ह्यातच नवी दिशा मिळाली आहे. कुष्ठमुक्त वर्धा जिल्ह्याचे उद्दिष्ट समोर ठेवून आरोग्य विभागाकडून नवीन कुष्ठरुग्ण शोध मोहीम सुरू आहे. त्याचवेळी पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांना यापूर्वी अमरावती येथे पाठविले जात होते. ही गैरसोय दूर करून जिल्ह्यातच अत्याधुनिक उपचार उपलब्ध करून देण्याचा संकल्प सहाय्यक संचालक आरोग्य सेवा कुष्ठरोग डॉ. रा.



ज. पराडकर यांनी केला. त्यानुसार जिल्हा रुग्णालयात पहिल्यांदा हे शिबिर घेण्यात आले. शिबिरासाठी ३१ कुष्ठरुग्णांना पाचारण करण्यात आले होते. तपासणीनंतर १० रुग्ण शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले. त्यापैकी चार रुग्णांवर मंगळवारी यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. उर्वरित सहा रुग्णांचे काही वैद्यकीय अहवाल प्रलंबित असल्याने त्यांच्या शस्त्रक्रिया पुढे ढकलण्यात आल्या. या चार रुग्णांमध्ये तीन पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. जिल्ह्यातच शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध झाल्याने रुग्णांना मोठा दिलासा मिळाला असून शासकीय आरोग्य यंत्रणेतील डॉक्टरांचेही मनोधैर्य वाढले आहे.

**तज्ज्ञांच्या पथकाचा मोलाचा सहभाग** शस्त्रक्रियांसाठी लता मंगेशकर हॉस्पिटल नागपूर येथील डॉ. सुशील मानकर तसेच नागपूर येथील डॉ. अनिल गोल्हर आणि त्यांच्या पथकाला पाचारण करण्यात आले होते. जिल्हा रुग्णालयातील जनरल सर्जन डॉ. नितीन बढे, डॉ. सोनु मडावी आणि डॉ. रॉय यांनीही शस्त्रक्रिया यशस्वी करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

**जिल्ह्यातच उपचाराची नवी वाट** - पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियेची गरज असलेल्या कुष्ठरुग्णांना यापुढे जिल्ह्यातच उत्तम आरोग्य सेवा मिळावी, या उद्देशाने प्रथमच विशेष शिबिर घेण्यात आले. चार रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया झाली असून हा जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेतील महत्त्वाचा टप्पा आहे, **डॉ. रा. ज. पराडकर,** सहाय्यक संचालक आरोग्य सेवा कुष्ठरोग, वर्धा

# खड्डे बुजवा, नाहीतर रस्ता रोखू

### सेलू-सिरसगाव मार्गाच्या दुरवस्थेवर काँग्रेस आक्रमक



हिंगणघाट जनमाध्यम: सेलू-मदनी-सिरसगाव या एए-३२१ मार्गावरील जीवघेणे खड्डे तातडीने बुजवून रस्ता वाहतुकीस सुरक्षित करावा, अन्यथा दहा दिवसांनंतर रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा तालुका ग्रामीण काँग्रेस कमिटीने सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला आहे.

या मागणीसाठी २८ सप्टेंबर रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वर्धा येथील मुख्य अभियंत्यांना निवेदन देण्यात आले. सेलू-मदनी-सिरसगाव हा वर्दळीचा मार्ग असून पावसामुळे अनेक ठिकाणी रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. पवनी गावाजवळील खड्डे विशेषतः धोकादायक बनले असून यापूर्वी या मार्गावर अपघात होऊन नागरिकांना जीव गमवावा लागल्याचा दावा काँग्रेसने केला आहे.

रस्त्याची तातडीने पाहणी करून संपूर्ण मार्गावरील खड्डे बुजवावेत आणि आवश्यक डागडुजी करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. प्रशासनाने दहा दिवसांत कार्यवाही न केल्यास सेलू-सिरसगाव मार्गावर कुठेही रास्ता रोको करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला.

निवेदन देताना तालुका ग्रामीण काँग्रेस अध्यक्ष श्रीराम साखरकर, नरेंद्र चाफले, रागिणी शेंडे, प्रा. डॉ. शंकर बोंडे, सुरेश गोहणे, रघु वाटखेडे, खलील कुरेशी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.


**नावात बदल**

माझे पूर्वी PRADIP RAMCHANDRA DUBE असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील PRADEEP RAMCHANDRA DUBEY या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता: - वॉर्ड नं ३१ स्टेशन फैल वर्धा

# माजी अग्निवीरांना शासकीय नोकरी

## कोल्हापूर सर्किट बेंचसाठी 459 पदांना मंजुरी; मंत्रिमंडळ बैठकीत 10 मोठे निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील २५६ तालुक्यात दुष्काळ जाहीर केल्यानंतर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रिमंडळाची बैठक संपन्न झाली. आजच्या बैठकीत उर्वरीत तालुक्यातही शेतक-यांना मदत करण्याच्या



अनुषंगाने चर्चा झाली. यासह महाराष्ट्रातील माजी अग्निवीरांसाठी शासकीय नोकरीत दहा टक्के समांतर आरक्षण. गट क मधील गणवेशधारी सेवांच्या पदांवर नियुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत एकूण १० महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून कोल्हापूरमधील उच्च न्यायालयातील ४५९ पदांच्या निर्मित्तीस मंजुरी देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रिमंडळाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत राज्यातील दुष्काळी परिस्थिती, उपाययोजना, पाणीपुरवठ्यावर प्रामुख्याने चर्चा झाली. त्यासह, माजी अग्निवीरांना शासकीय नोकरीत संधी, उच्च न्यायालयाच्या



कोल्हापूर खंडपीठातील नव्या पदांना मंजुरी, लाजिस्टिक पार्कसह अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

**आजच्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय-** माजी अग्निवीरांसाठी शासकीय नोकरीत दहा टक्के समांतर आरक्षण. गट - क मधील गणवेशधारी सेवांच्या पदांवर नियुक्ती देण्यात येणार. सैन्य दलातून चार वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झालेल्या अग्निविरांना सेवेत दाखल करून घेण्याचे धोरण निश्चित. (सामान्य प्रशासन विभाग)

**२. महाराष्ट्र वैरण विकास धोरण जाहीर.** राज्यातील पशुधनासाठी आवश्यक चा-याची उपलब्धता निश्चित होणार. जिल्हानिहाय चारा उत्पादन, लागवडीयोग्य गवतांची यादी, वैरण उपयुक्त वृक्षांची यादी, सुधारित चारा पिके, पारंपरिक व अपारंपरिक चारा स्त्रोत यांचा साकल्याने विचार. विविध शासकीय वैरण विकास योजनांचे नियोजन. दुग्धव्यवसाय आणि पशुपालन या शेतीपूरक व्यवसायास चालना मिळणार. (पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग)

३. न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाचा २ हजार ७६१ पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर. (गृह विभाग)

४. 'महाराष्ट्र कारागृहे सुधारसेवा अधिनियम, २०२५ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी. (गृह विभाग)

५. नागपूर जिल्ह्यातील मौ. बेला (ता. उमरेड) येथील २ हेक्टर ३७ आर शासकीय जमीन नागपूर- म्हाडास देण्यास मंजुरी. म्हाडा याठिकाणी गरजू व गरिबांसाठी परवडणारी घरे प्रकल्प साकारणार. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क)

६. सूर्या प्रकल्पग्रस्तांना ५६ वर्षानंतर न्याय. पालघरच्या नोवाळे, हनुमाननगरमधील जमिनींच्या फेरवाटपास मान्यता. प्रकल्पग्रस्तांची नावे सातबारावर नोंदण्यास मान्यता. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क)

७. मुंबईतील वांद्रे (ता.अंधेरी) येथील भुखंडाच्या भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणास मंजुरी. नॅशनल सोसायटीज फार क्लीन सिटीज सामाजिक संस्थेस दिलेल्या ६ हजार ११० चौ. मी. जमिनीच्या भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणास मंजुरी. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क)

८. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचकरिता (फिरते खंडपीठ) विविध संवर्गातील ४५९ पद निर्मितीस मंजुरी. गट अ ची २०, गट ब ३५, गट क २७६ आणि गट ड ची १२८ पदे. या पदांसाठी अनुषंगाने येणा-या खर्चाच्या तरतुदीस मंजुरी. (विधि व न्याय विभाग)

९. छत्रपती संभाजीनगरमधील वाळूज येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय होणार. न्यायालय स्थापनेस व त्यासाठीच्या न्यायिक अधिकारी व कर्मचारी यांच्या पदांना व खर्चाच्या तरतुदीस मंजुरी. (विधि व न्याय विभाग)

१०. महाराष्ट्र लाजिस्टिक्स धोरण २०२४ मध्ये सुधारणा. धोरणांतर्गत झोन -३ मध्ये स्थापन होणा-या लाजिस्टिक्स पार्क्स, पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या विशेष भांडवली प्रोत्साहन मिळणार. जिल्हानिहाय विकसित करण्यात येणा-या लाजिस्टिक्स पार्कची कमाल संख्येचा निकष रद्द. झोन १, २ मधील पार्कना शंभर टक्के, तर झोन ३ मधील पार्कना ७५ टक्के मुद्रांक शुल्कात सवलत. राज्यस्तरीय समित्यांच्या रचनेत सुधारणा. (उद्योग, गुंतवणूक, सेवा व खनिकर्म विभाग)

## भाजपा व ज्ञानेशकुमारांची अभद्र युती लोकशाही व संविधान संपवणारी

**मुंबई/प्रतिनिधी :** निवडणूक आयोग हा स्वायत्त आहे पण मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी तो भाजपाच्या दावणीला बांधला आहे. त्यांच्या इशा-यावर ज्ञानेशकुमार काम करत असून लोकशाही व संविधान संपवण्याचे पाप ते करत आहेत. ज्ञानेशकुमार व भाजपा यांची अभद्र युती आहे म्हणूनच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी



यांनी निवडणूक आयोगातील भ्रष्ट कारभार चव्हाट्यावर आणताच भाजपाचे नेतेमंडळी ज्ञानेशकुमार यांचा बचाव करण्यासाठी पुढे सरसावतात. भाजपाच्या लोकांचाच मेंदू चोरीला गेला आहे, अशी टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी केली.'राहुल गांधी यांनी मतचोरीचे प्रकार पुराव्यासह बाहेर काढले. भाजपाला फायदा होईल असे काम निवडणूक आयोगातून सुरु आहे. निवडणुकीतील हा भ्रष्ट कारभार बाहेर आला तर भाजपाला तोंड दाखवायला जागा राहणार नाही म्हणून भाजपाचे नेतेमंडळी ज्ञानेशकुमार यांचा बचाव करत आहेत. दोघे एकमेकांना पाठीशी घालत आहेत. जबाबदार पदावर असलेल्या व्यक्तीने संविधान व लोकशाही वाचवण्याचे काम केले पाहिजे. पण ते मात्र निवडणूक आयोगातील भ्रष्ट कारभारावर पांघरूण घालत आहेत,' असे पटोले म्हणाले.'ज्ञानेशकुमार हे मनमानी पद्धतीने काम करत आहेत. हे देशासाठी घातक आहे. मतदार नोंदणीच्या अर्ज-६ मध्ये ज्ञानेशकुमार यांनी मनमानी पद्धतीने बदल केले, लाखो तरुणांची, जाती धर्माच्या लोकांची नावे कापण्याचे काम ठरवून केले जात आहे. प. बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीवेळी ३२ लाख मतांची कपात केली, यातील २७ लाखांची सुनावणी घेतली असे सांगितले जाते, त्यावर इतर दोन निवडणूक आयुक्तांनी हे आम्हाला माहित नाही असे सांगितले. ही सुनावणी कोणाला विचारून केली गेली. ज्ञानेशकुमार यांच्या मनमानीला इतर दोन आयुक्तांनी आक्षेप घेउन त्यांचा भाजपाधार्जिणा चेहरा उघड केला आहे,' असा टोला नाना पटोलेंनी लगावला.

'मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात शिवसेना व मनसे मोर्चा काढत आहेत. लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी जे पक्ष वा संघटना लढत आहेत, त्यांच्या पाठीशी आम्ही आहोत. या युद्धात जे कोणी पुढे येत असतील त्याला विरोध करण्याचे कारण नाही. मतचोरी व फिक्सिंग केले जात आहे, त्याविरोधात देशातील जनतेने लढा पुकारला आहे. ही तर सुरुवात आहे. लढाई मोठी असून ती सुरुच राहणार आहे. ज्ञानेशकुमारांना पदावरून हटवण्यासाठी जे लढत आहेत, त्यांच्यासोबत काँग्रेस पक्ष आहे,' असेही नाना पटोले यांनी स्पष्ट केले.

## भूदानाच्या जमिनींवर बिल्डरांचा दरोडा, एसआयटी मार्फत होणार चौकशी

**यवतमाळ/प्रतिनिधी :** आचार्य विनोबा भावे यांच्या चळवळीतून भूमिहीन, गरीब शेतक-यांच्या चुली पेटवण्यासाठी दान मिळालेल्या जमिनींवर भू-माफिया, बिल्डर लॉबी आणि भ्रष्ट महसूल अधिका-यांनी डोळा ठेवून कोट्यवधी रुपयांचा दरोडा टाकल्याचे भीषण वास्तव उघडकीस आले आहे.

**३३ हजार जमीन बेपत्ता-**राज्यातील सर्वाधिक भूदान जमीन मिळालेल्या यवतमाळ जिल्ह्यात तब्बल ३३ हजार एकर जमीन बेपत्ता असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, या महाघोटाळ्याची राज्यातील पाळेमुळे मुळासकट उपटण्यासाठी विशेष तपास पथकाची स्थापना करून ए टू झेड चौकशी केली जाईल, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यवतमाळ येथे केली.

**बेकायदेशीर प्लॉट; महसूल बुडाला**

या महाघोटाळ्यात शासनाची कोट्यवधी रुपयांची महसूल फसवणूक तर झालीच आहे; शिवाय भूदानाच्या अनधिकृत जमिनींवर बेकायदेशीर प्लाट पाडून ते सामान्य नागरिकांना विकून हजारो कुटुंबांचीही फसवणूक करण्यात आली आहे. राज्यात सर्वाधिक भूदान जमीन मिळालेल्या यवतमाळ जिल्ह्यातच



या जमिनींचा मोठा अपहार झाला आहे. भूदान यज्ञ मंडळाला जमीन वाटपाचे अधिकार असले तरी अंतिम मंजुरीचे अधिकार सरकारकडेच आहेत, असे सांगत बावनकुळे यांनी या गैरव्यवहारांवर कठोर कारवाईचे संकेत दिले.

**भूदान यज्ञ मंडळातील झारीचा शुक्राचार्य कोण?**

यवतमाळ जिल्ह्यात भूदानात मिळालेल्या मोक्याच्या जमिनी खासगी व्यक्तींसह बांधकाम विकासकांना बेकायदेशीरपणे विकण्यात आल्या आहेत. महसूल कर्मचा-यांना हाताशी धरून बनावट नोंदींच्या आधारे हा सर्व खेळ चालवला गेला. भूदानाच्या पवित्र उद्देशाला हरताळ फासणा-या एकाही दोषीला सोडले जाणार नाही, असा इशारा दिल्याने आता भू-माफिया आणि भ्रष्ट अधिका-यांचे धाबे दणाणले आहेत. या चौकशीत भूदान यज्ञ मंडळातील झारीचा शुक्राचार्य कोण? याचाही शोधा सरकारसह तपास यंत्रणेने घ्यावा, अशी मागणी फसवणूक झालेल्या नागरिकांनी केली आहे.

**कोकणातील जमिनीचे व्यवहार थांबविले-**दरम्यान, या चौकशीसोबतच गोवा व सिंधुदुर्ग सीमेलगतच्या मोपा परिसरात शेतक-यांचे खोटे दाखले दाखवून परप्रांतीय लोक जमिनी खरेदी करत असल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी सर्व खरेदी-विक्री व्यवहार तूर्तास थांबवण्यात आले असून उच्चस्तरीय चौकशी सुरू असल्याची माहितीही बावनकुळे यांनी दिली.

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी कर्मचारी देणार दुष्काळनिधीसाठी एक दिवसाचा पगार

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डालरपर्यंत नेण्याच्या उद्दिष्टात पायाभूत सुविधांची भूमिका महत्त्वाची आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासदृष्टीला अनुरूप वेगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने काम करावे. रस्ते आणि पुलांपुरते मर्यादित न राहता राज्याच्या सर्वांगीण आर्थिक विकासाला चालना देणा-या पायाभूत सुविधा निर्माण कराव्यात, असे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी केले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने अभियंता दिन २०२६ निमित्त मागील दोन वर्षांत उल्लेखनीय कामगिरी करणा-या अभियंते आणि कर्मचा-यांच्या गौरव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मंत्री भोसले यांच्या हस्ते पुरस्कार देउन उत्कृष्ट अभियंते व कर्मचा-यांचा गौरव करण्यात आला. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाण सभागृहात अत्यंत साधेपणाने झालेल्या या कार्यक्रमास यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सचिव (रस्ते)



**राज्याच्या सर्वांगीण आर्थिक विकासाला चालना देणा–या पायाभूत सुविधा निर्माण करा**

**सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले**

शरद राजभोज, सचिव (बांधकामे) आबासाहेब नागरगोजे, महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित, यांच्यासह विभागाचे अधिकारी, अभियंते व कर्मचारी उपस्थित होते.सार्वजनिक बांधकाम मंत्री भोसले म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंत्यांनी आपल्या अधिकारांचा प्रभावी वापर करून संबंधित यंत्रणांकडून रस्ते, पूल आणि इमारतींची कामे गुणवत्तापूर्ण, टिकाउ व वेळेत पूर्ण करून घ्यावीत. नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी प्रत्येक कामावर बारकाईने लक्ष ठेवावे. रस्त्यांची मालकी कोणत्या यंत्रणेकडे आहे, याची माहिती अनेकदा नागरिकांना नसते. त्यामुळे रस्त्यांशी संबंधित प्रत्येक बाबीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाहिले जाते.

### अधिकारी कर्मचा–यांचा एक दिवसाचा पगार दुष्काळ निधीसाठी

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विभागातील अधिकारी व कर्मचा-यांनी एक दिवसाचा पगार दुष्काळ निधीसाठी देणार असल्याचे जाहीर केले आहे. या पुढाकाराबद्दल भोसले यांनी संघटनेचे अध्यक्ष अभियंता प्रमोद माने आणि पदाधिका-यांचे अभिनंदन केले. मंत्री भोसले म्हणाले की, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी आणि कर्मचा-यांनी सामाजिक बांधिलकी जपावी. बैठका व कार्यक्रम साधेपणाने आयोजित करावेत आणि प्रत्येक बाबतीत जबाबदारीने वागावे.

## शिशु पोषणासाठीच्या अन्नाचे विनियमन करणारा सर्वसमावेशक अनुपालन आदेश जारी-आयुक्त तुकाराम मुंढे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यभरातील शिशु पोषणासाठीच्या अन्नाचे उत्पादन, आयात, साठवण, वितरण, विक्री, नाममुद्रांकन आणि प्रचार यांचे विनियमन करणारा सर्वसमावेशक अनुपालन आदेश जारी करण्यात अल्ला असल्याचे, अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले. बांद्रा येथील अन्न व औषध प्रशासन मुख्यालय मध्ये आयोजित पत्रकार परिषदेत आयुक्त मुंढे बोलत होते.आयुक्त मुंढे म्हणाले, शिशु फार्म्युला, शिशु दूध अन्न, फालो-अप फार्म्युला, शिशुंसाठी पूरक अन्न, पारंपरिक शिशु अन्न, शिशुंसाठी विशेष वैद्यकीय प्रयोजनाचे अन्न आणि फीडिंग बाटल्स यांचा व्यवहार करणा-या प्रत्येक उत्पादक, ब्रँड मालक,आयातदार, पुनर्पॅकर, वितरक, किरकोळ विक्रेता, औषध दुकान, रुग्णालयीन पुरवठादार आणि ई-कामर्स प्लॅटफार्मला हा आदेश लागू असून तात्काळ अंमलात आला आहे. दोन वर्षांखालील शिशु व बालके हे सर्वांत असुरक्षित ग्राहक आहेत. त्यांना काय द्यावे हे ते स्वतः ठरवू शकत नाहीत आणि त्यांचे पालक नाममुद्रांकन व आरोग्य कर्मचा-यांच्या सल्ल्यावर अवलंबून असतात. प्रशासनाच्या तपासण्या व सर्वेक्षणांमध्ये विहित मानक टाळण्यासाठी "baby cereal", "health mix", "stage food" ÊEÆò´ÉE "nutrition powder" अशा नावांनी विकली जाणारी उत्पादने; अनिवार्य स्तनपानविषयक सूचना, आहार सुरू करण्याचे वय व तयारीच्या चेतावण्या नसलेली नाममुद्रांकने; शिशु दूध पर्याय



अधिनियमाचे उल्लंघन करून रुग्णालये, औषध दुकाने, वैद्यकीय परिषदा, ई-कामर्स सवलती, इन्फ्लुएन्सर्स व पालकत्व प्लॅटफार्मद्वारे फार्म्युला दुधाचा प्रचार; आणि अलीकडे खासगी संस्थांकडून मानवी दुधाचे संकलन व ऑनलाइन विक्री आढळून आली आहे. हा आदेश हे त्यावरील प्रशासनाचे उत्तर असल्याचे आयुक्त मुंढे यांनी सांगितले.आयुक्त मुंढे म्हणाले, हा आदेश अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ च्या कलम ३० अन्वये जारी करण्यात आला असून राज्यात प्रथमच, प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी व पदनिर्देशित अधिकारी अन्न सुरक्षा व मानके अधिनियमासोबतच शिशु दूध पर्याय, फीडिंग बाटल्स आणि शिशु अन्न (उत्पादन, पुरवठा व वितरण विनियमन) अधिनियम, १९९२ (आयएमएस अधिनियम) ची अंमलबजावणी कशी करतील हे एकाच दस्तऐवजात नमूद केले आहे. आयएमएस अधिनियमानुसार अन्न सुरक्षा अधिकारी हा प्रवेश, झडती व जप्तीचे अधिकार असलेला अधिकारी आहे आणि आयुक्तांच्या निर्देशानुसार पदनिर्देशित अधिकारी किंवा अन्न सुरक्षा अधिकारी न्यायालयात फिर्याद दाखल करतात. आयएमएस अधिनियमाच्या उल्लंघनास तीन वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा आहे.

## नाशिकच्या गोदाघाटावर अघोरी स्नान, महिलेच्या डोळ्यात लिंबाचा रस पिळला; लाखो रुपयांची फसवणूक

**धुळे :** अंधश्रद्धा निर्मुलनाचा कायदा करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. मात्र, अशोक खरात प्रकरणातूनही नागरिकांनी काही धडा घेतला नसल्याचेच चित्र पाहायला मिळत आहे. कारण, अद्यापही तांत्रिक, मांत्रिकांवर विश्वास ठेउन किंवा त्यांच्या अघोरी कर्मकांडाला बळी पडून नागरिकांची फसवणूक होत आहे. आजारपण व कौटुंबिक अडचणी दूर करण्याचे आमिष दाखवत धुळ्यातील एका गरीब मजूर कुटुंबाची नाशिकमध्ये अघोरी पूजा व जादूटोण्याच्या नावाखाली तब्बल १ लाख ६० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. दरम्यान, अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या मध्यस्थीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला. नाशिकच्या प्रसिद्ध गोदाघाटावर धुळ्यातील पीडित महिलेला अघोरी स्नान घालून तिच्या डोळ्यात लिंबाचा रस पिळण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. फसवणूक झाल्यानंतर पीडित महिलेने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी संपर्क साधला. समितीच्या कार्यकर्त्यांनी



पीडित कुटुंबाला धीर देत पोलिसांत जाण्याचे आवाहन केले. त्यानंतर २७ सप्टेंबर २०२६ रोजी धुळे शहर पोलिस ठाण्यात अघोरी प्रथा व जादूटोणा विरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात धुळे पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत नाशिकमधून मांत्रिक महिला सरिता जाधव आणि तिच्या साथीदारांना ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे. आरोपींवर विविध कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे. पीडितेच्या २१ वर्षीय मुलीवर दुर्धर आजाराचा प्रभाव असल्याचे सांगून मांत्रिक महिलेने तिला धुळ्यातील माहेरीच्या घरी सुमारे ४० दिवस ठेवण्यास भाग पाडल्याचे समोर आले. मुलीने आईच्या भीतीने लपून दिले, मात्र संकट टळेल असे सांगून तिला कुटुंबापासून दूर ठेवण्यात आले. त्यानंतर २४ जुलै २०२६ रोजी मांत्रिक महिलेने मुलीला जबरदस्तीने साखरपुडा उरकून घेतल्याचा आरोप आहे. त्यानंतर संशयितांनी पीडित कुटुंबाशी संपर्क तोडला. दरम्यान, मांत्रिक महिलेने पीडितेला गोदाघाटावर नेउन अघोरी स्नान घातले. तिच्या अंगावरून उतारलेल्या लिंबाचा रस थेट डोळ्यात पिळल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

# दुष्काळ निवारण ऊपाययोजनांसाठी जिल्हा नियोजन निधीचा प्रभावी वापर करा

- मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे
- दुष्काळजन्य परिस्थितीत प्रशासकीय यंत्रणेने युद्धपातळीवर काम करण्याचे निर्देश
- मंत्रीमंडळ उपसमिती बैठक

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या निधीचा जास्तीत जास्त वापर दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांसाठी करावा, तसेच पिण्याचे पाणी, पशुधनासाठी चारा-पाणी, पीक पंचनामे आणि शेतीसाठी पाणीपुरवठा यांना प्राधान्य देत स्थानिक प्रशासकीय यंत्रणेने युद्धपातळीवर व समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. अपु-या पावसामुळे उद्भवलेल्या दुष्काळजन्य परिस्थितीवरील उपाययोजनांसाठी स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी दुष्काळी परिस्थितीचा जिल्हानिहाय आढावा तसेच संबंधित विभागांच्या मागण्या लक्षात घेउन विविध उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**दुष्काळी परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन-** केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पर्जन्यमान, भूजल पातळी, पिकांची स्थिती यासह उपलब्ध विविध आकडेवारीचा सखोल अभ्यास करून दुष्काळी परिस्थितीचे मूल्यमापन करावे. उपलब्ध आकडेवारीच्या आधारे दुष्काळी परिस्थिती असलेल्या तालुक्यांचा सातत्याने आढावा घेउन आवश्यक ती माहिती व वस्तुनिष्ठ अहवाल शासनाकडे सादर करावा, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. दुष्काळग्रस्त भागातील प्रत्यक्ष परिस्थिती केंद्रस्थानी ठेवून १०० टक्के पिक पंचनामे करण्यात यावेत. प्रत्यक्ष पाहणी, छायाचित्रे तसेच ड्रोनद्वारे उपलब्ध होणा-या माहितीचा वापर करून तथ्याधारित अहवाल तयार करावा. पंचनाम्यांमध्ये पारदर्शकता राहावी आणि संबंधित शेतक-यांच्या स्वाक्षर्‍या घेण्यात याव्यात, याची दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले. नव्याने उपलब्ध होणा-या आकडेवारीच्या आधारे दुष्काळी परिस्थितीचा नियमित आढावा घेण्यात यावा. असेही सांगण्यात आले.दुष्काळाच्या काळात प्रशासनाची जिल्हा व तालुका पातळीवरील अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती आणि प्रभावी प्रशासकीय नियंत्रण अत्यंत महत्वाचे असल्याचे महसूल मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले. तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक तसेच तालुकास्तरीय अधिका-यांनी त्यांच्या मुख्यालयी उपलब्ध राहून नागरिकांच्या समस्या आणि दुष्काळी परिस्थितीशी संबंधित माहिती वेळेत प्रशासनापर्यंत पोहोचवावी.अधिकारी-कर्मचा-यांच्या उपस्थितीचे प्रभावी निरीक्षण करण्यासाठी फेस-आधारित उपस्थिती आणि डिजिटल म?निटरिंग यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. पाण्याचे नियोजन करताना सर्वप्रथम पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करावी. गाव तलाव, पाझर तलाव, लघु सिंचन प्रकल्प तसेच पिण्याच्या पाण्याचे स्रोत



आवश्यकतेनुसार भरून ठेवण्यावर विशेष भर द्यावा. पिण्याच्या पाण्याचे नियोजन पूर्ण करुन शेतीसाठी पाण्याचे नियोजन व वाटप करण्याबाबत जिल्हास्तरावर आढावा घेण्यात यावा. उपलब्ध पाण्याचे जिल्हानिहाय नियोजन करताना काही प्रमाणात पाणी आपत्कालीन परिस्थितीसाठी राखीव ठेवण्याबाबतही चर्चा झाली. सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देताना चारा पिके, तृणधान्ये आणि नंतर रब्बी पिकांना प्राधान्य देण्यात यावे. ज्या भागात पाण्याची उपलब्धता मर्यादित आहे, त्या भागातील शेतक-यांना रब्बी हंगामाबाबत कृषी सल्ला आगाउ देण्यात यावा.

**पाणी आरक्षणासाठी स्पष्ट धोरण**

पाणी आरक्षण व वितरणासाठी स्पष्ट निकष असलेला शासन निर्णय जारी करावा. या निर्णयाच्या अंमलबजावणीवर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील संनियंत्रण समितीमार्फत नियमित देखरेख ठेवावी, अशी सूचना बैठकीत करण्यात आली. दुष्काळी व पाणीटंचाईच्या भागात मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर करणा-या बांधकाम प्रकल्पांचाही जिल्हानिहाय आढावा घ्यावा. ज्या भागात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या आहे, तेथे स्थानिक परिस्थितीचा विचार करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश देण्यात आले.

## संपादकीय

### प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# निवडणूक आयोगाची परीक्षा

निवडणूक ही लोकशाहीची केवळ एक प्रशासकीय प्रक्रिया नाही तर जनतेच्या सार्वभौम अधिकाराचे प्रकटीकरण असल्याने मतदारयादीतील प्रत्येक नाव आणि प्रत्येक पात्र मतदाराचा मतदानाचा अधिकार हा लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. याच कारणामुळे निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या मतदार यादीच्या विशेष सखोल पडताळणी (एसआयआर) प्रक्रियेभोवती निर्माण झालेली चर्चा गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. मात्र, या चर्चेत आरोप आणि तथ्य यांच्यातील सीमारेषा कायम ठेवणे त्याहून अधिक आवश्यक आहे. निवडणूक आयोगाने गैरप्रकार केल्याचा दावा करत विरोधी पक्षांनी निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना आता लक्ष्य केले आहे. त्यांना त्यांच्या पदावरून हटवण्यासाठी त्यांच्याविरोधात महाभियोग आणण्याची तयारी विरोधी पक्षांनी चालवली आहे. निवडणूक आयुक्त सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी यांनी गेल्या दहा महिन्यांत आयोगाच्या काही निर्णयांबाबत किमान १४ वेळा लेखी आक्षेप नोंदवल्याच्या वृत्ताने विरोधी पक्षांच्या धांदलीला बळ मिळाले आहे. एसआयआरच्या निमित्ताने सुरू झालेला गदारोळ या सगळ्याचा केंद्रबिंदू आहे. नव्या मतदारांच्या नोंदणीसाठीच्या फॉर्ममधील बदल, मतदारयादीच्या डेटाबेसच्या प्रवेशाचे केंद्रीकरण, मतदारांची नावे वगळण्याची प्रक्रिया आणि काही प्रशासकीय निर्णय यासंदर्भात दोघा अधिकाऱ्यांनी प्रश्न उपस्थित केल्याचे वृत्त आहे. हे आक्षेप समोर आले म्हणून निवडणूक आयोगाने बेकायदेशीर काम केले, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. त्याचप्रमाणे दोन आयुक्तांनी आक्षेप घेतले म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणेही योग्य नाही. लोकशाही संस्थांमध्ये मतभिन्नता असणे ही कमजोरी नसते. उलट निर्णय घेण्यापूर्वी विविध मतांचा विचार होणे ही संस्थात्मक तपासणीची महत्त्वाची प्रक्रिया असते. मुळात एसआयआरचा मूलभूत उद्देश काय आहे, हे प्रथम समजून घेतले पाहिजे. मतदारयादीत पात्र नागरिकांची नावे राहावीत आणि अपात्र, मृत, स्थलांतरित, घुसखोर किंवा दुवार नोंदी दूर व्हाव्यात हा त्यामागील प्रशासकीय हेतू आहे. सर्वोच्च न्यायालयाने बिहारमधील एसआयआरशी संबंधित प्रकरणात मतदारयादीची अचूकता, पूर्णता आणि विश्वासार्हता राखणे हा निवडणूक आयोगाच्या घटनात्मक जबाबदारीशी संबंधित वैध उद्देश असल्याचे स्पष्ट केले. त्याचबरोबर पात्र मतदारांना वगळले जाणार नाही यासाठी नोटीस, कागदपत्रे आणि अपीलाची संधी यांसारख्या संरक्षणात्मक तरतुदी महत्त्वाच्या असल्याचेही न्यायालयाने नोंदवले. म्हणजेच एसआयआरचा कारभार संशयास्पद आहे असे म्हणण्याला सध्याच्या न्यायालयीन भूमिकेत थेट आधार मिळत नाही. उलट मतदारयादी अचूक ठेवणे ही आयोगाची मूलभूत जबाबदारी असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले आहे. त्यामुळे मतदारयादीची पडताळणी सुरू केली म्हणूनच आयोगावर संशय घेणे योग्य ठरणार नाही. प्रक्रिया किती पारदर्शक आहे, पात्र मतदाराला आपले नाव कायम ठेवण्यासाठी पुरेशी संधी मिळते का, तांत्रिक यंत्रणेमध्ये चुका झाल्यास त्या दुरुस्त करण्याची व्यवस्था आहे का आणि स्थानिक पातळीवरील निवडणूक अधिकाऱ्यांना आवश्यक अधिकार मिळतात का, हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. निवडणूक आयोग हा बहुसदस्यीय घटनात्मक आयोग आहे. २०२३च्या कायद्यानुसार आयोगाचे काम शक्य तितक्या प्रमाणात एकमताने चालवायचे आहे; मात्र मतभेद झाल्यास बहुमताने निर्णय घेण्याची तरतूद आहे. त्यामुळे आयुक्तांमध्ये मतभेद झाले म्हणजे घटनात्मक व्यवस्था कोलमडली, असा अर्थ होत नाही. प्रश्न असा आहे की अंतिम निर्णय कायदेशीर प्रक्रियेनुसार आणि आयोगाच्या अधिकृत निर्णयप्रक्रियेतून झाला का? याबाबत निवडणूक आयोगाची भूमिका स्पष्ट आहे. अलिकडेच आयोगाने म्हटले की आयुक्तांकडून नोंदविल्या जाणाऱ्या टिप्पण्या, निरीक्षणे आणि तांत्रिक सूचना या संस्थात्मक चर्चेचा भाग आहेत आणि एसआयआरसह आयोगाचे अंतिम निर्णय पूर्ण आयोगाच्या एकमताने झाले आहेत. आयोगाने एसआयआरशी संबंधित आदेशांना कायदेशीर मान्यता असल्याचे स्पष्ट केले. म्हणूनच आता खरी गरज आरोप-प्रत्यारोपांची नसून कागदपत्रे आणि प्रक्रियेची आहे. निवडणूक आयोगाला लक्ष्य करण्याचा प्रश्नही याच संदर्भात पाहावा लागेल. विरोधकांनी एसआयआरवर गंभीर आरोप केले आहेत. मतदारांची नावे मोठ्या प्रमाणावर वगळली जात असल्याचा, आयोगाच्या कामकाजात पारदर्शकता नसल्याचा आणि आयोगाच्या अंतर्गत निर्णयप्रक्रियेवर प्रश्नचिन्ह असल्याचा त्यांचा दावा आहे. हे आरोप र हे आरोप राजकीयदृष्ट्या तीव्र असले तरी प्रत्येक आरोप हा आपोआप सिद्ध ठरत नाही. त्यासाठी मतदार यादीतील प्रत्यक्ष नोंदी, वगळलेल्या मतदारांची कारणे, सुनावणीची प्रक्रिया, अपीलचे निकाल आणि संबंधित अधिकाऱ्यांचे निर्णय यांचा पुराव्याच्या आधारे अभ्यास करणे आवश्यक आहे. मतदारयादी ही कोणत्याही पक्षाची मालमत्ता नसून मतदारांच्या घटनात्मक अधिकाराशी संबंधित सार्वजनिक नोंद आहे. पात्र नागरिकाचे नाव चुकीने वगळले गेले तर तो केवळ प्रशासकीय दोष राहत नाही; त्याचा थेट परिणाम मतदानाच्या अधिकारावर होतो. यासाठीच आयोगाने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. कारण एसआयआरचा उद्देश केवळ अपात्र नावे काढणे नसून पात्र मतदारांची नावे सुरक्षित ठेवणे हाही तितकाच महत्त्वाचा भाग आहे. सर्वोच्च न्यायालयानेही आपल्या निर्णयात पात्र मतदारांना वगळले गेल्यास न्यायालयीन पुनरावलोकनाची संधी उपलब्ध असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे एसआयआरकडे 'मतदार कमी करण्याची मोहीम' म्हणून पाहणे किंवा 'मतदारयादी शुद्ध करण्याची निर्विवाद प्रक्रिया' म्हणून पाहणे दोन्ही टोकाच्या भूमिका ठरू शकतात. खरी कसोटी प्रत्यक्ष अंमलबजावणीची आहे. विरोधकांनी केलेल्या आरोपांची चौकशी व्हावी का? नक्कीच. जर ते विशिष्ट कागदपत्रे, नोंदी किंवा प्रक्रियात्मक त्रुटींवर आधारित असतील तर. न्यायालयीन निर्णय, आयोगाचे अधिकृत आदेश, आयुक्तांचे लेखी आक्षेप आणि मतदारयादीतील प्रत्यक्ष आकडे या चारही आधारांवर या संपूर्ण वादाकडे पाहिले पाहिजे. शेवटी निवडणूक आयोग हा कोणत्याही सत्ताधारी पक्षाचा किवा विरोधी पक्षाचा आयोग नसतो. तो मतदारांचा आयोग असतो. त्यामुळे त्याच्यावर टीका झाली तर ती तथ्यांच्या आधारे तपासली पाहिजे आणि आयोगावर विश्वास ठेवायचा असेल तर तो पारदर्शक कामकाजातून निर्माण झाला पाहिजे.

---

# दुष्काळाचे संकट आणि उपाययोजना

**यंदा महाराष्ट्राच्या अनेक भागांत दुष्काळाचे संकट ओढवले आहे. विशेषतः मराठवाड्यात परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. दुष्काळाचा परिणाम ग्रामीण रोजगार, स्थलांतर, अन्नधान्याच्या किमती आणि एकूणच अर्थव्यवस्थेवर होतो. या पार्श्वभमीवर कृषी, जलसंपदा, महसूल, ग्रामीण विकास आणि वित्त या विभागांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे.**

✍ **मोहन एस. मते**

महाराष्ट्रातील दुष्काळाचे संकट दिवसेंदिवस अधिक गंभीर होत चालले असून, राज्यातील कृषी उत्पन्नावर मोठे सावट पसरले आहे. देशातील ऊस, सोयाबीन आणि कापूस उत्पादनात अग्रस्थानी असलेल्या राज्यात या भीषण दुष्काळामुळे अन्नधान्य आणि नगदी पिकांसह उर्वरित शेती पिकांचे अतोनात नुकसान होत आहे. खरीप हंगामातील प्रमुख पिके करपून गेल्यामुळे शेतकरी बांधव मोठ्या आर्थिक संकटात सापडले असून, एकूणच ग्रामीण अर्थव्यवस्था हादरली आहे. मान्सूनच्या परतीचे दिवस जवळ आले असतानाही अनेक भागांत पावसाची तूट लक्षणीय प्रमाणात आहे. धरणांमधील पाणीसाठा घटत असून, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत पिके पाण्याअभावी करपत आहेत. शेतकरी आत्महत्यांची वाढती संख्या कृषी क्षेत्रातील संकटाची तीव्रता स्पष्ट करणारी आहे.

भारतीय शेती नेहमीच मान्सूनकेंद्री राहिली आहे. त्यानुसार खरीप हंगामातील बहुतांश पिकांची पेरणी ही जूनच्या मध्यापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असते. पावसाचे आगमन वेळेस झाले, तर जमिनीतील ओलावा बियाण्यांची उगवण आणि पिकांच्या वाढीचा प्रारंभिक टप्पा सुरक्षित पार पडतो; परंतु पाऊसच उशिरा आल्यास किंवा सुरुवातीला पडून नंतर दीर्घ खंड पडल्यास संपूर्ण पीक नियोजन विस्कळीत होते. अनेक वेळा शेतकरी पहिल्या पावसावर पेरणी करतात; पण त्यानंतर पुरेसा पाऊस न झाल्यास उगवलेली पिके करपतात. त्यामुळे बऱ्याचदा पुनर्पेरणीचा खर्च त्यांच्या माथी येतो.

शेतकऱ्याचा व्यवसाय हा शेतावर आणि नशिबावर चालत असतो. नशीब चांगले असेल, तर शेतातून मोतीसुद्धा पिकतात आणि त्यांनी केलेल्या कष्टाला खऱ्या अर्थाने फळ येते; मात्र ज्यावेळी कष्ट करूनही निसर्ग साथ देत नाही, त्यावेळी मोत्याऐवजी शेतातील पिके मातिमोल होतात. कोणतेही नैसर्गिक संकटे सांगून येत नाही. केवळ पावसात खंड पडण्याने नव्हे, तर नुसत्या ढगाळ वातावरणामुळेसुद्धा पिकावर रोगराई पडते. हजारो रुपये खर्च करून पेरलेले बियाणे आणि तितकीच रक्कम टाकून केलेले खतपाणी अक्षरशः वाया जाते. यंदा तर जूनमध्ये मान्सूनच्या आगमनाची प्रतीक्षा, जुलैमध्ये काही भागांत समाधानकारक पाऊस आणि त्यानंतर ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये पावसाची प्रदीर्घ ओढ, अशा विचित्र परिस्थितीने खरीप हंगाम संकटात सापडला आहे. पेरणीसाठी कर्ज काढणारा शेतकरी आता उभे पीक वाचवण्यासाठी धडपडत आहे. भारतीय हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात सरासरीपेक्षा १७ टक्के कमी पाऊस झाला आहे. या कालावधीत अपेक्षित ९५३.२ मिलिमीटर पावसाच्या तुलनेत प्रत्यक्षात केवळ ७८७.२ मिलिमीटर पाऊस नोंदवण्यात आला; मात्र राज्यातील पावसाचे वितरण अत्यंत असमान आहे. अहिल्यानगरमध्ये ४२ टक्के, सोलापूरमध्ये ५७ टक्के, सांगलीमध्ये २४ टक्के आणि नंदुरबारमध्ये ३४ टक्के पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे. आता मान्सून परतण्याच्या मार्गावर असल्याने रब्बी हंगामाचीही चिंता उभी राहिली आहे.

मागील चार-पाच वर्षांचा 'ला निना'चा काळ वगळता मराठवाडा हा दुष्काळी प्रदेश म्हणूनच ओळखला जात असे. २०१५ च्या दुष्काळात लातूरला रेल्वेने पाणी द्यावे लागल्याची कटू आठवण आजही कायम आहे. महाराष्ट्राने त्यापूर्वीही अनेक दुष्काळ पाहिले. त्यापैकी १९७२ चा दुष्काळ सर्वांत भीषण होता; पण यंदा मराठवाड्याची परिस्थिती १९७२ पेक्षाही भयंकर असल्याचे दिसते. सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात या विभागात सरासरीच्या केवळ ७१ टक्के पाऊस झाला होता. मराठवाड्यातील एकूण पर्जन्यतूट ३५ टक्के आहे.



परिणामी, येथील धरणांमध्ये केवळ ४६.१९ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. पाणीटंचाईमुळे अवघ्या दोन आठवड्यांत टँकरची संख्या जवळपास दुप्पट झाली आहे. पावसाळा संपण्यापूर्वीच पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची आवश्यकता निर्माण होणे, ही पुढील उन्हाळ्यातील संभाव्य भीषण संकटाची पूर्वसूचना आहे. यामुळे धरणातील पाणीसाठा फक्त पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील धरणांमध्ये सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात सरासरी ७६ टक्के पाणीसाठा होता. गेल्या वर्षी याच काळात तो ८७.६५ टक्के होता. म्हणजेच गतवर्षीच्या तुलनेत पाणीसाठ्यात ११.६५ टक्क्यांची घट झाली आहे. ही परिस्थिती पाणीपुरवठा, औद्योगिक वापर आणि सिंचनाच्या नियोजनासाठी चिंताजनक आहे. पिकांच्या वाढीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आवश्यक तेवढा पाऊस मिळणे महत्त्वाचे असते. सुरुवातीला पेरणीयोग्य पाऊस झाल्यानंतर दीर्घ खंड पडल्यास उगवलेली पिके करपतात. शेतकऱ्याला दुबार पेरणी करावी लागते. बियाणे, खते, मजुरी आणि मशागतीवर केलेला खर्च वाया जातो. महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतीसमोरील हे जुने संकट यंदा पुन्हा उग्र स्वरूपात समोर आले आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग आणि मका यांसारख्या पिकांना पावसाच्या अनियमिततेचा फटका बसला आहे. अनेक भागांत उत्पादनात घट होण्याची भीती निर्माण झाली आहे.

मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्यांची ताजी आकडेवारी कृषी संकटाची तीव्रता अधोरेखित करते. जानेवारी ते ऑगस्ट २०२६ या आठ महिन्यांत या विभागात ६५३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. त्यापैकी १८८ आत्महत्या जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांत झाल्या. बीड आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक घटना नोंदवण्यात आल्या आहेत. दुसरीकडे, अमरावती विभागात वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांतच ४१५ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली होती. या घटनांमागील कारणे वेगवेगळी असली, तरी शेतीतील आर्थिक असुरक्षितता, सिंचनाचा अभाव आणि उत्पन्नातील अनिश्चितता यांसारख्या प्रश्नांवर दीर्घकालीन उपाययोजनांची आवश्यकता या आकडेवारीमुळे पुन्हा अधोरेखित होते.

दुष्काळाचे गांभीर्य लक्षात घेऊन स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाडा दौरा करून बळीराजासाठी सर्व काही करू, सगळ्यांची कर्जमाफी झाल्याशिवाय थांबणार नाही असा निर्धार व्यक्त करतानाच दुष्काळाची अधिसूचना काढण्याचे आश्वासन दिले आहे. राज्याचे प्रमुख या नात्याने त्यांनी दिलेले हे आश्वासन संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणारे आहे. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मंत्रिमंडळ उपसमितीही स्थापन करण्यात आली आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. याबरोबरच आता राज्यातील सर्व महसुली विभागांमध्ये बैठका घेऊन उपाययोजनांसाठी निर्णय घेतले गेले पाहिजेत. नुकत्याच काही विभागांत पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील निवडणुका जाहीर झाल्याने आचार संहिता सुरू झाली आहे. हे लक्षात घेता शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी आचारसंहिता काळात अडचणी निर्माण होऊ नये म्हणून केंद्रीय निवडणूक आयोगाकडे विनंती करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण जिल्ह्यांमधील काही गावे व पंचक्रोशीत सातत्याने सरासरीपेक्षा कमी पाऊस पडतो. त्यामुळे तेथील दुष्काळ व अवर्षणाची स्थिती संपत नाही. कारण, तिथे पिण्याच्या पाण्यासाठी मारामार होते, तिथे शेती कशाची? अशी परिस्थिती वर्षानुवर्षे उद्‌भवते. महाराष्ट्रात साधारणपणे दर सहा ते आठ वर्षांनी दुष्काळाचा फेरा येतो. त्यात सुमारे ३५ ते ६० टक्के ग्रामीण जनता निश्चितपणे होरपळून निघते. याशिवाय दर दोन-चार वर्षांनी छोटे सूक्ष्म स्थानिक असे दुष्काळ पडत असतात. त्याचबरोबर जी वर्षे अधिकृतपणे दुष्काळी नसतात किंवा चांगल्या पावसाची असतात अशा वर्षातदेखील राज्यातील किमान ४ ते २० टक्के खेडी दुष्काळात होरपळत असतात.

राज्य सरकारने जून २०२६ मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेला मंजुरी दिली. कर्जमाफीमुळे पात्र शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळू शकतो; मात्र एखाद्या वर्षी कर्जमाफी मिळाल्यानंतर पुढील हंगामात पुन्हा दुष्काळ पडला, तर शेतकऱ्याला पुन्हा कर्ज घ्यावे लागते. याशिवाय, कर्जमाफीच्या पात्रतेबाहेर राहणाऱ्या शेतकऱ्यांचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. सावकारांकडून कर्ज घेणारे, अल्पभूधारक, भाडेतत्त्वावर शेती करणारे आणि शेतमजूर यांच्या आर्थिक अडचणींचाही विचार होणे आवश्यक आहे. महाराष्ट्राला दुष्काळाचा दीर्घ इतिहास आहे.

विशेषतः मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांना वारंवार पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. प्रत्येक वेळी पाऊस कमी पडला की, टँकर, चारा छावण्या, कर्जमाफी आणि नुकसानभरपाई या उपायांसाठी सरकारला धावपळ करावी लागते; मात्र पुढील वर्षी पुन्हा तीच परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी दीर्घकालीन नियोजन आवश्यक आहे. विशेषतः कोरडवाहू शेतीसाठी स्वतंत्र धोरणात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे. पाऊस पडणे आपल्या हाती नसले, तरी उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे हे निश्चितच आपल्या हातात आहे. पाण्याचा काटकसरीने वापर व्हावा आणि पाण्याचे महत्त्व समजावे यासाठी महाराष्ट्र राज्याच्या २००३ च्या मध्ये जलनीतीमध्ये अंतर्भूत करण्यात आले आहे.

शेती प्रणालीचा अतिशय द्रुतगतीने अंगीकार करण्याची अधिक गरज आहे. अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इटली या प्रगत देशांत ७५ ते ८० टक्के शेती आधुनिक सिंचन प्रणालींचा वापर करून केली जाते. इस्रायलमध्ये तर १०० टक्के शेती अशा सिंचन प्रणालीखाली आहे.

महाराष्ट्रात आजमितीस हे क्षेत्र अधिक वाढणे गरजेचे आहे. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन करून त्यावर विकसित केलेले आदर्श प्रारूप राबवून ती गावे पथदर्शी प्रकल्प म्हणून विकसित करण्याची गरज आहे. पाण्याच्या प्रत्येक थेंबात विकासाचे सामर्थ्य आहे. यातून राज्याच्या विकासाचे नवनवे अध्याय आपण निर्माण करू शकू. संपूर्ण ग्रामीण आर्थिक व्यवस्था सुधारण्यासाठी उत्तम विश्वसनीय सिंचन व्यवस्था ही यशाची गुरुकिल्ली आहे. सध्या राज्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. सिंचन क्षेत्र वाढवण्याबरोबरच कमी पाण्यात उत्पादन देणाऱ्या पिकांचे संशोधन, सुधारित बियाणे, कृषी प्रक्रिया उद्योग आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे पर्यायी स्रोत विकसित करणे महत्त्वाचे ठरेल. दुष्काळाचे परिणाम ग्रामीण रोजगार, स्थलांतर, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, अन्नधान्याच्या किमती आणि राज्याच्या एकूण अर्थव्यवस्थेवर होतात. त्यामुळे कृषी, जलसंपदा, महसूल, ग्रामीण विकास आणि वित्त या विभागांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीत तातडीची मदत आवश्यक आहेच; मात्र त्याचबरोबर पुढील दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी सातत्यपूर्ण गुंतवणूक आणि नियोजनही गरजेचे आहे.

दुष्काळ जाहीर करण्याची प्रशासकीय प्रक्रिया आणि शेतकऱ्यांपर्यंत प्रत्यक्ष मदत पोहोचणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. पिकांचे नुकसान झाल्यानंतर अनेकदा पंचनामे, अहवाल, मंजुरी आणि निधी वितरण यांमध्ये मोठा कालावधी जातो. वेळीच आर्थिक मदत उपलब्ध झाली नाही, तर सरकारी घोषणांचा अपेक्षित फायदा मिळत नाही. त्यामुळे नुकसानभरपाईचे वितरण कालबद्ध पद्धतीने करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर पीक विम्याच्या दाव्यांचा निपटारा, रब्बी हंगामासाठी आवश्यक कर्जपुरवठा आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन यांना प्राधान्य द्यावे लागेल.

---

# हा कोणता न्याय?

✍ **शेखर दत्त**

लोकांना काँग्रेसचा द्वेष करायला शिकवण्यात आले. काँग्रेस भ्रष्ट आहे, असा मोठ्या प्रमाणावर प्रचार करण्यात आला. आणि भ्रष्टाचार करणाऱ्यांना शिक्षा करण्यासाठी भाजप सत्तेत आला, असा विश्वास निर्माण झाला. मी भाजपला मतदान केले. माझ्या संपूर्ण कुटुंबानेही भाजपला मतदान केले. पण, ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले, त्यापैकी प्रत्यक्षात किती जण दोषी ठरले आणि तुरुंगात गेले? याउलट, आरोप असलेले अनेक जण पक्ष बदलून सत्तेतच राहिले. आजही ते सत्तेत आहेत. पण काँग्रेसबद्दलचा द्वेष मात्र कायम राहिला. हे सगळे इतके अवास्तव वाटू लागले की मनात प्रश्न निर्माण झाला, हा द्वेष जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आला होता का? हळूहळू असे वाटू लागले की योग्य काय आणि अयोग्य काय, याला महत्त्वच उरले नाही. महत्त्वाचे ठरले ते फक्त आपण कोणाचा द्वेष करतो.

योग्य-अयोग्याचे रूपांतर प्रेम-द्वेषात झाले. ज्यांच्यावर प्रेम केले जात होते, त्यांना प्रश्न विचारणे बंद झाले. आणि ज्यांचा द्वेष केला जात होता, त्यांच्याकडूनच सतत उत्तरदायित्वाची मागणी केली जाऊ लागली. आपला आवडता माणूस जे काही करतो ते नेहमीच योग्य, आणि ज्याचा आपण द्वेष करतो तो जे काही करतो ते नेहमीच चुकीचे अशी मानसिकता तयार झाली. या सगळ्यात तर्कशक्तीचा पराभव झाला. आणि त्याची किंमत भारताने मोजली.

बारा वर्षे पुढे येऊन आजचा दिवस पाहिला, तर परिस्थिती आणखी अस्वस्थ करणारी वाटते. आज काही प्रभावशाली लोक मुलींना स्वतःच्या सुरक्षेसाठी एअरगन बाळगण्याचा सल्ला देताना दिसतात.

मंत्री कॅमेऱ्यासमोर एखाद्याला थप्पड मारताना दिसतात आणि ती थप्पड मारणे योग्यच होते, असे स्वतः समर्थन करतात. आणि विरोधकांचा द्वेष करणारे लोक त्या मंत्र्याच्या कृतीचं समर्थन करतात. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या ÿएए अधिकाऱ्यांना लोकांच्या हितासाठी काम केल्यामुळे किंवा मंत्र्यांच्या अहंकारापुढे न झुकल्यामुळे बाजूला केले जात असल्याचे दिसते.

देशाच्या कथित आर्थिक प्रगतीचे फायदे सामान्य जनतेपर्यंत समान प्रमाणात पोहोचत नसताना, संपत्तीचे केंद्रीकरण मोजक्या लोकांच्या हातात वाढत चालले आहे.

आपल्या सर्वोच्च संस्थांवरील विश्वास कमी होत चालला आहे. राजकीय विरोधकांवर छापे पडणे ही जणू आता अपेक्षितच गोष्ट झाली आहे. आणि सामाजिक ऐक्यही अत्यंत खालच्या पातळीवर पोहोचल्याचे जाणवते.

हे सगळे कशामुळे? कारण आपण योग्य गोष्ट ही योग्य म्हणून आणि चुकीची गोष्ट ही चुकीची म्हणून पाहणे थांबवले. त्याऐवजी आपण प्रत्येक गोष्ट अशी पाहू लागलो ही गोष्ट आपल्या आवडत्या व्यक्तीने केली आहे की आपल्या द्वेषाच्या व्यक्तीने? आपला आवडता माणूस काहीही करो, तो योग्यच.

आणि ज्याचा आपण द्वेष करतो, तो काहीही करो, तो चुकीचाच.

आपले मत खरंच काही फरक पाडते का, असा प्रश्न आता पडतो. आपला असहमतीचा आवाजही अनेकदा देशविरोधी म्हणून हिणवला जातो. आणि त्यामुळे काळ आणखी अंधकारमय होत चालल्यासारखा वाटतो. पण कदाचित यावर उपाय एकच आहे ज्यांच्यावर आपण प्रेम करतो, त्यांनाच प्रश्न विचारणे. त्यांच्याकडूनही उत्तरदायित्वाची मागणी करणे.

कारण ते फक्त आपल्या आवडत्या व्यक्ती नाहीत. ते सरकार आहेत. आणि जे लोक सरकारवर प्रेम करतात, तेच जर सरकारला प्रश्न विचारू लागले, तर मोठा बदल घडू शकतो. कारण आपल्या देशावर प्रेम करण्याचा आणि खऱ्या अर्थाने राष्ट्रवादी असण्याचा यापेक्षा मोठा मार्ग कोणता? आपल्या आवडत्या लोकांनाही प्रश्न विचारा. योग्य ते योग्य आणि चुकीचे ते चुकीचेच म्हणा. कारण सरकार कोणाचेही असो, देश सरकारपेक्षा मोठा आहे. आणि आपल्या देशासाठी तुम्ही करू शकणारी सर्वात राष्ट्रवादी आणि प्रेमळ गोष्ट म्हणजे ज्यांच्यावर प्रेम करता, त्यांनाही उत्तरदायी ठेवा.

---

# धरणाचे स्ट्रक्चरल ऑडिट.. स्तुत्य निर्णय

महाराष्ट्रात सिंचन धरणांची संख्या ५४१० एवढी मोठी आहे. सध्या ही धरणे पिण्याच्या पाण्याची गरज, शेतीसाठी पाणीपुरवठा तसेच औद्योगिक वापरासाठी पाणी पुरवितात. काही धरणे वीज निर्मिती सुद्धा करतात. यातली अनेक धरणे जुनी आहेत कित्येकांचे आयुष्य तब्बल १०० वर्षाच्या पुढे आहे. अशा धरणाची सुरक्षितता तपासणे ही काळाची गरज आहे.

सिमेंट ग्राऊटींग, तसेच दरवाजे दुरुस्ती इत्यादी कामे करणे आवश्यक ठरते. आता सरकार धरणांच्या दुरुस्तीसाठी स्ट्रक्चरल ऑडिट करणार आहे.

या ऑडिट मधून धरणाच्या दुरुस्तीची गरज लक्षात येणार आहे. संभाव्य धोके टाळण्यासाठी हे आवश्यक होते. सरकारचा हा निर्णय अत्यंत स्तुत्य आहे. या ऑडिटच्या आधारे दुरुस्तीची कामे केली जाणार आहेत तसेच हे ऑडिट थर्ड पार्टी कडून केले जाणार आहे.

**शांताराम वाघ**

बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# शिक्षक मतदारसंघाची निवडणूक रणधुमाळी सुरू, यवतमाळात 6,533 मतदारांसाठी 18 केंद्रे

## २३ ऑक्टोबरला मतदान जिल्हाधिकारी विकास मीना यांची पत्रकार परिषदेत माहिती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २९ :** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६चा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला असून, अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा या पाचही जिल्ह्यांत आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

याबाबत जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पत्रकार परिषद घेऊन निवडणूक कार्यक्रम व यवतमाळ जिल्ह्यातील मतदान व्यवस्थेची सविस्तर माहिती दिली. यावेळी निवडणूक आयोगाचे यवतमाळ येथील कर्मचारी उपस्थित होते. विद्यमान सदस्य किरण रामराव सरनाईक यांची मुदत ६ डिसेंबर २०२६ रोजी संपत असल्याने ही निवडणूक होत आहे. २९ सप्टेंबरला अधिसूचना प्रसिद्ध झाली असून, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ६ ऑक्टोबर, छाननी ७ ऑक्टोबर, तर अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर आहे. २३ ऑक्टोबरला सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान, तर २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे. यवतमाळ जिल्ह्यात शिक्षक मतदारसंघासाठी ६ हजार ५३३ मतदार असून १८ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. ही केंद्रे तहसील कार्यालयांच्या स्तरावर राहणार आहेत. यवतमाळ तहसीलमध्ये दोन केंद्रांवर अनुक्रमे ६८७ व ७०२ मतदार आहेत. पुसदमध्ये ५४१ व ४८५, उमरखेड ६०८, वणी ५७८, दिग्रस ४६३, केळापूर ३८७, अर्णी ३४८, घाटंजी ३४७, दारव्हा ३४४, नेर २२१, मारेगाव १९१, महागाव १८५, राळेगाव १८०, कळंब ९७, झरी-जामणी १०२ आणि बाभूळगाव ६७ मतदार आहेत.

### ट्रिगर-१ ते ट्रिगर-३ पर्यंतच्या निकषांनुसार होणार तपासणी..

**जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शासनाने ट्रिगर-१ अंतर्गत उपाययोजना सुरू केल्या आहेत. मात्र, दुष्काळी मदत व सवलतींचा लाभ देताना शासनाने निर्धारित केलेल्या विविध निकषांनुसार परिस्थितीची पडताळणी केली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पत्रकार परिषदेत दिली. दुष्काळाची तीव्रता निश्चित करण्यासाठी ट्रिगर-१ ते ट्रिगर-५ पर्यंत शासनाने विविध तपासण्या व निकष निश्चित केले आहेत. पावसाचा खंड, पिकांची प्रत्यक्ष स्थिती, उत्पादनातील घट आणि अन्य निर्धारित बाबींच्या आधारे मूल्यमापन केले जाणार आहे. या प्रक्रियेत निकषांची पूर्तता आणि प्रत्यक्ष पाहणीच्या निष्कर्षा नुसार लाभार्थी निश्चित होण्याची शक्यता असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. पीक कापणी प्रयोग तसेच पंचनाम्यांच्या माध्यमातून पिकांचे नुकसान व उत्पादनातील घट याची पडताळणी केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या पाहणीवेळी पिकांची वास्तविक स्थिती अचूकपणे नोंदवून घेण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दुष्काळी सवलती व आर्थिक मदतीबाबत अंतिम पात्रता संबंधित शासन निर्णय आणि निर्धारित निकषांनुसार निश्चित होणार असल्याने शेतकऱ्यांनी प्रशासनाकडून मिळणाऱ्या अधिकृत सूचनांकडे लक्ष ठेवावे.**

दरम्यान, मतदारयादी संदर्भातील आकडेवारीही चर्चेचा विषय ठरत आहे. जिल्ह्यात १ लाख २१ हजार ९९८ अनमॅप्ड मतदार, तर १ लाख ५८ हजार ३९७ मॅप्ड मतदारांमध्ये विसंगती असल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे. यासंदर्भात नोटिसा बजावण्याची प्रक्रिया सुरू आहे. निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर निश्चित करण्यात आली असून, सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, मतदार व प्रशासकीय यंत्रणांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



# ४८ वेळा रक्तदान, २० वर्षांची अखंड सेवा!

### संजय बिजोरे पाटील यांना 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६'

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २९ :** रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर मदत मिळावी, या सामाजिक जाणिवेतून तब्बल दोन दशकांपासून रक्तदानाची अखंड सेवा बजावणारे उमरखेड येथील संजय तुकाराम बिजोरे पाटील यांना 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६' या राज्यस्तरीय सन्मानाने गौरविण्यात आले. बी दि चेंज फाउंडेशन, शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर यांच्या वतीने रविवार, २७ सप्टेंबर रोजी शिर्डी येथे आयोजित सोहळ्यात त्यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. बिजोरे पाटील यांनी २००६ मध्ये रक्तदानाचा संकल्प केला. त्यानंतर आजवर त्यांनी तब्बल ४८ वेळा रक्तदान केले आहे. गरजू रुग्णांना रक्त मिळवून देण्यासोबतच त्यांच्या नातेवाईकांना आवश्यक मदत मिळावी, यासाठीही ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. रक्तदानाबाबत जनजागृती करत त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्यांच्या दोन दशकांच्या निस्वार्थ सेवेमुळे अनेकांना प्रेरणा मिळाली असून, या राज्यस्तरीय सन्मानाबद्दल तालुक्यातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## थोडक्यात



### महिलांच्या संरक्षण कायद्याबाबत जनजागृती कार्यक्रम संपन्न

**पांढरकवडा (जि. यवतमाळ) :** शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केळापूर (पांढरकवडा) येथे महिलांच्या संरक्षणाशी संबंधित कायदे तसेच कार्यस्थळी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध, प्रतिबंधक व निवारण कायदा (POSH Act) याबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाच्या महिला तक्रार निवारण समितीच्या प्रभारी डॉ. सुजाता शेंडे यांनी केले. कार्यक्रमादरम्यान महिलांच्या सुरक्षिततेशी संबंधित विविध कायदे, POSH Act, महिलांचे कायदेशीर अधिकार, कार्यस्थळी लैंगिक छळाची व्याख्या, तसेच तक्रार निवारणाची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. महिलांनी व विद्यार्थिनींनी आपल्या हक्कांविषयी जागरूक राहणे, कोणत्याही प्रकारच्या लैंगिक छळाविरोधात आवाज उठविणे आणि उपलब्ध तक्रार निवारण यंत्रणेचा योग्य पद्धतीने वापर करणे, याबाबत माहिती देण्यात आली. विद्यार्थिनींमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण करणे, त्यांच्या सुरक्षिततेबाबत संवेदनशीलता वाढविणे आणि महाविद्यालयात सुरक्षित व सन्मानपूर्ण वातावरण निर्माण करणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



### रांगोळीतून 'सशक्त भारत' व सेवापूर्ती पंधरवड्याचा जागर., स्वच्छता व विकसित भारताचा संदेश

**घाटंजी :** सेवापूर्ती पंधरवडा तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त घाटंजी शहरातील शिवाजी चौक व घाटी परिसरात भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महिला व युवतींनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध सामाजिक विषयांसह केंद्र व राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचे चित्रण रांगोळीतून केले. महिला सक्षमीकरण, स्वच्छता, डिजिटल भारत, आत्मनिर्भर भारत, जनकल्याणकारी योजना आणि विकसित भारताचा संकल्प अशा विविध विषयांवरील रांगोळ्यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. रंगांच्या माध्यमातून शासकीय योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. रांगोळी स्पर्धेमुळे शिवाजी चौक व घाटी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. सहभागी स्पर्धकांनी कलात्मकता आणि सामाजिक जाणीवेचा सुरेख मिलाफ साधला. स्पर्धेच्या संयोजिका लता ठाकरे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी साधना माडूरवार, सोनल ठाकरे, नम्रता मंगाम, भारती कुंटलवार, सुषमा खांडरे, वनिता खांडरे, विश्वास राऊत, रवी भोजवार, अभिजित झाडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

### डासांचा कहर फॉगिंग मशीन बंद असल्याने नागरिकांचा संताप

**नाले, साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती, डेंग्यू-मलेरियाचा धोका वाढला**

**महागाव :** शहरातील विविध भागांत डासांचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नाले, साचलेले पाणी आणि अस्वच्छ परिसरामुळे डासांची उत्पत्ती वाढत असून डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनियासह साथीचे आजार पसरण्याची भीती व्यक्त होत आहे.

डासांचा वाढता उपद्रव लक्षात घेता नगरपंचायतीने केवळ आश्वासनांवर न थांबता फॉगिंग मशीनचा प्रभावी वापर करून धूर फवारणी तातडीने सुरू करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. तसेच आवश्यक ठिकाणी कीटकनाशक फवारणी करून नाले व साचलेल्या पाण्याची स्वच्छता करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते अविनाश नरवाडे, स्वप्नील नरवाडे, विवेक नरवाडे यांच्यासह नागरिकांनी नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले. वाढत्या डासांच्या प्रादुर्भावावर प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

# 'दीनदयाल'च्या कार्यातून वंचितांच्या जिद्दीला बळ, भारताला दिशा देण्याची ताकद — डॉ. मोहन भागवत

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २९ :** वंचित व पीडित समाजाने स्वतःच्या विकासासाठी उभे केलेले काम, शेतकऱ्यांनी केलेले विषमुक्त शेतीचे प्रयोग आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी महिलांनी आत्मनिर्भरतेकडे केलेली वाटचाल ही दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या कार्याची खरी ताकद आहे. तीन-चार जिल्ह्यांत उभे राहिलेले हे काम संपूर्ण देशाला दिशा देण्याची क्षमता ठेवते, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

## 'ध्यासपंथ' स्मरणिकेचे प्रकाशन..



दारव्हा मार्गावरील चिंतामणी कृषी उत्पन्न बाजार परिसरात दीनदयाल सेवा प्रतिष्ठानतर्फे पंडित दीनदयाल उपाध्याय जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार, पालकमंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, माजी मंत्री मदन येरावार, संस्थाध्यक्ष नरहर देव यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. डॉ. भागवत म्हणाले, दीनदयाल उपाध्याय यांनी स्वतःसाठी नव्हे तर समाजासाठी आयुष्य जगले. अंत्योदय आणि एकात्म मानवदर्शनाची मांडणी करताना त्यांनी ही तत्त्वे प्रत्यक्ष जीवनात आचरली. समाजात एकही व्यक्ती दुःखी असेल तर सर्वांचे सुख पूर्ण होऊ शकत नाही, हा भारतीय संस्कृतीचा मूलमंत्र असल्याचे त्यांनी नमूद केले. दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत उभे केलेले काम प्रेरणादायी असल्याचे सांगत त्यांनी या कार्याला सर्वोच्च गौरवाने नमस्कार केला. संस्थेच्या तीन दशकांच्या वाटचालीचा आढावा अध्यक्ष नरहर देव यांनी घेतला. यावेळी 'ध्यासपंथ' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाला खासदार संजय देशमुख, आमदार बाबूसिंग महाराज, किसन वानखडे, राजू तोडसाम, श्याम खोडे, माजी मंत्री हंसराज अहीर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व वीस हजारांहून अधिक नागरिकांची उपस्थिती होती. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# यवतमाळ अर्बन बँकेचा सभासदांना 'लाभांशाचा दिलासा'!

### पाच टक्के लाभांश जाहीर, नेट एनपीए शून्य टक्के, 'अ' दर्जा..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २९ :** सहकार क्षेत्रात कार्यरत यवतमाळ अर्बन बँकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात आर्थिक स्थैर्य कायम राखत सभासदांसाठी ५ टक्के लाभांश जाहीर केला आहे.

बँकेच्या ६१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही घोषणा करण्यात आली. त्यामुळे सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. राळेगाव येथे बँकेचे अध्यक्ष डॉ. नितीन खर्चे यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी बँकेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा मांडताना अध्यक्षांनी लाभांशाची अधिकृत घोषणा केली. पारदर्शक कारभार, आर्थिक शिस्त आणि सभासदांचा विश्वास यामुळे बँकेने प्रगतीची वाटचाल कायम ठेवल्याचे त्यांनी सांगितले. बँकेचा नेट एनपीए शून्य टक्के असून, नियम व शासकीय तरतुदींचे पालन केल्याने वैधानिक लेखापरीक्षणात बँकेला 'अ' दर्जा मिळाल्याचे डॉ. खर्चे यांनी नमूद केले. दरम्यान, सक्रिय सभासदांसाठी १,५०० रुपयांचे अंशभाग भांडवल आवश्यक असल्याचे बँकेने स्पष्ट केले आहे. ज्यांचे अंशभाग भांडवल १,५०० रुपयांपेक्षा कमी आहे, त्यांनी संबंधित शाखेशी संपर्क करून आवश्यक रक्कम जमा करावी. तसेच सभासदांनी केवायसी पूर्तता करून बँकेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. लाभांशासंदर्भात सभासदांनी संबंधित शाखेशी संपर्क साधावा, असेही बँकेने कळविले आहे.

## आधार, मोबाईल लिंकिंगसह प्रलंबित प्रश्नांवर मार्गदर्शन शिबिर..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. २९ :** 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ बंद झालेल्या महिलांच्या अडचणी दूर करण्यासाठी झरी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत १ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

योजनेचा लाभ खंडित झालेल्या महिलांनी आधार कार्ड व आधारशी लिंक असलेला मोबाईल सोबत आणावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. शिबिरात आधार लिंकिंग, आवश्यक कागदपत्रे तसेच पुढील प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. महिला आघाडी जिल्हा काँग्रेस अध्यक्षा वंदना आवारी मुख्य समन्वयक असून किरण गंगाधर आत्राम व वाणी तोडसे द्वितीय समन्वयक आहेत. योजनेतील अडथळ्यांमुळे त्रस्त महिलांना शिबिरातून मार्गदर्शन मिळणार आहे.

# पुसद येथील नेताजींच्या पुतळ्याची उपेक्षा..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २९ :** स्वातंत्र्यलढ्यात सर्वस्व अर्पण करणारे आणि देशाच्या इतिहासात अढळ स्थान निर्माण करणारे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुसद शहरातील पुतळ्याची उपेक्षा होत असल्याचे चित्र आहे. ऐतिहासिक महत्त्व असलेल्या या पुतळ्याची नियमित स्वच्छता, रंगरंगोटी, दुरुस्ती आणि परिसराचे सुशोभीकरण याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

वर्षानुवर्षे जुन्या असलेल्या या पुतळ्याची देखभाल केवळ जयंती किंवा विशेष प्रसंगी रंगरंगोटी करण्यापुरती मर्यादित राहू नये, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. महापुरुषांचे स्मारक हे कोणत्याही एका समाजाचे नसून संपूर्ण समाजाच्या सामूहिक स्मृतीचे प्रतीक आहे. त्यामुळे नेताजींच्या पुतळ्याकडे जाती-समाजाच्या चौकटीतून न पाहता राष्ट्रनायक म्हणून त्याचे जतन करणे आवश्यक आहे. देशभक्ती केवळ जयंतीदिनी पुष्पहार अर्पण करून किंवा घोषणा देऊन व्यक्त होत नाही; देशासाठी बलिदान देणाऱ्या महापुरुषांच्या स्मृतींचे वर्षभर संवर्धन करण्यात तिचे खरे प्रतिबिंब दिसते. पुतळ्याचे कायमस्वरूपी सुशोभीकरण, नियमित स्वच्छता, आकर्षक विद्युत रोषणाई, परिसराची निगा आणि आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने करण्यात यावीत. यासाठी स्वतंत्र देखभाल व्यवस्था अथवा निधीची तरतूद करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नेताजींच्या स्मारकाकडे दुर्लक्ष करून देशभक्तीच्या गप्पांना अर्थ उरत नाही; आता प्रशासनाने कृतीतून आदर दाखविण्याची गरज आहे.

# एक कोटींच्या रस्त्याला 'कोल्डमिक्स'चा डांबराचा मुलामा?

### जनुना-महादेव मंदिर रस्त्याच्या कामावर गंभीर आक्षेप,चौकशीसह दोषींवर कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**पुसद, दि. २९ :** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुसद उपविभागांतर्गत मौजा जनुना येथील गावापासून महादेव मंदिरापर्यंतच्या एक किलोमीटर रस्त्याच्या कामावर गंभीर आक्षेप नोंदविण्यात आला आहे. निविदेत हॉटमिक्स पद्धतीने रस्ता करण्याचे नमूद असताना प्रत्यक्षात कोल्डमिक्सचा वापर करून निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आल्याचा आरोप तक्रारकर्त्यांनी केला आहे. याप्रकरणी संबंधित कंत्राटदारासह सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पुसदपासून सुमारे १८ किलोमीटर अंतरावर असलेल्या जनुना येथील ३/७०० ते ४/७०० किलोमीटर या एक किलोमीटर रस्त्याच्या कामाची अंदाजित किंमत ८० लाख रुपये असून जीएसटीसह मंजूर रक्कम सुमारे एक कोटी रुपये असल्याचे निवेदनात नमूद आहे. या कामाची निविदा १२ मार्च २०२४ रोजी मंजूर झाली असून एप्रिल २०२६ मध्ये काम सुरू करून मे-जूनमध्ये पूर्ण करण्यात आल्याचे तक्रारकर्त्यांचे म्हणणे आहे. निविदेनुसार हॉटमिक्स पद्धतीने काम होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात कोल्डमिक्सचा वापर करण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच रस्त्याच्या कामाची मोजमाप पुस्तिका प्रत्यक्ष कामाची योग्य पाहणी न करता तयार करण्यात आल्याचाही दावा तक्रारीत करण्यात आला आहे. रस्त्यावर आवश्यक प्रमाणात डांबराचा वापर न करता ऑइल मिक्स चुरी, मुरूम व गिट्टीच्या साहाय्याने थातूरमातूर काम करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून कामाची गुणवत्ता, निविदेतील अटी आणि मोजमाप पुस्तिकेची पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दोष आढळल्यास संबंधित कंत्राटदारावर कारवाई करून शासनाच्या निधीची वसुली करावी, तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवरही नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी तक्रारकर्त्यांनी केली आहे. आता अधीक्षक अभियंता आणि मुख्य अभियंता या तक्रारीची कितपत दखल घेतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# श्री एकविरा देवी संस्थानच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी करिता मदत

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. २९ :** राज्यात निसर्गाच्या अवकृपेमुळे दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांवर संकटाचा घाला ओढवला आहे त्यामुळे श्री एकविरा देवी संस्थानने पुढाकार घेत मुख्यमंत्री साहाय्यात निधी करिता ३१हजार रुपयांचा धनादेश महसूलमंत्री बावनकुळे यांच्याकडे सुपूर्द करून सामाजिक बांधिलकी जोपासली असुन नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत करणारे जिल्ह्यातील पहिले देवस्थान ठरले आहे.

राज्यात पेरण्या आटोपल्यानंतर पिके ऐन बहरात येत असतांनाच निसर्गाच्या लहरीपणाचा फटका बसुन पावसाने कायमचीच दडी मारली त्यामुळे जिवापाड जपलेले पिके पावसा अभावी सुकून जात आहे.पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण होवुन राज्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने बळीराजा पुरता खचला त्यामुळे शासनाने या नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना मदतीचे आवाहन केले. त्याच आवाहनाला प्रतिसाद देत नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत करण्यात नेहमीच अग्रेसर राहिलेल्या महागाव तालुक्यातील हिवरा संगम येथील आठवे शक्तिपीठ असलेल्या श्री एकविरा देवी संस्थानने पुढाकार घेत ३१हजार रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधी करिता संस्थानचे अध्यक्ष अनंतराव कदम,कोषाध्यक्ष माजी जि.प.सदस्य साहेबराव पाटील,माजी सरपंच प्रविण जामकर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सुपूर्द केला. श्री एकविरा देवी संस्थान हे जिल्ह्यातील पहिले संस्थान ठरले असुन त्यांनी जोपासलेली सामाजिक बांधिलकी जिल्ह्यातील इतर धार्मिक संस्थांना आदर्श व प्रेरणा देणारी आहे.



## योगसाधनेतून निरोगी जीवनाचा जागर,वणीत महायोगसंमेलन उत्साहात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. २९ :** धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याकडे दुर्लक्ष होत असताना योगसाधना ही निरोगी जीवनाची प्रभावी वाट ठरू शकते, असा संदेश वणीत झालेल्या जिल्हास्तरीय महायोगसंमेलनातून देण्यात आला. योगा फाऊंडेशन संचालित महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या वतीने वणी शाखेच्या पुढाकारातून रविवारी (दि. २७) चिखलगाव येथील धनोजे कुणबी समाज सभागृहात हे संमेलन पार पडले.

आमदार संजय देरकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी संघाचे संस्थापक अध्यक्ष मनोज निलपवार होते. यावेळी माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. 'योगानुभूती' स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. योगाचार्य डॉ. कृणाल महाजन यांनी कुंडलिनी जागृतीवर मार्गदर्शन केले. योगासन स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या पूजा देऊरकर यांनी योगाच्या माध्यमातून आजारांवर मात करत मिळवलेल्या यशाचा प्रेरणादायी प्रवास सांगितला. प्रा. गोविंद फुके, डॉ. संजय रत्नपारखी व मानसशास्त्रज्ञ डॉ. गणेश सव्वालाखे यांनीही मार्गदर्शन केले. विविध योगप्रात्यक्षिकांनी संमेलनाची सांगता झाली.

## राळेगावात शेतकऱ्याचा मृत्यू

**राळेगाव, दि. २९ :** शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबता थांबेना, अशी परिस्थिती राळेगाव तालुक्यात पुन्हा समोर आली आहे. शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील शेतकरी सदाशिव कोहळे (६५) यांनी काही दिवसांपूर्वी शेतात विष प्राशन केले होते. त्यांच्यावर यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, रविवारी (दि. २७) त्यांचा मृत्यू झाला. कोहळे यांच्याकडे साडेसात एकर शेती होती. त्यांच्यावर ग्रामविकासिकेचे कर्ज होते. कर्जमाफीचा लाभ मिळूनही नव्याने कर्ज उपलब्ध झाले नसल्याने आर्थिक अडचणी कायम होत्या. त्यातच यंदाच्या लहरी हवामानामुळे पिकांची झालेली अवस्था त्यांच्या चिंतेत भर घालत होती. त्यांच्या पश्चात पत्नी सुनंदा, विवाहित मुले विनोद, अनिल, मुलगी सविता राऊत यांच्यासह आप्तपरिवार आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### ढोल-ताशाच्या गजरात बाप्पाला निरोप

**नांदगाव पेठ-** येथील श्री गणपती विसर्जन सोहळा उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' च्या जयघोषात नांदगावकरांनी लाडक्या बाप्पाला निरोप दिला.विसर्जन मिरवणुकीत ढोल-ताशांच्या निनादात पारंपरिक पद्धतीने विविध देखावे सादर करण्यात आले. परमेश्वराच्या विविध लीला, पौराणिक प्रसंगांवर आधारित चित्ररथ, पारंपरिक नृत्य, दिंड्या आणि पताकांनी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. नांदगाव पेठ व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी झाले होते. स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे गणेशोत्सवानिमित्त निर्माल्य संकलन मोहीम राबविण्यात आली. घरगुती व सार्वजनिक गणेश मंडळांमधील फुले, हार, दुर्वा, पाने आदी निर्माल्य संकलित करून त्यापासून सेंद्रिय खत निर्मिती करण्यात येत आहे. पर्यावरण संवर्धन व निर्माल्याची योग्य विल्हेवाट हा या उपक्रमाचा उद्देश असून, नागरिक व गणेश मंडळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### मासिक पाळी व्यवस्थापन प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**भातकुली-** पंचायत समिती भातकुली, जिल्हा अमरावती यांच्या वतीने इयत्ता ६ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांसाठी तालुकास्तरीय मासिक पाळी व्यवस्थापन प्रशिक्षणाचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाला शिक्षक तसेच विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.प्रशिक्षणासाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून दिपाली बाभुळकर, संगीता पाटकर,मीनाक्षी खरटमोल,सुजाता सोनवणे आणि दीपिका भारती मॅडम यांनी मार्गदर्शन केले.प्रशिक्षणादरम्यान डॉ. मंजुषा शिंदे, बीएड कल्याणी यांनी विशेष मार्गदर्शन करताना मासिक पाळीच्या काळात घ्यावयाची काळजी, वैयक्तिक स्वच्छता, योग्य आहार, आरोग्यविषयक समस्या तसेच आवश्यक आरोग्यविषयक सवयी याबाबत सखोल व शास्त्रीय माहिती दिली.तालुक्यातील शिक्षक व विद्यार्थ्यांचा मिळालेला भरघोस प्रतिसाद पाहता हे प्रशिक्षण मासिक पाळी व्यवस्थापनाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असेल असे प्रतिपादन माननीय रामेश्वर माळवे, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती भातकुली यांनी केले. प्रशिक्षण यशस्वी होण्याकरिता माननीय चंद्रकांत कडवे , विषय साधन व्यक्ती,यांचे विशेष सहकार्य लाभले.असे राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

### अमरावती-बडनेराचा १ ऑक्टो.ला पाणीपुरवठा बंद

**अमरावती -** अमरावती पाणीपुरवठा योजनेच्या सिंभोरा हेडवर्क्स येथील विद्युत फिडरची महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्ती करण्यात येणार आहे. त्यामुळे सिंभोरा येथील विद्युत पुरवठा व पंपिंग बंद राहणार असल्याने गुरुवार, १ ऑक्टोबर रोजी संपूर्ण अमरावती व बडनेरा शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.नागरिकांनी पाण्याचा आवश्यक साठा करून ठेवावा तसेच पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे.१ ऑक्टोबर रोजी पाणीपुरवठा बंद राहिल्याने संबंधित भागातील पाणीपुरवठा २ ऑक्टोबर रोजी करण्यात येईल. तसेच ३० सप्टेंबर रोजी पाणीपुरवठा झालेल्या भागांचा पाणीपुरवठा ३ ऑक्टोबर रोजी पूर्ववत करण्यात येणार आहे.



### नागपूर कराराची होळी करून निषेध

**अमरावती-** शहीद भगतसिंग यांच्या जयंतीदिनी शहरात विदर्भ आंदोलन समितीने नागपूर कराराची होळी करत महाराष्ट्र सरकारचा निषेध केला.'नागपूर करार म्हणजे निव्वळ फसवणुकीचा कागद ठरला! यावेळी जिल्हाप्रमुख राजेंद्र आगरकर, जिल्हा अध्यक्षा सुषमा मुळे,पद्मा राजपूत ,सतीश प्रेमलवार, प्रकाश लड्ढा, अनिल वानखडे, लक्ष्मणराव वानखडे,, सुभाष धोटे पांडुरंग बिजवे, रमेश रामटेके जय बुंदी करुणा राजूरकर, संगीता मेहेरे, रंजना कल्याणकर विमल बानोले यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

### नागोराव दुर्योधन यांचे निधन



**चांदूर रेल्वे-** राम नगर मधील रहिवाशी कृषी विभागातील सेवानिवृत कर्मचारी नागोरावजी दुर्योधन(वय ८४ वर्षे )यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. सामाजिक कार्यकर्ते तथा रिपब्लिकन पार्टी आठवले गटाचे सुमेर दुर्योधन यांचे ते वडील होते.त्यांना तीन मुले, सुना, नातवंडे आणि दोन विवाहित मुली आहेत.

## ३० शासकीय व २० खासगी आश्रमशाळा; तरीही स्थानिक विद्यार्थ्यांचा प्रवेशासाठी संघर्ष

### मेळघाटात नवीन आश्रमशाळा व इंग्रजी माध्यमाच्या शाळांची मागणी

**मेळघाट/वार्ताहर**

मेळघाटातील दोन्ही तालुक्यांमध्ये सुमारे ३० शासकीय आश्रमशाळा आणि २० खासगी आश्रमशाळा सुरू आहेत. या सर्व आश्रमशाळांमध्ये हजारो आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र, एवढ्या मोठ्या संख्येने आश्रमशाळा असतानाही मेळघाटातील अनेक आदिवासी बालक-बालिकांना परिसरातील आश्रमशाळांमध्ये प्रवेश मिळत नसल्याने शिक्षणासाठी बाहेर जावे लागत आहे. ही बाब आदिवासी विद्यार्थी आणि पालकांसाठी गंभीर चिंतेचा विषय बनली आहे.

आदिवासी समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी आश्रमशाळांची व्यवस्था करण्यात आली असताना, स्थानिक विद्यार्थ्यांनाच प्रवेशासाठी जागा उपलब्ध होत नसेल तर या व्यवस्थेचा आढावा घेण्याची गरज निर्माण झाली आहे. अनेक विद्यार्थ्यांना अमरावती, भातकुली तसेच इतर ठिकाणच्या खासगी किंवा आश्रमशाळांमध्ये प्रवेश घ्यावा लागत आहे.लहान वयातील विद्यार्थ्यांना आपल्या गावापासून आणि कुटुंबापासून दूर जाऊन शिक्षण घ्यावे लागणे ही पालकांसाठीही मोठी अडचण आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभागाने मेळघाटातील विद्यार्थ्यांची संख्या, आश्रमशाळांमधील उपलब्ध जागा आणि प्रवेशासाठी असलेली मागणी याचा सविस्तर आढावा घेणे आवश्यक आहे.

राणेगाव येथे आश्रमशाळा आहे. त्याचप्रमाणे राणेगावपासून सुमारे सात किलोमीटर अंतरावर सुसरजाणे येथे आश्रमशाळा असून, पुढे सुमारे ११ किलोमीटर अंतरावर सावलीखेडा येथेही आश्रमशाळा आहे. चिखलदरा तालुक्यातील विविध गावांच्या परिसरातही अनेक आश्रमशाळा कार्यरत आहेत.असे असतानाही स्थानिक आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नसेल आणि त्यांना मेळघाट सोडून इतर ठिकाणी शिक्षणासाठी जावे लागत असेल, तर आश्रमशाळांमधील उपलब्ध क्षमतेचा आणि विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येचा योग्य मेळ घालण्याची गरज आहे.



**नवीन आश्रमशाळांची गरज**

मेळघाटातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बाहेर जाण्याची वेळ येऊ नये यासाठी ज्या भागात विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे, त्या ठिकाणी नवीन शासकीय आश्रमशाळा सुरू करण्यात याव्यात. तसेच विद्यमान आश्रम शाळांमध्ये आवश्यकतेनुसार अतिरिक्त वर्गखोल्या व इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मागणी पालकांकडून होत आहे.यासोबतच मेळघाटात काही दर्जेदार इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याचीही गरज आहे. आधुनिक आणि दर्जेदार शिक्षणाची सुविधा मेळघाटातच उपलब्ध झाली, तर येथील बालक-बालिकांना अमरावती, भातकुली किंवा इतर शहरांमध्ये शिक्षणासाठी जाण्याची गरज भासणार नाही.आदिवासी विकास मंत्री उईके , मेळघाटचे आमदार केवलरामजी काळे तसेच मेळघाटशी संबंधित इतर लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. मेळघाटात मोठ्या संख्येने आश्रमशाळा असताना स्थानिक आदिवासी विद्यार्थ्यांना त्याच परिसरात शिक्षणाची जागा का मिळत नाही? विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार आश्रमशाळांची क्षमता वाढविण्यात आली आहे का? आणि जर जागा अपुरी पडत असेल तर नवीन आश्रमशाळा सुरू करण्यासाठी ठोस नियोजन का केले जात नाही? असे प्रश्न आता पालकांकडून उपस्थित केले जात आहेत. मेळघाटातील आदिवासी बालक-बालिकांना त्यांच्या हक्काचे शिक्षण आपल्या मातीतच मिळाले पाहिजे. त्यासाठी केवळ आश्रमशाळांची संख्या सांगून उपयोग नाही, तर प्रत्येक पात्र विद्यार्थ्याला आपल्या परिसरात शिक्षणाची जागा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.आदिवासी विकास विभाग या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन मेळघाटातील विद्यार्थ्यांसाठी नवीन आश्रमशाळा, वाढीव प्रवेश क्षमता आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याबाबत ठोस निर्णय घेणार का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांची बैठक

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्पाच्या अनुषंगाने चांदूर रेल्वे परिसरातील शेतकऱ्यांना प्राप्त झालेल्या शेती मोजणीच्या नोटिसांच्या पार्श्वभूमीवर काल धर्मशाळा, सिनेमा चौक, चांदूर रेल्वे येथे हर्षल वाघ यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीस पाटबंधारे विभागाच्या वतीने मावळे साहेब, इंगळकर साहेब, स्थूल साहेब यांच्यासह संबंधित विभागाची संपूर्ण टीम उपस्थित होती तालुक्यातील शेकडो शेतकरी उपस्थित होते.यावेळी प्रकल्पाचे स्वरूप, नदीजोड प्रकल्पाची कार्यपद्धती, शेती मोजणी, संपादित होणाऱ्या जमिनीचा मोबदला तसेच संबंधित शेतकऱ्यांना मिळणाऱ्या भरपाईबाबत अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती दिली. यासोबतच शेतकऱ्यांनी आपल्या विविध अडचणी, शंका व मागण्या अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. नगरसेवक हर्षल वाघ यांनी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून शेतकऱ्यांची बाजू ठामपणे मांडली. यामध्ये चांदूर रेल्वेच्या हद्दीतून जाणारा कालवा हा जवळपास ५.५ मीटर खोल ११ मीटर रुंद व त्याचा रस्त्यांचा विस्तार पकडून ८० मीटर रुंदीचे जागा व्यापणार आहे अशी माहिती मिळाली. बैठकीदरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, या प्रकल्पातून आपल्या परिसरातील नद्यांमध्ये बारमाही पाणी उपलब्ध होईल, अशी सर्वसाधारण अपेक्षा होती. मात्र बैठकीतील चर्चेतून असे स्पष्ट झाले की, संबंधित कालव्यातून मुख्यतः पावसाळ्यातील पुराचे पाणी उपलब्ध होणार असून सप्टेंबरपर्यंतच पाणी येण्याची शक्यता आहे.त्यामुळे रब्बी व उन्हाळी हंगामासाठी या कालव्याद्वारे शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी उपलब्ध होणार आहे की नाही, हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

## अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूकीची सूचना प्रसिध्द

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र विधान परिषदेसाठी अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून एका सदस्याची निवडणूक घ्यावयाची आहे. यासंबंधीची घोषणा भारत निवडणूक आयोगाने नुकतीच केली असून त्यानुसार विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ यांनी निवडणुकीची सूचना प्रसिद्ध केली आहे.

६ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत कोणत्याही दिवशी (सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत विभागीय आयुक्त यांचे कार्यालयात सभागृह क्र. २ तळमजला, विभागीय आयुक्त कार्यालय, कॅम्प, अमरावती येथे दाखल करता येतील. नामनिर्देशनपत्रे वर उल्लेख केलेल्या ठिकाणी व वेळी मिळू शकतील. नामनिर्देशनपत्रांची छाननी बुधवार दि. ७ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपासून निवडणूक निर्णय अधिकारी, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ तथा विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे कार्यालयातील सभाकक्ष क्र. २ तळमजला, विभागीय आयुक्त कार्यालय, कॅम्प अमरावती येथे करण्यात येईल. निवडणूक प्रतिनिधीला वरील परिच्छेद (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास त्यांच्या कार्यालयात शुक्रवार दिनांक ९ ऑक्टोबर, २०२६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत देता येईल. निवडणूक लढविली गेल्यास शुक्रवार दि. २३ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान घेण्यात येईल. असे या सुचनेव्दारे घोषित करण्यात आले आहे.

ही सूचना निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच उपजिल्हा निवडणूक अधिकारी अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम यांच्या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात आली आहे. याबरोबरच विभागातील सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, महापालिका आयुक्त, नगरपालिका तसेच पंचायत समिती व ग्रामपंचायती मध्येही प्रसिद्ध करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. असेही नयना गुंडे विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ यांनी कळविले आहे.

## अचलपूर कृउबा समितीत नवीन मक्याची आवक

### २ हजार ३५० रूपये प्रति क्विंटलचा दर

**अचलपूर/वार्ताहर**

कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गेल्या चार ते पाच वर्षात मक्याच्या आवकेत मोठी वाढ झाली असून, यंदाच्या हंगामातील नवीन मक्याची आवकही उत्साहात सुरू झाली आहे. तालुक्यातील वडगाव फत्तेपूर येथील शेतकरी अमोल भोरे यांच्या नवीन मक्याला नुकताच प्रतिक्विंटल २ हजार ३५० रुपयांचा सर्वाधिक दर मिळाला.

अचलपूरसह चिखलदरा, धारणी आणि लगतच्या मध्य प्रदेशातील शेतकरी आपला मका विक्रीसाठी अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला प्राधान्य देत आहेत.सध्या बाजार समितीत मक्याला प्रतिक्विंटल १ हजार ८०० ते २ हजार ३०० रुपयांदरम्यान दर मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, मक्याची आवक दिवसेंदिवस वाढत आहे.

अचलपूर बाजार समिती शेतमालाच्या विक्रीसाठी पारदर्शक व स्पर्धात्मक लिलाव व्यवस्था असल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य दर मिळत आहे. तसेच मालाची विक्री झाल्यानंतर शेतकऱ्यांना तातडीने नगदी पेमेंट मिळण्याची सुविधा उपलब्ध आहे. मेळघाट तसेच मध्य प्रदेशातून मोठ्या प्रमाणात मका बाजार समितीत दाखल होत



असून, व्यापारी वर्गाकडूनही मक्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.नवीन मक्याला मिळालेला २ हजार ३५० रुपयांचा दर आणि बाजार समितीतील चांगली मागणी यामुळे यंदाच्या हंगामात मक्याची आवक आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.मक्का उत्पादक शेतकऱ्यांनी आपला शेतमाल अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांच्या सोयी-सुविधांची पूर्ण काळजी घेतली जात असून धान्याला योग्य भाव दिला जात आहे. परिसरातील तसेच मेळघाटातील मक्का उत्पादक शेतकऱ्यांनी आपला शेतमाल अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीतच आणून या उत्तम दराचा व सुविधांचा लाभ घ्यावा.

**प्रतिभा प्रशांत ठाकरे**
सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, अचलपूर.

आणण्याचे आवाहन अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, सर्व संचालक मंडळ, सचिव मंगेश भेटाळू यांनी केले आहे.

## रस्ता दुभाजकावर झाडे लावून सौंदर्यिकरण...पण पथदिवे केव्हा लावणार..?

### नागरिकांचा सा.बां. प्रशासनाला व लोकप्रतिनिधीना संतप्त सवाल

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

पात्रिकर कॉलोनी,महालक्ष्मी नगर,महारुद्र नगर,श्याम पार्क उजवीकडे गुरुकृपा कॉलनी आणि डांगरीपुऱ्याचा मागील भाग असा कुठे दाट तर कुठे विरळ लोकवस्ती असलेल्या वसाहती देखील आहे. ऐन रात्रीच्या वेळी रस्त्यावर स्ट्रीट लाईट अभावी पसरलेल्या अंधारामुळे या परिसरातील वृद्ध नागरिक,महिलावर्ग व लहान मुलांना या रस्त्याने चालणे देखील जिकरीचे झाले आहे. तसेच अंधाराचा फायदा घेत घरफोडीच्या ही घटना घडलेल्या आहेत. शिवाय अंधारामुळे या रोडवर बरेच अपघात सुध्दा घडल्याचा घटनेचा पाढा येथील नागरिक वाचत असून 'रस्ता दुभाजकावर झाडें लावून सौंदयिकरण तर केले...पण अंधारातून प्रकाशाकडे नेणारे स्ट्रीट लाईट केव्हा लावणार..? असा संतप्त सवाल सार्वजनिक बांधकाम विभागाला तसेच लोकप्रतिनिधींना विचारून लवकरात लवकर या रस्ता दुभाजकावर स्ट्रीट लाईट लावण्याची मागणी जोर धरीत आहे.

नगररचना विभागाच्या विकास आराखड्यानुसार चांदूर शहरातील मुख्य शहरातून जाणारा डी. पी.रोड सध्यस्थितीत चर्चेचा विषय बनला आहे.विरळ चौकापासून ते न.प.पाणीपुरवठा कार्यालया पर्यंतच्या ह्या रस्त्यावर रस्ता



दुभाजक तयार करण्यात आलेला आहे. दुभाजकाला रंग रंगोटी सुध्दा केली आहे.परंतु रस्ता तयार होऊन बरेच वर्ष लोटून गेलीत पण आता पर्यंत या दुभाजकावर सार्वजनिक बांधकाम विभागाने झाडे लावली नव्हती.काही वर्षापूर्वी याच दुभाजकावर व विरळ रस्त्यावर जाणाऱ्या दुभाजकावर मिश्रा नामक एका वृक्षप्रेमी सद्गृहस्थाने पावसाळ्यात अनेक फुलझाडे लावलीत. त्याला अधून मधून पाणी देऊन जगवले सुध्दा.पण आज त्यातली काहीच झाडें जिवंत आहे तर काही मात्र वाळून गेली.पर्यायाने आता सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येऊन ह्या दुभाजकावर झाडे लावण्याचा मोह आवरता आला नाही.उशिरा का होईना,'देर आये दुरुस्त आये' याप्रमाणे निदान आता तरी रस्त्याच्या सौंदर्यीकरणात भर पडावी तसेच उन्हाळ्यात रस्त्यावर वाहने चालवणाऱ्या वाहन चालकांना सिमेंट रस्त्यावरील उष्णतेतून थोडा गारवा मिळावा या निखळ भावनेतून प्रशासनानाने केलेल्या ह्या कार्याचे परिसरातील व शहरातील नागरिक कौतुकच करीत आहे. परंतु रात्रीच्या वेळी मात्र ह्याच डी. पी.रस्त्यावर पसरलेल्या काळोखाच्या साम्राज्याबद्दल येथील नागरिक तीव्र नाराजी व्यक्त करताना दिसत आहेत. ह्याच रस्त्यावर पत्रिकर कॉलोनी,महालक्ष्मी नगर,महारुद्र नगर,श्याम पार्क उजवीकडे गुरुकृपा कॉलनी आणि डांगरीपुऱ्याचा मागील भाग असा कुठे दाट तर कुठे विरळ लोकवस्ती असलेल्या वसाहती देखील आहे. ऐन रात्रीच्या वेळी रस्त्यावर स्ट्रीट लाईट अभावी पसरलेल्या अंधारामुळे या परिसरातील वृद्ध नागरिक,महिलावर्ग व लहान मुलांना या रस्त्याने चालणे देखील जिकरीचे झाले आहे. तसेच अंधाराचा फायदा घेत घरफोडीच्या ही घटना घडलेल्या आहेत. तसेच बरेच अनुचित प्रकार देखील होत असल्याचे येथील रहिवाशी असलेल्या नागरिकांचे म्हणणे आहे.शिवाय अंधारामुळे या रोडवर बरेच अपघात सुध्दा घडल्याचा घटनेचा पाढा येथील नागरिक वाचत आहे.

## अंजनगावात वैद्यकीय क्रांती! भव्य हॉस्पिटलमुळे शहराच्या सौंदर्यात भर

### रोजगार आणि नगरपरिषदेच्या महसूलातही वाढ

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी शहर हे तालुक्याचे ठिकाण असूनही आजवर आरोग्य सुविधांच्या बाबतीत अत्यंत मागासलेले होते. मात्र, गेल्या ३-४ वर्षांत शहराचा आरोग्य क्षेत्रातील कायापालट झाला असून, आता गरीब व गरजू रुग्णांसाठी डॉ. कौस्तुभ पाटील यांच्या 'कल्पतरू हॉस्पिटल'च्या रूपाने एक मोठा दिलासा मिळाला आहे. या हॉस्पिटलला केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री जन आरोग्य योजने'ची मान्यता मिळाली असून, यद्वारे आता पात्र रुग्णांवर ५ लाख रुपयांपर्यंत पूर्णपणे मोफत आणि कॅशलेस उपचार केले जाणार आहेत. यासाठी रुग्णांकडे 'आयुष्मान कार्ड' असणे आवश्यक आहे.

यापूर्वी अंजनगाव सुर्जी शहर आणि परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांना किरकोळ आजारांशिवाय इतर मोठ्या उपचारांसाठी परतवाडा, अमरावती किंवा अकोला सारख्या शहरांवर अवलंबून राहावे लागत होते. शहरात प्रामुख्याने बी.ए.एम.एस.पदवीधारक डॉक्टरांचे खाजगी दवाखाने उपलब्ध होते. मात्र,




दगावत होते आणि परिस्थिती हाताबाहेर जात होती.गेल्या तीन ते चार वर्षांत अंजनगाव सुर्जी शहरात वैद्यकीय क्षेत्रात मोठी क्रांती झाली आहे. शहरात आता अत्याधुनिक आणि भव्य खाजगी हॉस्पिटल्स उभी राहिली आहेत. यामध्ये अस्थिरोग तज्ञ , एम.डी. मेडिसिन , बालरोग तज्ञ स्त्री रोग तज्ञ,यांसारख्या सर्व प्रकारच्या तज्ञ डॉक्टरांच्या सेवा स्थानिक पातळीवरच उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे नागरिकांची अमरावती-अकोला वारी थांबली असून, वेळेत उपचार मिळणे शक्य झाले आहे.

**महसुलात वाढ**

आरोग्य सुविधांच्या या विस्तारामुळे केवळ रुग्णांचे प्राणच वाचत नाही आहेत, तर शहराच्या अर्थकारणालाही गती मिळाली आहे. आधुनिक आणि भव्य वैद्यकीय इमारतींमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे. त्याचसोबत या मोठ्या रुग्णालयांच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर शेकडो तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. रुग्णालयांच्या वाढत्या संख्येमुळे खुल्या जागेचे भाव वाढत आहे. तर नगरपरिषदेच्या कराच्या उत्पन्नातही मोठी वाढ होत असून, हा निधी शहराच्या विकासासाठी उपयुक्त ठरत आहे.थोडक्यात सांगायचे तर, अंजनगाव सुर्जी आता आरोग्य क्षेत्रात स्वावलंबी होत असून,शहराचे चित्रच बदलून टाकत आहे.

## प्लास्टिकमुक्ती व स्वच्छता मोहीम; ८ हजारांचा दंड वसूल

**अमरावती-** महानगरपालिकेच्या वतीने रामपुरी कॅम्प परिसरात स्वच्छता व प्लास्टिकमुक्त परिसर जनजागृती तसेच तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान प्रतिबंधित सिंगल यूज प्लास्टिकचा वापर, विक्री व साठवणूक तसेच परिसरातील स्वच्छता आणि ओला-सुका कचरा वर्गीकरणासाठी दोन डस्टबिनची उपलब्धता याबाबत दुकानांची सखोल तपासणी करण्यात आली.आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक व उपायुक्त (१) भाग्यश्री बोरेकर यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, स्वास्थ्य अधीक्षक विजय बुरे आणि झोन क्र. १ चे सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तपासणी केली. दीपक गंगवानी यांच्याकडून प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळल्याने ५,००० दंड



आकारण्यात आला. तसेच श्याम किराणा, नरेश पिंजानी आणि निखिल पिंजानी यांच्याकडे ओला व सुका कचऱ्यासाठी दोन डस्टबिन उपलब्ध नसल्याचे आढळून आल्याने प्रत्येकी १,००० दंड वसूल करण्यात आला. या कारवाईत एकूण ८,००० दंड वसूल करण्यात आला.मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी व्ही. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक राजू डीक्याव, स्वास्थ्य निरीक्षक सचिन सैनी, निखिल खंगाळे, शाहू जवंजाळ, इमरान खान आणि मनीष नकवाल आदी अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

**आपल्या देशी पाणी, जंगल, माळराने व शेती-पशुपालन या सृष्टी व्यवस्थांवर अनेक जनसमुदाय अवलंबून आहेत. महाराष्ट्रात मच्छीमार, कोळी महिला व समुद्र याचं गहिरं नातं आहे. आदिवासी महिला जंगलाशिवाय राहूच शकत नाही. अन्न, इंधन, चारा, औषधी वनस्पती इत्यादी गोष्टी ते जंगलातूनच आणतात. माळरान परिसंस्थेचा वापर करून स्थिर व भटके पशुपालन करणाऱ्या समाजातील महिला (विशेषतः धनगर स्त्रिया) वर्गाने माळरानावर जगण्याची शैली स्वीकारलेली आहे. कृषी-सृष्टी व्यवस्था (मानव निर्मित परिसंस्था) व महिला शेतकऱ्यांचे नाते गेली दहा हजार वर्षे टिकून आहे. पिकांचे विविध प्रकार व प्रजाती यांची निर्मिती व संगोपन यांचे पूर्ण श्रेय महिला शेतकऱ्यांकडे जाते.**

# सृष्टी व्यवस्था अन् महिलांचे अनोखे नाते

आमची माईआजी खूप गोष्टी वेल्हाळ होती. तिचा जन्म व बालपण हे प्रवरा खोऱ्यातील आढळा व म्हाळुंगी या नद्यांच्या सहवासात गेले. पुढे सासर ते माहेर या पायी प्रवासात असंख्य वेळा तिला आढळा व म्हाळुंगी या दोन्हीही नद्या ओलांडाव्या लागत. त्यामुळे तिचे उभय नद्यांशी भावनिक बंध निर्माण झालेले होते. या उभय सरितांचा (म्हाळुंगी व आढळा) उगम कुठे होतो, प्रवरेशी त्यांचा संगम कुठे होतो, या उभय नद्यांकाठी असणारी गावे, तीर्थक्षेत्रे तर माईआजीला अखेरपर्यंत तोंडपाठ होती. भेटीत ती अनेकदा सह्याद्रीतील 'सह्य-सरितांच्या कथा व गीते' अगदी तल्लीन होऊन ऐकवत असे.

या माईआजी सारखीच वडिलांची आई पण कुणबाऊ मनाची महिला शेतकरी होती. प्रवरा नदी हा तिचा खास आवडीचा विषय. बागायती शेतीला शाश्वत पाणी मिळते ते विहिरीतून व विहिरीला पाणी येते ते नदीतून, या विषयी ती नेहमी नानविध निरीक्षणे सांगायची. उन्हाळ्यात नदीच्या वाळूत पिकणारी गोड रसदार टरबुजे खाऊ घालताना ती प्रवरेतील कार्तिक स्नानाचे महत्त्व पण कथन करत असे. तिच्या हयातीत दोन-तीनदा महापूर आले व खणानारळाने नदीची ओटी भरल्यावर ती कशी शांत झाली, याची सय तिला दर पावसाळ्यात येई. होडीत प्रवास करताना ती प्रवरेचे दर्शन घेई, त्या वेळी तिच्या चेहऱ्यावर नदीप्रतीचा सश्रद्ध भाव लख्ख दिसायचा. दोन दशके लोटली तरी लहानपणीच्या या आठवणी आजही ताज्या आहेत.

दोन वर्षांपूर्वी हिमालयाच्या ओढीने लडाख व काश्मीरला जाणे झाले. लेह-श्रीनगर मार्गावर प्रवास सुरू होता. कारगिल शहर ओलांडल्यावर एक अवखळ नदी लागली. गाडीच्या ड्रायव्हरला नदीचे नाव विचारले, पण त्याला सांगता येईना. शेजारी बुरख्यातील तरुण मुस्लिम महिला उत्स्फूर्तपणे म्हणाली, की भाईसाब ये सुरु नाम की नदी है, आगे सिंधू से इसका मिलन होगा... किती छान वाटले हे ऐकून!

पुढे श्रीनगर मुक्कामात श्री प्रताप सिंग वस्तुसंग्रहालयाला भेट दिली. श्रीमती रुबिया कुरेशी या उत्साही महिला संग्रहालयाच्या अभिरक्षक म्हणून काम करतात. ऐतिहासिक गप्पांच्या ओघात नदीचा विषय निघाला. झेलम नदी ही काश्मीरवासीयांच्या दृष्टीने अस्मितेचे प्रतीक. हिमालयातील पीरपंजाल रांगेतून ही नदी उगम पावते. उगम स्थान वेरीनाग झरा (स्थानिक भाषेत चष्मा) हे ठिकाण रुबिया यांच्या माहेराजवळच असल्याने त्या अत्यंत भावुक होऊन अभिमानाने झेलमच्या गोष्टी सांगत होत्या. संस्कृत भाषेत झेलमला 'वितस्ता' असे म्हणतात. ऋग्वेदातील सप्तनद्यांमध्ये झेलमचा समावेश होतो. स्थानिक काश्मिरी लोक तिला 'व्यथ' नावाने पण ओळखतात... अशी सविस्तर माहिती रुबिया यांनी दिली. स्त्री व सृष्टी व्यवस्था यांचे नाते उलगडत असताना अशा अनेक आठवणी नव्याने जाग्या होतात. अशी उदाहरणे आपल्या सभोवताली आहेत. त्याकडे डोळसपणे पाहायला हवे.

### स्त्रियांची भूमिका महत्त्वाची

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर सारे जग बदलत आहे व विविध समुदायांचे उपजीविकेचे नैसर्गिक स्रोत बदलत आहेत. पण आपल्या देशी पाणी, जंगल, माळराने व शेती-पशुपालन या सृष्टी व्यवस्थांवर अनेक जनसमुदाय अवलंबून आहेत. महाराष्ट्रात मच्छीमार कोळी महिला व समुद्र याचं गहिरं नातं आहे. आदिवासी महिला जंगलाशिवाय राहूच शकत नाही. अन्न, इंधन, चारा, औषधी वनस्पती इत्यादी गोष्टी ते जंगलातूनच आणतात. माळरान परिसंस्थेचा वापर करून स्थिर व भटके पशुपालन करणाऱ्या समाजातील महिला (विशेषतः धनगर स्त्रिया) वर्गाने माळरानावर जगण्याची शैली स्वीकारलेली आहे. कृषी-सृष्टी व्यवस्था (मानव निर्मित परिसंस्था) व महिला शेतकऱ्यांचे नाते गेली दहा हजार वर्षे टिकून आहे. पिकांचे विविध प्रकार व प्रजाती यांची निर्मिती व संगोपन यांचे पूर्ण श्रेय महिला शेतकऱ्यांकडे जाते.

मध्यंतरी वर्षा गजेंद्रगडकर लिखित 'स्त्री आणि पर्यावरण' नावाचे पुस्तक वाचायला मिळाले. त्यात उभयतांतील नात्याची सविस्तर मांडणी केली आहे. पुस्तकाच्या सुरुवातीला ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अरुणा ढेरे यांचे निवेदन अतिशय मोलाचे आहे. त्या म्हणतात, की 'नैसर्गिक संसाधनांची राखण आणि जपणूक करण्याची गरज सद्यःस्थितीत अत्यंत महत्त्वाची ठरलेली आहे. आणि स्त्रियांची या बाबतीतली भूमिका तर कळीचीच आहे. भारताच्या प्राचीन परंपरेत निसर्ग आणि माणूस यांच्यामध्ये असलेली एकरूपता स्त्रियांच्या संदर्भात अधिक स्पष्टपणे दिसते.

व्रतवैकल्यांपासून सणा-उत्सवांपर्यंत आणि शेतीच्या पद्धतींपासून इतर दैनंदिन व्यवहारांपर्यंत याचे प्रतिबिंब पडलेले दिसते. भारतीय परंपरेतले स्त्री आणि निसर्ग यांच्यातले हे नाते आज कोणत्या वळणावर येऊन ठेपले आहे? परंपरेतले कालबाह्य घटक बाजूला करून कोणत्या सत्त्वांशाचा विचार या नात्याला विधायक रीतीने कार्यशील बनवू शकेल? आजच्या निसर्ग-पर्यावरणाच्या प्रश्नांमध्ये ग्रामीण स्त्रीची भूमिका काय आहे? पर्यावरणाची दुरवस्था आणि स्त्रीची दुरवस्था यांचा परस्पर संबंध काय? स्त्रियांचे सबलीकरण आणि पर्यावरणाचे रक्षण-संवर्धन या दोन्ही क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांना एक विशेष दृष्टी या दस्तावेजाच्या माध्यमातून निश्चित मिळू शकेल.



### तीन प्रकारचे लोक

जगात सर्वसाधारण तीन प्रकारचे लोक राहतात. पहिला वर्ग आपल्या परिसरात जेवढी नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध असते, त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपभोग घेणाऱ्या लोकांचा. चंगळवादी व अति उपभोगवादी. दुसरा वर्ग आहे निसर्गप्रेमी लोकांचा. हे लोक आपल्या परिसरात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा सुयोग्य उपभोग घेऊन निसर्गाशी संवादी पद्धतीने जगतात. तिसरा वर्ग आहे विस्थापितांचा. इतरांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर कब्जा करून

**✍ विजय सांबरे**

त्याचा उपभोग घेता यावा म्हणून पहिल्या विभागातील लोकांनी जे प्रकल्प उभे केले त्याच्या परिणामी विस्थापित झालेले लोक या तिसऱ्या गटात मोडतात. यांना पर्यावरणीय-विस्थापित (Ecological-Refugees) म्हणता येईल. या तिन्ही वर्गांच्या संतुलनावर परिसंस्थांचे संतुलन अवलंबून असते.

### 'फेमिनीझम' तथा पर्यावरणीय स्त्रीवाद

स्त्री आणि सृष्टी यांच्या शोषणांतील परस्परसंबंध या बाबतीत आपल्या देशात कोणत्याही प्रमुख स्त्रीवादी प्रवाहांनी आपली भूमिका स्पष्ट केलेली दिसत नाही. पण योगायोगाची गोष्ट म्हणजे १९६० च्या दशकात पाश्चिमात्य राष्ट्रातल्या स्त्रीवादी चळवळींनी शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये स्त्रियांना समानता मिळावी, अशी मागणी केली आणि साधारण त्याच सुमारास, म्हणजे १९६२ मध्ये रिचेल कार्सन यांच्या 'सायलेंट स्प्रिंग' या पुस्तकाने प्रदूषणाचा मानवी जीवनावर आणि निसर्गावर होणाऱ्या परिणामांची जाणीव सर्वसामान्यांना करून दिली. मात्र 'इकोफेमिनिझम' ही संकल्पना सत्तरीच्या दशकाच्या अखेरीस व ऐंशीच्या दशकातल्या प्रारंभी स्त्रीवादी, पर्यावरणवादी आणि शांततेच्या पुरस्कर्त्यांनी पर्यावरणीय-स्त्रीवाद संकल्पना उचलून धरली. याचे श्रेय फ्रान्सवाज् दि ओबोन या फ्रेंच लेखिकेला जाते. तिने १९७४ मध्ये 'इकोफेमिनिझम' ही संज्ञा निर्माण केली. यिनेस्त्रा किंग यांनी १९७६ च्या सुमाराला ती आणखी विकसित केली आणि १९८० मध्ये तिचे चळवळीत रूपांतर झाले. त्याच वर्षी 'Women and Life on Earth: Ecofeminism in the ८०' ही पहिली परिषद पार पडली.

त्यानंतर जेव्हा जेव्हा स्त्रियांनी पर्यावरणीय संहार, आण्विक संहाराने पृथ्वीवरच्या सजीवांपुढे निर्माण केलेला धोका किंवा जैवतंत्रज्ञानाच्या विरोधात आवाज उठवला, तेव्हा पुरुषसत्ताक पद्धतीचे वर्चस्व आणि स्त्रियांच्या बाबतीतली हिंसा, वसाहतीच्या जोखडात अडकलेले बिगर पाश्चिमात्य, कृष्णवर्णीय लोक आणि निसर्ग यांच्यातील दुवे त्यांच्या हाती आले. यामुळे स्त्रीमुक्ती आणि त्याहीपेक्षा मोठी व्याप्ती असलेले निसर्ग रक्षण आणि पृथ्वीवरच्या सजीवसृष्टीचे संवर्धन या गोष्टी स्वतंत्रपणे साध्य करता येणार नाही, ही जाणीव निर्माण झाली.

### भारतीय विचार परंपरा

प्राचीन भारतीय परंपरेतला 'पर्यावरण-विचार' या पार्श्वभूमीवर विशेष महत्त्वाचा ठरतो. 'पंचमहाभूत' ही संकल्पना व वैश्विक एकात्मतेचा आणि संपूर्ण विश्व हे एक कुटुंब असल्याचा अपूर्व दृष्टिकोन जगासमोर मांडला, तो भारतीय संस्कृतीनेच. सृष्टीतल्या प्रत्येक निर्मितीकडे समभावाने बघण्याची वृत्ती इथल्या प्राचीन समूहांनी रुजवली आणि कोणत्याही स्वार्थभावाखेरीज प्रत्येक सजीवाच्या कल्याणासाठी झटण्याची दृष्टी दिली.

निसर्गाधिष्ठित शाश्वत विकासाची जी संकल्पना 'शांतिपाठा'त (यजुर्वेद संहिता ३६/१७ माध्यंदिन शुक्ल) व्यक्त झाली आहे, त्यामध्येच प्राचीन भारतीय परंपरेच्या निसर्ग-पर्यावरणविषयक विचारांचे सार सामावले आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. आतल्या आणि बाहेरच्या अवकाशात पृथ्वीवर, जळी, सजीवांचे पोषण करणाऱ्या हरित वनस्पतींच्या साम्राज्यात, झाडांमध्ये, जंगलांमध्ये, संपूर्ण विश्वामध्ये, सगळ्या वास्तवामध्ये प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्येक वेळी शांतता आणि समृद्धी नांदावी. फक्त ती आणि तीच नांदावी. प्रत्येकाला शांतता आणि समृद्धीचा लाभ व्हावा अन् गाढ अनुभव मिळावा', अशी आकांक्षा करताना भारतीय परंपरेने निसर्ग आणि माणूस यांची एकरूपता गृहीत धरून सर्वांच्या कल्याणाची प्रार्थना केली आहे.

थोडक्यात, सृष्टी व्यवस्था व स्त्रिया या नात्यातील भावनिक, सांस्कृतिक, व्यावहारिक व आर्थिक पदर समजून घेत त्यांतील बंध नव्याने उभे करायला हवेत. परिसंस्था व महिला यांच्यातील सनातन (अपरिवर्तनीय) नाते नव्याने टिकविण्याची जबाबदारी आपण घ्यायला हवी. त्यांच्यातील सामाजिक, जैव-सांस्कृतिक, पर्यावरणीय, राजकीय व आर्थिक पदर जाणून घ्यायला हवेत.

(विशेष टीप : वरील सर्व प्रक्रिया-उपक्रम केवळ महिलांच्या गळ्यात घालून मोकळे व्हायचे नाही, यात पुरुषांनी देखील सहभाग द्यायचा आहे, याची जाणीव पुरुषवर्गाने ठेवायला हवी.)

### सहजशक्य कृती कार्यक्रम

सृष्टी व्यवस्था व महिला यांच्यातील प्रदेश / परिसरनिहाय सूक्ष्म नाते समजून घेण्यासाठी शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शोध-प्रकल्प देता येतील. त्यातून स्थानिक पातळीवरील जाईल-जंगल-जमीन-जनावरे व महिला यांचा नातेसंबंध नव्याने जगापुढे येईल.

जैवविविधतेचे लोककेंद्री शाश्वत व्यवस्थापन व्हावे, या उद्देशाने आपल्या देशात जैवविविधता अधिनियम अस्तित्वात आहे. या कायद्याची अंमलबजावणीचा एक भाग म्हणून महिलांचे जैवविविधता नोंदणी रजिस्टर (Women's PBR) ही संकल्पना राबवता येईल. यातून गावपातळीवरील उत्तम कायदेशीर दस्तावेज तयार होईल.

नव्याने 'महिला शेतकरी सबलीकरण कायदा' लागू झाला आहे. त्याच्या माध्यमातून महिला व सृष्टी व्यवस्था यांतील नात्याचे पुनरुज्जीवन करण्याची नामी संधी आपणास मिळणार आहे.

महिला व परिसंस्थांचे नाते जाणून घेण्यासाठी विविध शिबिरे, नैसर्गिक वारसा स्थळांच्या भेटी (Natural Heritage Walk) असे उपक्रम पण गावोगावी घेता येतील.

(विशेष टीप : वरील सर्व प्रक्रिया-उपक्रम केवळ महिलांच्या गळ्यात घालून मोकळे व्हायचे नाही, यात पुरुषांनी देखील सहभाग द्यायचा आहे, याची जाणीव पुरुषवर्गाने ठेवायला हवी.)


**मो. ९४२१३२९९४४**
**vijaysambare@gmail.com**
(लेखक शेती, पशुपालन व शाश्वत विकास या विषयांचे अभ्यासक आहेत.)


# 'रेड लाईट डायरीज' मधील मुजऱ्याच्या इतिहास

'मुकद्दर का सिकंदर' मधली रेखाने साकारलेली जोहरा बाई मुंबईच्या कामाठी पुऱ्यातल्या रेड लाईट एरियातील मुजरा गल्लीत वास्तवात होऊन गेली होती. तो काळ स्वातंत्र्यपश्चातच्या नव्या भारताचा होता. १९५० चे दशक असेल ते. ऐंशीच्या दशकानंतर मुजरा नर्तिकांच्या आयुष्याचे धिंडवडे निघाले आणि त्या धंद्याला लागल्या. १९५० च्या आसपास ग्रँटरोडमधील बच्चूच्या वाडीत जोहराबाईचे नाचगाणे चालायचे. जोहराबाईकडे येणाऱ्या लोकांत ब्रिटिशांच्या सेवेत असणारे भारतीय पोलीस शिपाईही असत आणि चोर मवालीही असत! एके दिवशी अंगावर धड कपडे नसलेल्या आणि ओठांवर कोवळी मिसरूड फुटलेल्या पोराने तिचे नाचगाणे पाहिले, तिच्या अदा पाहिल्या. झोपडीवजा घरी गेल्यानंतर जोहराबाई त्याच्या डोक्यातून जात नव्हती. त्याच्या विचारात वासनेचा लवलेश नव्हता कारण त्याने आपल्या आईला जोहराबाईच्या जागी पाहिले आणि त्याच्या मनात भावनांचा हलकल्लोळ माजला. त्याच्या आयुष्यावर परिणाम करून गेलेल्या घटनांपैकी ही एक मुख्य घटना ठरली. (REPOST)

त्या मुलाचा जन्म २२ ऑक्टोबर १९३७ चा, अफगाणिस्तानच्या काबूल मधला. कर्मठ पश्तून काकड जमातीचे हे कुटुंब. फाळणीनंतर या जमातीचे अनेक लोक राजस्थानात स्थलांतरित झाले. त्याचे वडील अब्दुल रहमान कंदहारचे तर आई इक्बाल बेगम आताच्या पाकिस्तानातील बलुच प्रांतातील पस्शीनची. त्याच्या मात्यापित्याच्या पोटी त्याच्या आधी तीन अपत्ये जन्मली होती पण जन्मानंतर काही काळातच ती दगावली. दरम्यान त्याच्या मातेला असे वाटू लागले की इथले वातावरणच आपल्याला मानवत नाहीये तेंव्हा आपण जागा बदलून दुसरीकडे जाऊ. नाहीतर हा चौथा मुलगा देखील मरण पावेल. इक्बाल बेगमच्या हट्टापुढे कोणाचे काही चालले नाही. सगळा बाड बिस्तरा घेऊन हे कुटुंब भारतात आले. बरीच भटकंती करून ते मुंबईत आले. ग्रँटरोडच्या झोपडपट्टीतल्या एका झोपडीत त्यांना छप्पर मिळाले. तिथल्या गटार कचऱ्याच्या गलिच्छ वातावरणात ते राहू लागले. दारूअड्डे, जुगार अड्डे, वेश्यावस्ती आणि कत्तलखाने यांचा त्या कोवळ्या मनाच्या मुलावर खोल आघात झाला. अनंत हाल अपेष्टा आणि उपेक्षा सहन करून तो मुलगा पुढे मोठा लेखक झाला. त्याच्यातल्या संवेदनशील मनाने जोहराबाईला शब्दबद्ध केले. त्यात थोडा फिल्मी मसाला घातला. चित्रपट सुपरडुपर हिट झाला. तो लेखक कादरखान होता!

अशीच गोष्ट 'अमर प्रेम'मधल्या पुष्पाची आहे. पुष्पा आणि जोहराबाई यांच्या कालखंडात चार दशकांचे अंतर असावे. पुष्पा कोलकत्यातल्या शोभाबाजार मधल्या गल्लीत राहायची. आताच्या सोनागाची या रेड लाईट एरियात हा भाग येतो. एकोणीसाव्या शतकात इथं दोन प्रकारच्या वेश्या होत्या, एक देहविक्रय करणाऱ्या आणि दुसऱ्या कोठेवाल्या. पुष्पा कोठेवाली होती, ती दिसायला कमालीची सुंदर कमनीय तर होतीच पण तिच्या आवाजात अत्यंत गोडवा होता. जोहराबाईवर कादरखान यांनी 'मुकद्दर का सिकंदर' लिहिला तेंव्हा सिकंदर आणि विशाल ही काल्पनिक पात्रे लिहिताना सिकंदरमध्ये स्वतःचं बालपण अत्यंत खुबीनं मिसळलं होतं. 'अमरप्रेम'च्या पुष्पाचं तसं नव्हतं. तिच्याकडे येणारा



आनंदबाबू वास्तवात होऊन गेला होता.

१९२० ते १९३० च्या दशकात आनंदबाबूचे पुष्पाकडे येणे जाणे होते त्याच काळात एक अत्यंत भणंग अवस्थेतला उदासवाण्या चेहऱ्याचा तरुण आपल्या मित्रासोबत तिथे यायचा. किशोरवयात त्या तरुणाचे लग्न झाले होते आणि लग्नानंतर अवघ्या काही वर्षात त्याची पत्नी निवर्तली तेंव्हा त्याचे वय होते केवळ एकोणीस

**✍ समीर गायकवाड**

वर्षे! तो तरुण पुष्पाला डोळे भरून बघायचा आणि पहाटेस निघून जायचा! तसे तर त्याच्याकडे काहीच नव्हते, एकदम कफल्लक आणि डिप्रेस्ड होता तो! काही वर्षांनी त्याच्या मनाने उभारी घेतली तेंव्हा त्यांने हाती लेखणी घेतली. आधी मानवी नात्यांच्या कथा लिहिल्या, मानवी मनाची उकल निगुतीने मांडली. त्याच्या काळजाच्या एका कोपऱ्यात ठाण मांडून बसलेला आनंदबाबू आणि पुष्पा देखील शब्दबद्ध झाले. त्याने त्यांच्यावर कथा लिहिली, तिच नाव होते 'हिंगेर कचोरी'! ते साल असावे १९३० च्या आसपासचे. त्या तरुणाचा १९५० च्या सुमारास मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूनंतर एकोणीस वर्षांनी अरविंद मुखर्जी यांनी 'निशी पद्मा' हा बंगाली सिनेमा बनवला.

सिनेमा खूप चालला, त्याला दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. १९७२ मध्ये शक्ती सामंत यांनी याच सिनेमावर आधारित 'अमर प्रेम' बनवला. यातला राजेश खन्नाने साकारलेला आनंदबाबू आणि शर्मिला टागोरने साकारलेली पुष्पा विसरणं अशक्य गोष्ट आहे. पुष्पाला अजरामर करून गेलेला तो महान प्रतिभाशाली लेखक होता विभूतीभूषण बंदोपाध्याय!

विभूतीभूषण बंदोपाध्याय यांच्या आयुष्यात इतके चढ उतार आणि हलाखीचे दिवस येऊन गेले की त्यांच्यावरच एक सिनेमा निघायला हवा. त्यांची पहिली पत्नी लग्नानंतर एका वर्षात निवर्तली. तेंव्हा त्यांचे वय होते एकोणीस वर्षे. वयाच्या ४६ व्या वर्षी त्यांनी दुसरे लग्न केले. त्यांना तारादास नावाचा एक मुलगा झाला. मुलाच्या जन्मानंतर चार वर्षांनी आताच्या झारखंडमधील पूर्वी सिंहभूम जिल्ह्यातील घाटशिला येथे त्यांचे १९५१साली निधन झाले. पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर जवळजवळ २७ वर्षे ते विधुर म्हणून एकांताचे आणि अनेक हालअपेष्टांचे जिणे जगले. याच काळात त्यांनी जी दुनिया बघितली त्यावर आधारित अनुभवांना ते शब्दबद्ध करत गेले. त्यांनी सोळा कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कथांवर अनेक महान चित्रपटांची निर्मिती झाली आहे. मुजरेवाल्या बायकांच्या कथा बॉलिवूडला नेहमीच भुरळ घालत आल्यात. मुजऱ्याचा इतिहासच मुळात रंजक आहे. त्यावर लिहीत गेले की लेखणीला घुंगरु फुटतील पण शाईच्या ऐवजी रक्त पाझरेल हे नक्की!

पुष्पा आणि जोहराबाई यांचं कथात्मक स्वरूप पाहताना लेखकांच्या जडणघडणीचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. आयुष्यभर हालअपेष्टा सोसलेल्या कादरखानानी जोहरा बाईला तिचे प्रेम मिळवता येत नसल्याचे दाखवत ती आत्महत्या करते असं चित्र रंगवले होते तर विभूतीभूषण बंदोपाध्याय यांनी पुष्पाच्या आयुष्यात अनेक काटेरी वळणं आणत देवता दुर्गेशी निगडीत साम्य दाखवत सुखांत केला होता, मात्र त्या दरम्यान पुष्पाच्या आयुष्याची लक्तरे वेशीवर टांगली जातात हेही अधोरेखित केले होते.

जोहराबाई श्रीमंत आणि भव्य वाटते तर पुष्पा सालस, सोज्वळ वाटते!

माणसाचा त्या त्या काळातला जगण्याचा दृष्टिकोन आणि त्याला आलेले अनुभव यातून तो जगाबद्दलची मते ठरवत असतो!

## स्त्री - पुरुष समानता

संसार रथाची दोन चाके
असती पती - पत्नी

कोण वरीष्ठ कोण कनिष्ठ
ही भावना नसावी मनी ..

त्याग संयम प्रेमाची
त्रिसुत्री ज्याच्या अंतरी

त्याची संसाराची वेल
जाते भौ
गगनावरी ...


**प्रा अशोक सारडा**
**मेहकर**
(९४२१३९४३३९)


## देशातील ५ कोटी मुले शाळेत स्वच्छता सुविधांपासून वंचित

नुकताच जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ) आणि संयुक्त राष्ट्रे बालनिधीच्या (युनिसेफ) 'संयुक्त निरीक्षण कार्यक्रमा'द्वारे (जॉइंट मॉनिटरिंग प्रोग्राम) 'शाळांमधील पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि आरोग्य स्वच्छता (हायजीन) यांबाबतची प्रगती २०१५-२०२५' या शीर्षकाखालील अहवाल प्रकाशित करण्यात आला. या अहवालात नमूद केल्यानुसार २०२५ मध्ये जगभरातील १४६ देशातील ज्या २४.४ कोटी मुलांना शाळांमध्ये स्वच्छता सुविधा उपलब्ध नव्हत्या, त्यापैकी सुमारे ५ कोटी मुले आपल्या भारतातील आहेत. हे प्रमाण कोणत्याही देशाच्या तुलनेत सर्वाधिक आहे. या अहवालानुसार भारतातील सुमारे २ कोटी मुलांना शाळेत आरोग्य स्वच्छतेची (हायजीन) आणि १.२ कोटी मुलांना पिण्याच्या पाण्याची पुरेशी सुविधा मिळत नाही. असे असले तरी २ ऑक्टोबर २०१४ रोजी सुरू झालेल्या स्वच्छ भारत अभियानामुळे या मूल्यांकन काळात भारतातील स्वच्छता सुविधा नसलेल्या शाळांच्या प्रमाणात १४ टक्क्यांची घट नोंदवली गेली आहे. तसेच शाळांमधील पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेच्या बाबतीत भारताची कामगिरी तुलनेने चांगली राहिल्याचे अहवालात म्हटले आहे. भारतानंतर शाळांमध्ये स्वच्छता सुविधा उपलब्ध नसलेली ३ कोटी ४० लाख मुले नायजेरियात, २ कोटी ६० लाख इथिओपियामध्ये, १ कोटी १० लाख काँगोचे लोकशाही प्रजासत्ताकमध्ये आणि ८० लाख इंडोनेशियामध्ये होती. सरकारने या अहवालातील भारताच्या संदर्भातील निष्कर्षांचे गांभीर्य ओळखून युद्धपातळीवर उपाययोजना गरजेचे आहे.

**प्रदीप मोरे**

## मुलांची व्यसनाधीनतेतून सुटका होणे आवश्यक

आपल्या राज्यातील तरुण पिढी व्यसनांच्या विळख्यात अडकू नये यासाठी सर्वच स्तरावर व्यापक प्रयत्न होण्याची गरज आहे. समाजाने आपली बांधिलकी जपतानाच सरकारनेदेखील ती जपायला पाहिजे.

त्यासाठी सरकारने राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये व्यसनमुक्ती मार्गदर्शन व समुपदेशन समित्या स्थापन करणार असल्याची अलीकडेच घोषणा केली. राज्यभरातील शाळा, महाविद्यालये शासनाच्या या मोहिमेत सहभागी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या मोहिमेनुसार संपूर्ण राज्यात तरुण पिढीसाठी समुपदेशन सत्रे, मार्गदर्शन उपक्रम आणि परस्पर संवाद साधणारे कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत. या मोहिमेत केवळ महाविद्यालयीन तरुणच नव्हे तर त्यांचे पालक आणि शिक्षकांनीदेखील सहभागी झाले पाहिजे.

मुलांची व्यसनाधीनता म्हणजे आपल्या समाजाला लागलेली कीड आहे. ती सर्वांच्या प्रयत्नाने संपवली पाहिजे. व्यसनात अडकलेली मुले पुढे गुन्हेगारी विश्वाकडे जास्त आकर्षित होतात. त्यामुळे समाजाचे आणि देशाचेही भावी मोठे नुकसान टाळण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजेत.

त्या प्रयत्नांचाच भाग म्हणून राज्य शासनाच्या या मोहिमेकडे पहिले पाहिजे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचा पुरवठा कोण करतो याचाही छडा लावला पाहिजे.

तरुणांच्या प्रबोधनाचाही समाजाने सातत्याने विचार केला तरच तरुण पिढी व्यसनापासून दूर राहू शकेल.

**प्रा. मधुकर चुटे**




# नो-हॉकर्स मार्गावर मनपाचा दणका; अतिक्रमणे हटविली

## रतनलाल प्लॉट ते उमरी स्मशानभूमी मार्गावर कारवाई; रस्ते मोकळे करण्याची मोहीम

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील प्रमुख रस्ते आणि चौकांवर पथविक्रेते व फेरीवाल्यांनी केलेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडीसह पादचाऱ्यांना होणारा त्रास लक्षात घेता महापालिका प्रशासनाने नो-हॉकर्स मार्गावरील अतिक्रमणांविरोधात कारवाईचा धडाका सुरू केला आहे. मंगळवारी पूर्व झोनअंतर्गत रतनलाल प्लॉट ते उमरी स्मशानभूमीपर्यंतच्या मार्गावरील दुकानांसमोरील तसेच रस्त्याच्या कडेला करण्यात आलेली अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली.



शहरातील वाहतूक सुरळीत राहावी आणि नागरिकांना रस्त्यावरून मोकळेपणाने ये-जा करता यावी, यासाठी अकोला शहरातील २३ मार्गावर पथविक्रेत्यांना व्यवसाय करण्यास मनाई करण्यात आली आहे. पोलिस अधीक्षकांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने मनपाच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक ५८, दि. १४ सप्टेंबर २०२६ रोजी मंजूर केला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करत महापालिका प्रशासनाने आता नो-हॉकर्स मार्गांवरील अतिक्रमणांवर कारवाई सुरू केली आहे.

मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशाने आणि सहायक आयुक्त गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पूर्व झोनअंतर्गत रतनलाल प्लॉट ते उमरी स्मशानभूमी या मार्गावर किरकोळ व्यावसायिक तसेच दुकानांसमोर अतिक्रमण करणाऱ्यांवर अतिक्रमण निर्मूलन पथकाने कारवाई केली. रस्त्याच्या कडेला वाढविण्यात आलेला व्यवसायाचा पसारा हटवून मार्ग मोकळा करण्यात आला.

### २३ मार्गांवर व्यवसायाला मनाई

महापालिकेने निश्चित केलेल्या २३ नो-हॉकर्स मार्गावर पथविक्रेते व फेरीवाल्यांना व्यवसाय करण्यास मनाई आहे. या मार्गावर पुन्हा अतिक्रमण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून सातत्याने कारवाई करण्याची भूमिका घेण्यात आली आहे. या कारवाईत सहायक अतिक्रमण अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, कनिष्ठ अभियंता राहुल राऊत, अक्षय बोर्डे यांच्यासह अतिक्रमण निर्मूलन पथकातील कर्मचारी सहभागी झाले होते.

# शेतकऱ्यांच्या बांधावर प्रशासनाची धडक!

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

पावसाने पाठ फिरवल्याने पिके करपली, शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर हंगाम उद्ध्वस्त होण्याची वेळ आली. दुष्काळसदृश परिस्थितीच्या झळा सोसणाऱ्या तेल्हारा तालुक्यात अखेर प्रशासनाची यंत्रणा शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचली आहे. १९ सप्टेंबरपासून तालुक्यात पिकांच्या नुकसानीचे प्रत्यक्ष सर्वेक्षण आणि पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. मात्र, पंचनाम्यांची कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष मदतीचा हात शासन कधी पुढे करणार, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. दानापूर येथील शेतकरी दिलीप विखे यांच्या शेतातून नुकसान सर्वेक्षणाला सुरुवात करण्यात आली. महसूल अधिकारी अंकुश मानकर आणि कृषी अधिकारी इंगळे यांच्या उपस्थितीत शेतातील पिकांची पाहणी करून नुकसानीची नोंद घेण्यात आली. त्यानंतर महसूल आणि कृषी विभागाची यंत्रणा गावागावांत पोहोचून बाधित पिकांची पाहणी करीत आहे.



## पिकांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू; मदतीसाठी शेतकऱ्यांचे डोळे शासनाकडे

### पंचनामे होणार, पण मदत कधी?

तहसीलदार कार्यालयाच्या आदेशानुसार तयार करण्यात येणारे पंचनामे तालुकास्तरीय समितीच्या संयुक्त स्वाक्षरीने शासनाकडे सादर करण्यात येणार आहेत. मात्र, शेतकऱ्यांसाठी केवळ पंचनामे हा दिलासा ठरू शकत नाही. पिकांचे नुकसान झाल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष आर्थिक मदतीची प्रतीक्षा आहे. पावसाच्या दीर्घ खंडामुळे उभ्या पिकांची अवस्था बिकट झाली आहे. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाच्या लहरीपणामुळे हिरावला जात असताना आता शासनाच्या मदतीकडे शेतकऱ्यांचे डोळे लागले आहेत. त्यामुळे सर्वेक्षण आणि पंचनाम्यांची प्रक्रिया कोणत्याही दिरंगाईशिवाय पूर्ण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### अहवाल शासनाकडे; निर्णयाकडे लक्ष

नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाल्यानंतर तालुकास्तरीय अहवाल शासनाकडे सादर होणार आहे. मात्र, अहवाल सादर झाल्यानंतर त्यावर शासन किती वेगाने निर्णय घेते, हा खरा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचलेले प्रशासन आता मदतीचा हात कधी पोहोचवते, याकडे संपूर्ण तेल्हारा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### महसूल-कृषी यंत्रणा थेट शेतशिवारात

दुष्काळसदृश परिस्थितीमुळे पिकांना मोठा फटका बसला आहे. त्यामुळे प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीची वस्तुनिष्ठ नोंद करण्याचे काम सुरू झाले आहे. महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी तथा ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्यावर गावनिहाय पाहणीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. शेतकरी आणि संबंधित यंत्रणेच्या उपस्थितीत संयुक्त पाहणी करून नुकसानीची नोंद केली जात आहे.

# पाणीटंचाई, वन्यप्राण्यांचा हैदोस; शासकीय मदतीची प्रतीक्षा

## रानडुक्कर, गीर गायींमुळे पिकांचे नुकसान; उमेश कडू यांच्या शेतातील प्रकार



■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

पावसाअभावी निर्माण झालेली पाणीटंचाई, त्यात रानडुक्कर व गीर गायींचा पिकांवरील उपद्रव आणि नुकसान होऊनही शासकीय मदतीची प्रतीक्षा, अशा तिहेरी संकटामुळे तेल्हारा तालुक्यातील रायखेड परिसरातील शेतकऱ्यांचे जगणे कठीण झाले आहे. शेतातील उभ्या पिकांचे वन्यप्राण्यांकडून नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

रायखेड येथील शेतकरी उमेश कडू यांच्या शेतात रानडुक्कर तसेच गीर गायींचा मोठ्या प्रमाणात उपद्रव होत असल्याचे समोर आले आहे. आधीच पाण्याअभावी पिकांची अवस्था बिकट असताना वन्यप्राण्यांकडून पिकांची नासधूस होत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.

शेतकरी दिवसरात्र मेहनत करून, कर्ज काढून आणि मोठ्या अपेक्षेने पीक उभे करतात. मात्र, पिके ऐन हंगामात वन्यप्राण्यांच्या तावडीत सापडत असल्याने त्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले जात आहे. उत्पादनातून कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि कर्जाची परतफेड करण्याची आशा असलेल्या शेतकऱ्यांसमोर आता आर्थिक संकट उभे ठाकले आहे. पावसाची अनिश्चितता, पाण्याची टंचाई आणि वन्यप्राण्यांचा वाढता उपद्रव यामुळे शेती करायची कशी, असा सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून नुकसान नोंदविणे आणि त्यानुसार मदत देणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

**तातडीने पंचनामे करण्याची मागणी :** रायखेड परिसरातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतांची तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत, पिकांच्या नुकसानीची योग्य नोंद घेऊन भरपाई द्यावी, तसेच रानडुक्कर व अन्य वन्यप्राण्यांच्या उपद्रवावर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. शासन व संबंधित विभागांनी केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष मदतीसाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# 'ते' दिवस पुन्हा आले... ३५ वर्षांनी मित्रमैत्रिणींची गळाभेट!

## आदर्श विद्यालयाच्या १९९०च्या दहावीच्या तुकडीचे राजदीप कृषी पर्यटन केंद्रावर स्नेहमिलन

■ प्रतिनिधी | अकोला ■

शाळा सुटली, वाटा बदलल्या; मात्र मैत्रीची नाती तुटली नाहीत. तब्बल ३५ वर्षांनंतर आदर्श विद्यालयाच्या १९९० सालच्या दहावीच्या तुकडीतील माजी विद्यार्थी एकत्र आले आणि जुन्या आठवणींना उजाळा देत शालेय जीवनातील 'ते' दिवस पुन्हा अनुभवले. चिखलगाव येथील राजदीप कृषी पर्यटन केंद्रावर रविवारी झालेल्या या स्नेहमिलन सोहळ्याला माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



जिल्ह्यात तसेच अन्य जिल्हे आणि राज्यांत वास्तव्यास असलेले बहुतांश माजी विद्यार्थी आवर्जून या सोहळ्यास उपस्थित राहिले. कुणी शासकीय सेवेत स्थिरावले, कुणी व्यवसाय-उद्योग उभारला, तर अनेकांच्या मुलांनी नोकरीच्या क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. काहींची पुढील पिढी शिक्षण घेत आहे. आयुष्याच्या ३५ वर्षांच्या प्रवासात आलेले अनुभव, संघर्ष आणि यशाची कहाणी प्रत्येकाने मनोगतातून मांडली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आदर्श विद्यालयातील दिवंगत शिक्षक तसेच दिवंगत माजी विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर उपस्थित माजी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. स्नेहमिलनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल पंकज जायले यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. वर्षानुवर्षे संपर्कात नसलेले मित्र-मैत्रिणी समोरासमोर येताच जुन्या आठवणींचा जणू पटच उलगडला. शाळेतील किस्से, वर्गातील गंमती-जमती, शिक्षकांच्या आठवणी आणि मैत्रीचे जुने क्षण यांची मनमोकळी देवाणघेवाण झाली. अनेक वर्षांनंतरच्या भेटीमुळे वातावरण भावनिक झाले होते. जुन्या मित्रांच्या गळाभेटीतून आणि हास्यविनोदातून शालेय जीवनातील उत्साह पुन्हा अनुभवायला मिळाला. दरवर्षी स्नेहमिलन आयोजित करून मैत्रीचा हा स्नेहबंध कायम ठेवण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. आगामी स्नेहमिलन सोहळ्यात तत्कालीन शिक्षकांना त्यांच्या कुटुंबीयांसह सहभागी करून घेण्याचाही मानस माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. शाळेने दिलेले संस्कार, मैत्रीने दिलेली साथ आणि आयुष्याने दिलेले अनुभव पुढील पिढीसाठी प्रेरणादायी ठरावेत, असा सूर या स्नेहमिलनातून उमटला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुधीर पाटील यांनी केले. आभार विवेक ठोसर यांनी मानले. पत्रकार विठ्ठल महल्ले यांनी बहारदार सूत्रसंचालन केले. प्रकाश मनवर यांनी सादर केलेल्या मराठी व हिंदी गीतांनी उपस्थितांची मने जिंकली. स्नेहमिलनाच्या यशस्वी आयोजनासाठी नीरज ठाकूर, प्रशांत पाटील, विजय काकड, रवी गावंडे, विनोद कावरे, डॉ. दिनेश बोंबटकर, राजेंद्र चव्हाण, प्रशांत महल्ले, डॉ. सुधीर पाटील, विवेक ठोसर, श्याम राठी, घनश्याम माने, प्रदीप गावंडे, विजय खंडे, गजानन काठोळे, अनिल जाधव, शकील पठाण, प्रीती पोटे, शुभांगी उभाले, आर्यप्रभा काळे(घुले), राधा रत्नपारखी, नीता चौधरी, विठ्ठल महल्ले, प्रकाश मनवर, पंकज जायले, संजय नृपनारायण, ॲड. सुबोध गावंडे आणि प्रताप भगत यांनी परिश्रम घेतले.

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ८८/२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक** - श्रीमती गोदावरीबाई बगडिया चॉरिटेबल ट्रस्ट अकोला.

**अर्जदार :-** श्री. शिवप्रकास कालुराम रुहाटीय रा. दुर्गा चौक, तापडीया नगर, अकोला.

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविन्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त – १ अकोला विभाग अकोला हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुदयावर चौकशी करणार आहेत. १) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ? २) खाली निर्दिष्ट केलेला मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन) :-** रोख रक्कम रु. २१०००/- अध्यक्ष जवळ जमा आहे.

**स्थावर मिळकत (वर्णन) :-** काही नाही

सदरच्या चौकशी प्रकारना मध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत हि नोटिस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला - १ यांच्या शिक्क्यानिशी आज दिनक २८/०९/२०२६ रोजी दिली.

**अधिक्षक**
(शिक्का) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६२०/२०२६ — प्रोसेस नं.१२३९७/२०२६
चौ.ता. ०५/११/२०२६ — दिनांक : २८/०९/२०२६

**अर्जदार :** १. पुष्पा प्रल्हाद कोठाळे रा. डॉ. पिंजरकर हाउसच्या जवळ, छोटी उमरी, अकोला ता. जि. अकोला. २. प्रफुल प्रल्हाद कोठाळे रा. डॉ. पिंजरकर हाउसच्या जवळ, छोटी उमरी, अकोला, ता. जि. अकोला ७०६६८८८९६९ ३. प्राची चंद्रभान गिलबिले लग्नाअगोदरचे प्राची प्रल्हाद कोठाळे रा. सावंगा बु, अमरावती. जि. अमरावती, ४. पंकज प्रल्हाद कोठाळे ग. डीके पेट्रोल पंपाजवळ, लहान उमरी, अकोला, ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रल्हाद केशवराव कोठाळे
**पत्ता :-** रा. डॉ. पिंजरकर हाउसच्या जवळ, छोटी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रल्हाद केशवराव कोठाळे यांचे दि १६/११/२०२३ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. संबंध वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी, आज दिनांक २८/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
(शिक्का) अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २८९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ७९/२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :** श्री. योग योगेश्वर सेवा समिती वरूर जऊळका, ता. अकोट, जि. अकोला.

**अर्जदार :-** सौ. रुपाली गणेश शेटे रा. वरूर जऊळका, ता. अकोट, जि. अकोला.

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविन्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त – १ अकोला विभाग अकोला हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुदयावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?

२) खाली निर्दिष्ट केलेला मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन) :-** रोख रक्कम रु. १०००/- अध्यक्ष जवळ जमा आहे.

**स्थावर मिळकत (वर्णन) :-** काही नाही

सदरच्या चौकशी प्रकारना मध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत हि नोटिस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला - १ यांच्या शिक्कयानिशी आज दिनक २८/०९/२०२६ रोजी दिली.

**अधिक्षक**
(शिक्का) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६१४/२०२६ — प्रोसेस नं.१२३९८/२०२६
चौ.ता. ०७/११/२०२६ — दिनांक : २८/०९/२०२६

**अर्जदार :** १. प्रविण बालाप्रसाद भुतडा, मो. क्र. ९८८१४११४९६, २. ईशान प्रविण भुतडा ३. मयंक प्रविण भुतडा सर्व रा. पोस्टल कॉलनी, संतोष नगर, आगाशे गुरूकुल, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : पुजा प्रविण भुतडा
**पत्ता :-** रा. पोस्टल कॉलनी, संतोष नगर, आगाशे गुरूकुल, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत पुजा प्रविण भुतडा यांचे दि. २४/११/२०२५ रोजी राहत्या घरी, संतोष नगर, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
(शिक्का) अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५३३/२०२६ — प्रोसेस नं.११४५७/२०२६
चौ.ता. ०७/११/२०२६ — दिनांक : ०७/०९/२०२६

**अर्जदार :** १. यमू बाबुराव सुर्यवंशी २. गजानन बाबुराव सुर्यवंशी ३. प्रभाकर बाबुराव सुर्यवंशी मयत तर्फे वारस ३अ. छाया प्रभाकर सुर्यवंशी ३ब. तुषार प्रभाकर सुर्यवंशी सर्व रा. सिद्धार्थ नगर, न्यु तारफैल, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : बाबुराव दौलतराव सुर्यवंशी
**पत्ता :-** रा. सिद्धार्थ नगर, न्यु तारफैल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत बाबुराव दौलतराव सुर्यवंशी यांचे दि. ३०/०४/२००७ रोजी राहत्या घरी, सिद्धार्थ नगर, न्यु तारफैल, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
(शिक्का) अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५८९/२०२६ — प्रोसेस नं.१२४०२/ २०२६
चौ.ता. ०४/११/२०२६ — दिनांक : २९/०९/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती रमाबाई आनंदा शिरसाट २. कुणाल आनंदा शिरसाट ३. किरण आनंदा शिरसाट सर्व रा. रमाबाई चौकाजवळ, भिम नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : आनंदा मुकिंदा शिरसाट
**पत्ता :-** रा. रमाबाई चौकाजवळ, भिम नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत आनंदा मुकिंदा शिरसाट यांचे दि. २३/०६/२०२० रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
(शिक्का) अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५३८/२०२६ — प्रोसेस नं.११७९०/२०२६
चौ.ता. २१/१०/२०२६ — दिनांक : १६/०९/२०२६

**अर्जदार :** जानराव सदाशिव बनसोड (महार), वय ७६ वर्षे, धंदा- मजुरी, रा. रमेश नगर, भांगी पुरा जवळ, डाबकी रोड, ता. व जि. अकोला, मो.क.८९७५९९०३३६

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सदाशिव रामा बनसोड (महार)
**पत्ता :-** रा. रमेश नगर, भांगी पुरा जवळ, डाबकी रोड, ता. व जि. अकोला,

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सदाशिव रामा बनसोड यांचे दि.२७/०५/१९९१ रोजी रमेश नगर, डाबकी रोड, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
(शिक्का) अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२७२/२०२६ — प्रोसेस नं.९९४१/२०२६
चौ.ता. ३०/०९/२०२६ — दिनांक : ०१/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती संगिता शाम मोरस्कर २. रश्मी शाम मोरस्कर ३. ऋषीकेश शाम मोरस्कर नं. १ ते ३ रा. घाटोळ लेआउट, शंकर नगर, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला. ४. सौ. स्नेहा जयंत सोनार रा. घर नं. १००८, सर्व्हे नं. १११/अ, विजय नगर, निर्मल बेथनी शाळेजवळ, काळेवाडी, पिंपरी, पुणे शहर, पिपरी कॉलनी, पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शाम विश्वनाथ मोरस्कर
**पत्ता :-** रा. घाटोळ लेआउट, शंकर नगर, जठारपेठ, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शाम विश्वनाथ मोरस्कर यांचे दि. १३/०१/२०२३ रोजी लेन २५, अशोका सोसायटी, थेरगाव, पिंपरी चिंचवड, हवेली पुणे येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
(शिक्का) प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# प्रवाशांशी हुज्जत, शिवीगाळ अन् बससेवेचा बोजवारा

## खैरवाडा पाटीवर महिलांना उतरविल्याचा आरोप; महिला चालकाविरुद्ध आर्वी आगारात तक्रार

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

एसटी बस ही ग्रामीण भागातील प्रवाशांची जीवन वाहिनी मानली जाते. मात्र प्रवाशांशी उद्धट वर्तन, हुज्जत आणि गैरसोयीबाबत चालक वाहकांविरुद्ध सातत्याने तक्रारी पुढे येत असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी वाढत आहे. त्यातच खैरवाडा येथे प्रवाशांना बसमधून उतरविताना महिला चालकाने अश्लील शब्दांत शिवीगाळ केल्याचा आरोप समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

२८ सप्टेंबर रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास एमएच ४० ए.क्यू. ६३२४ क्रमांकाची बस ब्राम्हणवाडा येथे न जाता खैरवाडा पाटीवर थांबविण्यात आल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. यावेळी प्रवाशांना तेथेच उतरविण्यात आले. याबाबत विचारणा केली असता महिला चालकाने नागरिकांना अश्लील शब्दांत शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे.



घटनेवेळी हरीश चारोडे, ब्राम्हणवाडा येथील पोलीस पाटील तसेच काही ग्रामस्थ उपस्थित असल्याचे तक्रारीत नमूद आहे. खैरवाडा पाटी ते ब्राम्हणवाडा हे अंतर सुमारे दोन किलोमीटर आहे. बसमध्ये तीन ते चार वयोवृद्ध महिला प्रवासी होत्या. त्यांना पुढील प्रवासासाठी पायी जावे लागल्याने मोठी गैरसोय झाल्याचे तक्रारदारांनी म्हटले आहे.या घटनेची कथित व्हिडीओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. त्यामुळे प्रकरणाची चर्चा गावागावात सुरू झाली आहे. चालक वाहकांच्या गैरवर्तनाबाबत अनेक ठिकाणांहून तक्रारी येत असून त्यात महिला प्रवाशांचाही मोठ्या प्रमाणात समावेश असल्याचा दावा नागरिकांकडून केला जात आहे.

प्रवाशांच्या तक्रारी ऐकून घेण्यासच यंत्रणा तयार नसल्याची भावना निर्माण होत असेल तर ही बाब एसटी प्रशासनासाठी गंभीर इशारा आहे. आर्वी आगारप्रमुख संबंधित तक्रारीची निष्पक्ष चौकशी करून आरोपांची सत्यता तपासणार का आणि दोष आढळल्यास संबंधित महिला चालकावर नियमानुसार कारवाई करणार का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# ३ हजार वृक्षांचे संवर्धन; नवोदयच्या विद्यार्थ्यांचा गौरव

**वर्धा/जनमाध्यम**

पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी केवळ प्रशासनाची नसून प्रत्येकाची आहे, हा संदेश कृतीतून देणाऱ्या जवाहर नवोदय विद्यालय, सेलू काटे येथील विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. वनविभाग प्रादेशिक व सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या ३०० कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल विद्यार्थ्यांना विकास भवन येथे सन्मानित करण्यात आले.




विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य तथा उपप्राचार्य प्रिया गजभिये यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिक्षिका रंजना वानखेडे यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात विविध प्रजातींच्या २०० पेक्षा अधिक वृक्षांची लागवड केली.राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते शिक्षक रंजना वानखेडे, अक्षय साटोणे तसेच विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष डॉ. सुधीर पांगुळ, उपवनसंरक्षक हरविर सिंग, सामाजिक वनीकरण विभागाचे मुख्य वनाधिकारी सुहास बढेकर, उपसंचालक मंगेश ठेंगडी उपस्थित होते. जीविका अडकने, ईश्वरी बजाईत, अनुष्का वागदे, सुप्रिया भगत, अन्वयी हुमने, अलीना शेख, सृष्टी डोळे, इशिका वानखेडे, अवनी महाजन, सान्वी वंजारे, जिया लोखंडे, यांचा गौरव करण्यात आला. पर्यावरण अभ्यासकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले.

# शेतात पीक, मोबाईलवर दुसरेच लोकेशन

**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

खरीप पिकांची ई-पिक पाहणी करून नोंदणी करण्याच्या प्रक्रियेत मोबाईल ॲपमधील लोकेशन आणि मॅपच्या तांत्रिक घोळाने सिंदी रेल्वे परिसरातील शेतकऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. प्रत्यक्ष शेतात उभे राहून पीक नोंदणी करण्याचा प्रयत्न केला तरी ॲपवर शेतापासून तब्बल दोन ते तीन किलोमीटर अंतरावरील वेगळेच लोकेशन दाखविले जात असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून होत आहेत.



## ई-पिक पाहणीत मॅपचा घोळ; सिंदी रेल्वे शिवारातील पीक नोंदणी रखडली

शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापूस, तूर यासह खरीप पिकांची ई-पिक पाहणी करणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्ष शेताची जागा आणि ॲपवरील मॅप यांचा मेळच बसत नसल्याने नोंदणीची प्रक्रिया अडखळत आहे. लोकेशन अचूक येण्यासाठी शेतकऱ्यांना वारंवार प्रयत्न करावे लागत असून अनेकदा शेतात पुन्हा जावे लागत आहे. त्यात मोबाईल नेटवर्कची समस्या असल्यास अडचण आणखी गंभीर होत आहे.

**शेतकऱ्यांच्या कष्टाचा खेळखंडोबा**

पीक नोंदणी ही केवळ कागदोपत्री प्रक्रिया नसून शासकीय योजनांचा लाभ आणि पीकविषयक मदतीसाठी महत्त्वाची ठरते. त्यामुळे तांत्रिक घोळामुळे एखाद्या शेतकऱ्याची नोंदणी अपूर्ण राहिल्यास भविष्यात प्रशासकीय अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

**मॅप दुरुस्त करा, शेतकऱ्यांना दिलासा द्या**

सिंदी रेल्वे शिवारातील मॅप आणि लोकेशनची तांत्रिक त्रुटी तातडीने दूर करावी. तांत्रिक कारणामुळे नोंदणी रखडलेल्या शेतकऱ्यांसाठी पर्यायी सुविधा उपलब्ध करून देत मुदत संपण्यापूर्वी सर्व पीक नोंदी पूर्ण करून घ्याव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# हिंदी सामासिक संस्कृतीचे वहन करते - प्रो. कुमुद शर्मा

**वर्धा/जनमाध्यम**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात हिंदी माह समारोप समारंभांतर्गत 'हिंदीचे वर्तमान आणि भविष्य' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांनी हिंदी भाषा सामासिक संस्कृतीचे वहन करते, असे प्रतिपादन केले. सर्व भारतीय भाषा आपल्या राष्ट्रीय भाषा आहेत, असेही त्यांनी सांगितले. गालिब सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला दैनिक भास्करचे समूह संपादक प्रकाश दुबे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी कुलसचिव डॉ. सुरेंद्र गादेवार आणि जनसंपर्क अधिकारी बी. एस. मिरगे मंचावर उपस्थित होते.



कुलगुरू प्रो. शर्मा म्हणाल्या की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंतर्गत हिंदीसोबतच सर्व भारतीय भाषांचा सन्मान केला पाहिजे.

भारतीय भाषा एका कुटुंबाप्रमाणे आहेत. पत्रकारिता आणि हिंदीच्या संबंधांचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, हिंदीच्या विकासाच्या प्रवासात पत्रकारितेची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. हिंदीच्या वर्तमान स्थितीविषयी बोलताना त्यांनी सांगितले.प्रकाश दुबे म्हणाले की, हिंदीला पुढे नेण्यात हिंदीतर भाषिक पत्रकार आणि लेखकांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. आपण आपल्या भाषेसोबतच इतर भाषांचाही सन्मान केला पाहिजे.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्ज्वलन आणि कुलगीत गायनाने झाली. कार्यक्रमाचे संचालन हिंदी अधिकारी राजेश यादव यांनी केले.

तर कुलसचिव डॉ. सुरेंद्र गादेवार यांनी आभार मानले.यावेळी प्रो. अवधेश कुमार, प्रो. कृपा शंकर चौबे, डॉ. एच. ए. हुनगुंद, डॉ. बालाजी चिरडे, डॉ. रामानुज अस्थाना, डॉ. अशोक नाथ त्रिपाठी, डॉ. राजेश लेहकपुरे, डॉ. रूपेश कुमार सिंह, डॉ. संदीप सपकाळे, डॉ. रेणु सिंह, डॉ. विरेंद्र प्रताप यादव, डॉ. राकेश फकलियाल, डॉ. कोमल कुमार परदेशी, डॉ. शिवसिंह बघेल, डॉ. अभिषेक सिंह, डॉ. प्रदीप, डॉ. अमित विश्वास यांच्यासह शोधार्थी व विद्यार्थी उपस्थित होते.

# दाखल्यांसाठी भटकंती थांबली; शासन पोहोचले दारी

## दहेगाव मुस्तफा येथे 'भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान'

**आर्वी/जनमाध्यम**

शासकीय दाखले आणि योजनांच्या लाभासाठी तालुक्याच्या ठिकाणी वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी प्रशासनाने दहेगाव मुस्तफा येथे विशेष शिबिराचे आयोजन केले. 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' अभियानांतर्गत २७ ते २९ सप्टेंबरदरम्यान राबविण्यात येत असलेल्या 'भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियाना'चा भाग म्हणून २७ सप्टेंबर रोजी हे शिबिर घेण्यात आले. उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिबिराला तहसीलदार हरीश काळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी महसूल, कृषी, पंचायत समिती, आरोग्य, पुरवठा आणि सेतू केंद्रासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील पात्र नागरिकांना जात, उत्पन्न, अधिवास यांसह आवश्यक प्रमाणपत्रे मिळावीत तसेच शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा, या उद्देशाने नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. महसूल विभागाकडून सातबारा उतारा व विविध सेवा, कृषी विभागाकडून योजना आणि प्रमाणपत्रांची माहिती, तर आरोग्य विभागाकडून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

शेतकरी, शेतमजूर, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थांनी आपल्या अडचणी अधिकाऱ्यां समोर मांडल्या. शक्य त्या प्रकरणांचा शिबिरस्थळीच निपटारा करण्यात आला. उर्वरित प्रकरणांसाठी संबंधित विभागांकडे पुढील कार्यवाहीचे मार्गदर्शन करण्यात आले.

# समान कामासाठी समान वेतन लागू करा

**वर्धा/जनमाध्यम**

राज्य शासकीय, निमशासकीय तसेच जिल्हा परिषद आस्थापनेवरील वाहन चालकांच्या वेतनातील तफावत दूर करून समान कामासाठी समान वेतनाचे तत्त्व लागू करावे,या प्रमुख मागणीसाठी राज्य शासकीय,निमशासकीय व जिल्हा परिषद वाहन चालक वर्ग-३ कर्मचारी संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी वान्मथी सी तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांना निवेदन देण्यात आले.

वाहनचालक हे केवळ वाहन चालविणारे कर्मचारी नसून शासकीय यंत्रणेच्या दैनंदिन कामकाजातील महत्त्वाचा घटक आहेत. पूर, अतिवृष्टी, वादळ, भूकंप, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती तसेच कोरोना महामारीसारख्या आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षेशी संबंधित कामांमध्ये वाहन चालकांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली आहे. त्यामुळे त्यांच्या कामाचे स्वरूप व जबाबदारी लक्षात घेऊन वेतनाबाबत समान धोरण असावे, अशी मागणी संघटनेने केली आहे.



राज्य शासकीय, निमशासकीय व जि.प. वाहनचालकांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

निवेदनात मुंबई उच्च न्यायालयातील वाहनचालकांना लागू असलेल्या वेतनश्रेणीच्या धर्तीवर राज्यातील संबंधित शासकीय आस्थापनांमधील वाहनचालकांना वेतनश्रेणी लागू करावी, तसेच वेतन आयोगातील एस-१० वेतनश्रेणी 'समान काम समान वेतन' या तत्त्वानुसार लागू करून त्यानुसार सर्व लाभ मंजूर करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

वाहनचालकांच्या कामाचे स्वरूप, जबाबदाऱ्या आणि सेवाकालाचा विचार करून वेतनातील विसंगती दूर करावी, अशी मागणी संघटनेने निवेदनातून केली.

जिल्हाधिकारी वान्मथी सी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्याकडे निवेदन सादर करून या मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही करण्याची विनंती करण्यात आली.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष विजय चिंचोळकर, सचिव ज्ञानेश्वर शा. वावडेकर, तसेच वाहनचालक शुभम महत्वानी, किशोर गोहणे, ओम उमाटे, नदीम शेख, वैभव सेलोटकर यांच्यासह इतर वाहनचालक उपस्थित होते.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक - ३०३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# भूमिगत नाले तुंबले, पालिकेची यंत्रणा कुचकामी

## आर्वीत गाळ उपसण्यासाठी अत्याधुनिक मशीनची मागणी

**आर्वी/जनमाध्यम**

शहरातील भूमिगत नाल्यांचे जाळे उभारले, मात्र त्याच्या देखभालीसाठी आवश्यक यंत्रसामग्रीची सोयच केली नसल्याने आर्वीकर नागरिकांना आता नाले तुंबण्याच्या संकटाला सामोरे जावे लागत आहे. भूमिगत नाल्यांमध्ये कचरा, गाळ आणि घाण साचत असून अनेक भागांत दुर्गंधी आणि पाणी साचण्याच्या समस्या निर्माण होत आहेत.



नाल्यांची सफाई करण्यासाठी नगरपालिकेकडे अत्याधुनिक यंत्रणा उपलब्ध नसल्याने कर्मचाऱ्यांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता असल्याने पालिका प्रशासनाने आता केवळ तात्पुरती साफसफाई न करता कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

यासाठी एल्मूदह एल्स् वूग्हु ईम्प्हा खरेदी करण्याची मागणी जोर धरत आहे. उच्च दाबाच्या पाण्याच्या प्रवाहाने नाल्यातील कचरा आणि घट्ट गाळ ढकलला जातो. त्यानंतर सक्शन यंत्रणेद्वारे हा गाळ आणि घाण थेट टाकीत खेचून घेतली जाते. त्यामुळे भूमिगत नाल्यांची सफाई जलद आणि प्रभावीपणे करता येते. विशेष म्हणजे सफाई कर्मचाऱ्यांना धोकादायक पद्धतीने नाल्यात उतरावे लागत नाही. संतांची भूमी म्हणून ओळख असलेल्या आर्वी शहराच्या स्वच्छतेचा प्रश्न आता केवळ घोषणांपुरता न राहता प्रत्यक्ष कृतीतून सोडविण्याची गरज आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेता पालिकेने अंदाजे २० लाख रुपयांची अत्याधुनिक Suction Cum Jetting Machine तातडीने खरेदी करावी, अशी आर्वीकरांची आग्रही मागणी आहे.




# बकरी चोरीला, तीन अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा

**पुलगाव** - रसूलाबाद बाजारवाडी परिसरातून १५ हजार रुपये किमतीची बकरी चोरून नेल्याची घटना २८ सप्टेंबर रोजी दुपारी घडली. याप्रकरणी मनोहर नामदेव मानकर रा. रसूलाबाद यांनी पुलगाव पोलिस ठाण्यात तक्रार दिली. मानकर यांच्या घरी २० गाई व १५ बकऱ्या असून जनावरांच्या देखभालीसाठी त्यांनी नाना लोखंडे यांना कामावर ठेवले आहे. मात्र गावात मृत्यू झाल्याने नाना जनावरे चारण्यासाठी आले नाहीत. त्यामुळे मानकर यांचा मुलगा आदित्य जनावरे चारण्यासाठी गेला होता. यावेळी जुन्या बाजारवाडी परिसरात मोटारसायकलवरून आलेल्या तीन अनोळखी इसमांनी काठीवर बांधलेली अंदाजे १५ हजार रुपये किमतीची बकरी चोरून नेली. घटनेची माहिती मिळताच मानकर व त्यांच्या मुलाने परिसरात शोध घेतला. मात्र बकरी व संशयित आढळले नाहीत. तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## लोखंडी रॉडने मारहाण

**वर्धा** - आठ दिवसांपूर्वीचा गोळ्या बिस्किटाचा माल टाकण्याच्या कारणावरून एका इसमाला लोखंडी रॉडने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना सावंगी मेघे परिसरातील मौजा संतसुरा शिवारात घडली. याप्रकरणी जुबेर शब्बीर कुरेशी रा. पुलगाव यांनी सावंगी मेघे पोलिसांत तक्रार दिली. फिर्यादी मोटारसायकलने भावाकडे जात असताना इमरान खान हिम खान पठाण रा. राजेंद्रनगर यवतमाळ याने त्यांना अडविले. माल टाकण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून आरोपीने लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डाव्या हातावर, पोटावर आणि डाव्या पायावर मारहाण केली. या मारहाणीत त्यांना गंभीर दुखापत झाली. तसेच पोलिस ठाण्यात गेल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. फिर्यादीचा जबाब आणि वैद्यकीय तपासणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सावंगी मेघे पोलिसांनी संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला. आरोपीला अद्याप अटक झालेली नसून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## भरधाव स्विफ्टची ऑटोला धडक

**आर्वी** - भरधाव वेगातील स्विफ्ट कारने ऑटोला मागून धडक दिल्याने ऑटो पलटी होऊन चालकासह प्रवासी जखमी झाल्याची घटना बेढोणा ते सावळापूर घाट मार्गावर घडली. याप्रकरणी जितेंद्र अधारे रा. जनता नगर आर्वी यांनी आर्वी पोलिसांत तक्रार दिली. अधारे हे आपल्या ऑटोने हिवरा येथून प्रवासी घेऊन आर्वीकडे परतत होते. बेढोणा येथून दोन प्रवासी घेऊन सावळापूर घाट उतरत असताना मागून आलेल्या स्विफ्ट कारने त्यांच्या ऑटोला जोरदार धडक दिली. धडकेमुळे ऑटो रस्त्यावर पलटी झाला. अपघातानंतर कारचालकाने थांबून मदत न करता वाहनासह घटनास्थळावरून पळ काढला. या घटनेत ऑटो चालकाला तसेच एका पुरुष प्रवाशाला दुखापत झाली. ऑटोचे सुमारे ९० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. कारचा क्रमांक समजू शकला नसून आर्वी पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## दुचाकीच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

**गिरड** - बकऱ्यांसाठी चारा आणण्यासाठी पायी जात असलेल्या वृद्धाला दुचाकीने धडक दिल्याने गंभीर जखमी झालेल्या वृद्धाचा मृत्यू झाला. ही घटना लसनपूर ते गिरड मार्गावरील सीएनजी कंपनीसमोर घडली. याप्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी चौकशीनंतर दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, मधुकर किसनाजी मेश्राम वय ७३ रा. लसनपूर हे २१ सप्टेंबर रोजी दुपारी बकऱ्यांसाठी चारा आणण्यासाठी लसनपूरहून गिरडकडे पायी जात होते. सीएनजी कंपनीजवळ समोरून आलेल्या एमएच ३२ ए के ८०३५ क्रमांकाच्या दुचाकीने त्यांना धडक दिली. अपघातात मेश्राम यांच्या डाव्या हाताला व उजव्या पायाला गंभीर दुखापत झाली. डोक्यालाही गंभीर मार लागला. दुचाकी चालक विक्की बघेल रा. इंदिरानगर झोपडपट्टी समुद्रपूर हादेखील जखमी झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. मृतकाच्या मुलाचा जबाब, साक्षीदारांचे बयान आणि घटनास्थळ पंचनाम्यानंतर समुद्रपूर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## दोन अल्पवयीन मुलांचे अपहरण

**हिंगणघाट** - चौदा वर्षे वयोगटातील दोन अल्पवयीन मुलांचे अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची घटना हिंगणघाट येथे उघडकीस आली. याप्रकरणी वैशाली नितीन निंबाळकर वय ४३ रा. काजी वॉर्ड हिंगणघाट यांनी हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार केतन निंबाळकर आणि सार्थक विरुळकर हे दोन्ही अल्पवयीन मुले घरातून बेपत्ता झाले. कुटुंबीयांनी परिसरात तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला. मात्र त्यांचा ठावठिकाणा लागला नाही. त्यानंतर पोलिसांकडे तक्रार करण्यात आली.

तक्रारीची दखल घेत हिंगणघाट पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही मुलांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू असून त्यांच्या बेपत्ता होण्यामागील कारणांचा शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून कुटुंबीयांकडून मुलांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडे पाठपुरावा सुरू आहे.

## महिलेवर बळजबरीचा प्रयत्न

**हिंगणघाट** - आंघोळीसाठी बाथरुममध्ये गेलेल्या ४० वर्षीय महिलेवर बळजबरी करण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार हिंगणघाट येथे घडला.

महिलेने प्रसंगावधान राखत आरोपीला विरोध केल्याने त्याचा प्रयत्न फसला. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला.

याप्रकरणी पीडित महिलेने हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे प्रशांत उर्फ बजरंग कुंजेकार रा. हिंगणघाट याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर परिसरात चर्चेला उधाण आले असून महिलेच्या तक्रारीची पोलिसांनी गंभीर दखल घेतली आहे.

आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. घटनास्थळी नेमका प्रकार कसा घडला, आरोपी तेथे कसा पोहोचला आणि त्याचा नेमका उद्देश काय होता, याचा तपास केला जात आहे. पीडित महिलेने दाखविलेल्या धैर्यामुळे मोठा अनर्थ टळल्याचे बोलले जात आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात ‘आरंभ’ व शिक्षक दिन उत्साहात

## -कायद्यातील नवे बदल आणि विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने यावर मंथन



**अमरावती/प्रतिनिधीः-** डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती येथे LL.B. ३ वर्षे व ५ वर्षे अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या वतीने ‘आरंभ – The Induction Programme & Teacher’s Day Celebration Programme’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वर्षा देशमुख, प्राचार्या, डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती या उपस्थित होत्या. त्यांनी ‘Legacy of Dr. Panjabrao Deshmukh College of Law, Amravati’ या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनातून त्यांनी महाविद्यालयाची शैक्षणिक परंपरा, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारांचा वारसा आणि विधी विद्यार्थ्यांनी या परंपरेला पुढे नेण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून विशाखा पाटील मॅडम, दीवाणी न्यायाधिश व. स्थार तथ अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी ‘Development in Criminal Law in India: BNS, BNSS & BSA – Challenges Before Law Students’ या विषयावर अत्यंत मार्गदर्शक व्याख्यान दिले. बदलत्या भारतीय फौजदारी कायद्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय न्याय संहिता (BNS), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) आणि भारतीय साक्ष अधिनियम (BSA) याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देत नव्या कायदेव्यवस्थेतील विधी विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने व संधी यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी महाविद्यालयाचे विभागप्रमुख डॉ. नंदकिशोर रामटेके सर यांनी ‘We, The Students of Dr. PDCL, Amravati’ या विषयावर आपले मनोगत व्यक्त करतांना विद्यार्थ्यांना महाविद्यालयाशी असलेली आपली नाळ, विद्यार्थीदशेतील जबाबदाऱ्या आणि सामूहिक शैक्षणिक प्रवासाचे महत्त्व समजावून सांगितले.

तसेच विभागप्रमुख डॉ. राजेश पाटील सर यांनी ‘Let Us Begin Our Journey in Law’ या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विधी शिक्षणाचा प्रवास केवळ पदवी मिळविण्यापुरता मर्यादित नसून, कायद्याचे ज्ञान, सामाजिक बांधिलकी, नैतिक मूल्ये आणि न्यायव्यवस्थेबद्दलची जबाबदारी या गुणांचा विकास करण्याचा तो प्रवास आहे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

यावेळी ॲड. संदिप वानखडे सर समन्वयक, LL.M. यांनी विद्यार्थ्यांना विधी शिक्षण, उच्च शिक्षणाच्या संधी आणि LL.M. अभ्यासक्रमाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांनी विधी क्षेत्रातील अद्ययावत घडामोडींचा सातत्याने अभ्यास करून आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्यांचा विकास करण्याची गरज अधोरेखित केली.

कार्यक्रमाच्या निमित्ताने शिक्षक दिनही उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या मार्गदर्शनाचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील स्नेहपूर्ण नाते अधिक दृढ करण्यासाठी कार्यक्रमाने महत्त्वाची भूमिका बजावली.

# शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नवनित राणांनी विद्युत अधिकाऱ्यांना सुनावले



**खल्लार/प्रतिनिधीः-** घडा (सांगवा) शेत शिवारात गेल्या एक वर्षापासून विद्युत विभागाच्या डीपीचे तार चोरी गेल्यामुळे ती बंद पडली होती. दुष्काळग्रस्त परिस्थितीत शेतकऱ्यांना पिकाला पाणी देण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

सांगवा बु येथील शिवसेना शाखा प्रमुख प्रविणसगणे यांनी खल्लार महावितरण केंद्राचे कनिष्ठ अभियंता मंगेश बोंडे यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला, तरीही DP कार्यान्वित झाली नाही. तारा चोरीला गेल्याचे कारण सांगून वेळ मारून नेली जात होती, आणि इस्टिमेट मंजूर झाले नाही असे कारण सांगण्यात येत होते. याबाबत माजी खासदार नवनीत राणा या दुष्काळग्रस्त शेताची पाहणी करीत असताना त्यांना शेताच्या बांधावर नेऊन सदर समस्या दाखवली. नवनित राणांनी शेतातूनच अभियंता बोंडे यांना फोन लावून चांगलेच सुनावले. एक वर्ष झाले विद्युत खांबावरचे चे तार चोरी जाऊन अजून चालू करत नाही, शेतकरी काय करणार? चोरीला गेले तर डिपार्टमेंट जबाबदार आहे. असा जाब विचारत या आठवड्यातच काम पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. अभियंत्यांनी सात दिवसात डीपीचे पूर्ण कनेक्शन करून शेतकऱ्यांना पाणी पोहोचेल असे आश्वासित केले.

# अल्पवयीन मुलावरील लैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपीला २० वर्षांची शिक्षा

**अमरावती/प्रतिनिधीः-** अल्पवयीन मुलावरील लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक २ ने आरोपीला २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. यासोबतच ५० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून, ही रक्कम पीडिताला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. जिल्हा व सत्र न्यायाधीश यशवंत आनंद गोस्वामी यांनी सोमवारी २८ सप्टेंबर रोजी हा निकाल दिला. सतिश पुरनलाल परसोने (वय ५७, रा. दत्तापूर, ता. धामणगाव रेल्वे) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणात दत्तापूर पोलिसांनी पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करून तपास केला होता. न्यायालयीन नोंदीनुसार, पीडित मुलगा घटनेच्या वेळी १२ वर्षांचा होता. आरोपीचे किराणा दुकान परिसरात असल्याने मुलाचा आरोपीशी परिचय होता. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी शाळेतून आल्यानंतर मुलगा आरोपीच्या दुकानात गेला होता. त्यानंतर दुकानातील सामान घरात नेण्याच्या कारणावरून त्याला घरात बोलावण्यात आले. तेथे त्याच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले होते. घटनेनंतर मुलाने घरी जाऊन आईला प्रकार सांगितला. त्यानंतर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. महिला पोलिस उपनिरीक्षक राठोड यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१९४०/२०२६**
**युसुफ खान + १६ वि.निरंक**
**पुढील ता.१५.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार**

1. **Yusuf Khan s/o. Imam Khan,** Age 79 yrs. Occ.- Nil R/o. Hathi Pura, Amravati
2. **Mahamood Khan s/o. Imam Khan,** Age 77 yrs. Occ.- Nil R/o. Saudagar Pura, Amravati
3. **Salimunnisa Begam w/o. Ainuddin Khan,** Aged 66 years, Occ.- Household
4. **Tanweer Ahmad S/o. Ainuddin Khan,** Age 47 years, Occ.- Service
5. **Zubair Ahemd Khan s/o. Ainuddin Khan,** Aged 41 years, Occ.- All R/o. Nagpuri Gate, Amravati
6. **Mahejabeen Bano w/o. Nazim Ahmad,** Age 44 years, Occ.- Household R/o. Zam Zam Nagar, Amravati
7. **Nazish Parveen w/o Tarique Parvez,** Age 38 years, Occ.- Household R/o. Nagpuri Gate, Amravati
8. **Shaila Naz w/o. Mohammad Sharique,** Age 37 years, Occ.- Household R/o. Maula Pura, Amravati
9. **Mehrosh Anjum d/o. Ainuddin Khan,** Age 27 years, Occ.- Household R/o. Nagpuri Gate, Amravati
10. **Shaikh Anis s/o. Shaikh Yakub,** Age 40 years, Occ.- Business R/o. Gulzar Nagar, Amravati
11. **Shekh Aashique s/o. Shekh Hasan,** Age 63 years, Occ.- Business
12. **Shaikh Aqueel s/o. Shaikh Hasan,** Age 59 years, Occ.- Business
13. **Shekh Shakeel s/o. Shekh Hasan,** Age 52 years, Occ.- Business
14. **Shaikh Naseer s/o. Shaikh Hasan,** Age 50 years, Occ.- All R/o. Near Dargah, Nalsaheb pura, Amravati
15. **Saira Bano w/o.Anwar Husain Khan,** Age 59 years, Occ.- Household R/o. Jamil Colony, Amravati
16. **Nazera Parveen w/o. Ameen Ahmed Khan,** Age 48 years, Occ.- Household R/o. Muzaffar Pura, Amravati
17. **Shaheda Parveen w/o. Mohammad Aabid,** Age 40 years, Occ.- Household R/o. Chaman Nagar, Old Town, Badnera, Tq. Dist. Amravati

**विरुध्द**

**गैरअर्जदार - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Ibrahim Khan Husen Kha** हे दिनांक ०२.१०.२००७ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **Yusuf khan s/o. Imam Khan+16** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Yusuf khan s/o. Imam Khan+16** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२३.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**(मालमत्ता खरेदी संदर्भात जाहीर सूचना)**

**जाहीर सूचना**

सर्व जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, माझे अशील १) मो. एजाजो?द्दिन व.मो. नियाजोदिन २) मो. नावेद व. अब्दुल वाहिद ३) साकिबअली व. किस्मत आली रा. अंजनगावसुर्जी ता अंजनगावसुर्जी जि. अमरावती हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली मालमत्ता सध्याचे कायदेशीर मालक १) सरफराजखान व. फातेह्खान २) फातमा अजीज खान ३) मोहम्मद खान व. समदखान ४) मसूदखान व. समद खान वरील १ते ४ सर्व रा. भालदारपुरा अंजनगावसुर्जी ता. अंजनगावसुर्जी जि. अमरावती व ५) महेबूबखा व. मुस्तफाखा उमरी रोड नागपूर ता.जि नागपूर ६) महेमूद व. खानसमदखान रा. नाईकवाडी, शेवगाव अहमदनगर यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले असून, त्याबाबतचा इसार पावती/करारनामा झालेला आहे.

**मालमत्तेचे वर्णन (परिशिष्ट)**

**जिल्हाः अमरावती** **तालुकाः अंजनगाव सुर्जी** **गाव/शहरः अंजनगाव सुर्जी**

शिट नं. १६ बी प्लॉट नंबरः ३४ /२ एकूण क्षेत्रफळ : २१०.१० चौ. मी.. धारणाधिकार अ
शिट नं. १६ बी प्लॉट नंबरः ३४/३ एकूण क्षेत्रफळ : ७६.९०चौ. मी. धारणाधिकार अ
शिट नं. १६ बी प्लॉट नंबरः ३३ एकूण क्षेत्रफळ : २६८.७० चौ. मी. धारणाधिकार अ व धारणाधिकार २६.८० ब
शिट नं. ११ डी प्लॉट नंबरः १३६ एकूण क्षेत्रफळ १३१.२० चौ.मी. धारणाधिकार अ
शिट नं. ११ डी प्लॉट नंबरः १३५ एकूण क्षेत्रफळ ३९६ चौ. मी. धारणाधिकार अ

**उपरोक्त प्लॉट ची सयुक्तिक चतुःसीमा (आजूबाजूची जागा)**

**पूर्वेसः** ६ मीटर शनिवारा रोड **पश्चिमेसः** ६ मीटर इमाम चौक रोड
**दक्षिणेसः** ३ मीटर रोड **उत्तरेस :** ६ मीटर मज्जीद रोड

वरील चातुर्सिमे आतील संपूर्ण प्लॉट (मालमत्ता) हा खरेदी खताचा विषय आहे सदर मालमत्ता ही सर्व प्रकारचे कर्ज, बोजा, गहाण, दान, वारसा हक्क, वाद, कोर्ट कज्जे, लीन **(Lien)**, किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या कायदेशीर बोजापासून मुक्त व निर्वेध आहे, असा विश्वास सध्याच्या मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे.

तरी सदरहू मालमत्तेवर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, वारसा हक्क, गहाण हक्क, अन्नवस्त्राचा अधिकार, स्थगिती आदेश किंवा इतर कोणताही कायदेशीर आक्षेप, निकाल, आपसी निकाल हुकुमनामा असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील स्वाक्षरीकारांच्या वरील पत्त्यावर मूळ कागदपत्रांच्या पुराव्यांसह लेखी आक्षेप माझ्या कार्यालयात कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीत कोणाचाही आक्षेप नआल्यास सदर मालमत्ता पूर्णपणे निर्वेध (Clear Title) आहे असे समजून माझे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही आक्षेपांचा व दाव्यांचा विचार केला जाणार नाही आणि तसा कोणताही दावा माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**दिनांक**
**ठिकाणः**

**सही**
**ॲड.अमोलकुमार एम. जयस्वाल**
**मिश्रा लाईन सदा बाजार परतवाडा ४४४८०५**
**ता. अचलपूर जि. अमरावती**
**मो. ९९२३३३७७७४**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक २६**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१९१०/२०२६**
**वंदना +३ वि. निरंक**
**पुढील ता.१३.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार**

1. **Vandana Chandrashekhar Ghadge**, Age 63 yrs. Occ.- Household R/o. Jalaram Nagar, Galli No.1, Dipak Dalan Kendra, Amravati
2. **Jayashree Pradip Mohite,** Age 39 yrs. Occ.- Household R/o. Ward No. 1, At Post Hingna (Dhangarpura), Dist. Nagpur
3. **Dipali Anup Londhe,** Age 35 yrs. Occ.- Household R/o. Badhe Plot, Nachangaon, Dist. Wardha
4. **Vaishnavi Vicky Bhosale,** Age 27 yrs. Occ.- Household R/o. Hanuman Mandir, Banoda Jahagir, Tq. & Dist. Amravati

**विरुध्द**

**गैरअर्जदार - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Chandrashekhar Sahebrao Ghadge** हे दिनांक **३०.१०.२०२४** रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **Vandana Chandrashekhar Ghadge + 3** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार **Vandana Chandrashekhar Ghadge + 3** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२३.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**जाहीर नोटीस**

**वि. दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती येथील ए. एम. जोशी, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क. **३९५**/२०२६ ने.ता. ०२/११/२०२६

**अर्जदारः- १.सैय्यद इसराईल सैय्यद इस्माईल,** वय ५६ वर्ष, धंदा - मजुरी रा. अनवरपुरा, अचलपूर, ता अचलपूर, जि. अमरावती **२.कलीमाबी शेख हनीफ,** वय ५४ वर्ष, धंदा घरकाम २/रा. हैदरपुरा अमरावती, ता. जि. अमरावती **३. अलीमुन्नीसा साबीर खान,** वय ५२ वर्ष, धंदा घरकाम रा. यास्मिन नगर अमरावती, ता. जि. अमरावती

**विरूध्द - गैरअर्जदारः- निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **सैय्यद इस्माईल सैय्यद इब्राहिम** हे **दिनांक २९/०५/२०२६** रोजी मरण पावले आहेत. अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VII १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत** न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल

**मालमत्तेचे वर्णन - मयत सैय्यद इस्माईल सैय्यद इब्राहिम** यांच्या नावे मौजा खार सांगळूद, ता दर्यापूर, जि. अमरावती भूमापन क. १२ क्षेत्रफळ ०.८१ आर आ.का.रु. ४.२५ अंदाजे कि. १,००,०००/-रु. व मौजा कासमपूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती भूमापन क. ९५ क्षेत्रफळ ०.८१ आर आ.का.रु. ४४२ अंदाजे कि. १,००,०००/- रु. तसेच मौजा सासण रामापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती मालमत्ता क ३९७ ज्याने क्षेत्रफळ पूर्व पश्चिम उत्तर दक्षिण १०८९ चौ. फुट १०१ चौ. मी. ज्यावर ७५६ चौ. फुट ७० चौ.मी. बांधकाम असून ३३३ चौ. फुट ३१ मी. खुली जागा असून ज्याची अंदाजी कि ५०,०००/- रु. आहे. संपूर्ण मिळकतीची एकूण कि. २,५०,०००/- रु. इतकी आहे.

**आज दि. २१/०९/२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
**सहा अधिक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय व. स्तर दर्यापूर**

**जाहीर नोटीस**

**वि. दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती येथील यू. एन. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क. ३९४/२०२६ ने.ता. २८/१०/२०२६

**अर्जदारः- १.रत्ना अशोक धुरंधर**, वय ५६ वर्ष, धंदा घरकाम
**२.सागर अशोक धुरंधर,** वय ३३ वर्ष, धंदा शिक्षण
**३.कुंदन अशोक धुरंधर**, वय ३० वर्ष, धंदा शिक्षण
**४. पूजा अशोक धुरंधर,** वय २४ वर्ष, धंदा शिक्षण
सर्व रा भीम नगर, दर्यापूर, त्ता दर्यापूर, जि. अमरावती

**विरूध्द-गैरअर्जदारः-निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **अशोक शालिकराव धुरंधर दिनांक २३/०८/२०२६** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत कलम **२ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत** न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा, अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणापत्र देण्यात येईल.

आज दि. २२/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

शिक्का
**आदेशानुसार**
**सहा अधिक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय व स्तर दर्यापूर**

**जाहीर सुचना**

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार **वृषाली सचिन कडू, रा.अमरावती, ता.जि.अमरावती** यांनी केलेल्या ईसारचिठठी नुसार मौजे- नवसारी, प्र.नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती येथील सर्व्हे नं. ४७/२ मधील, प्लॉट नं. २५, एकुण क्षेत्र २७८.७० चौ.मी.(३००० चौ.फुट) यातुन प्लॉट नं.२५ चा भाग क्षेत्र १३९.३ चौ.मी.(१५०० चौ.फुट) याचा पूर्व पश्चिम वाटणीचा उत्तरेकडील भाग क्षेत्र ६९.७० चौ.मी. (७५० चौ.फुट) व त्यावरील बांधकाम सह हया मिळकतीचा **विजय वामनराव निचित** यांचे कडून विकत घेण्याचा सौदा केलेला आहे आणि त्यापुर्वी सदर वर नमुद केलेली मिळकत म्हणजेच प्लॉट नं. २५ चा भाग क्षेत्र १३९.३ चौ.मी. (१५०० चौ.फुट) ही विजय वामनराव निचित व बबन महीपतराव देशमुख यांनी भास्कर व्यंकटराव ठाकरे यांचे कडून दि.२६/०४/१९८९ रोजीचे रजि.खरेदी दस्त क्र.४४३ नुसार खरेदी केलेली होती.

परंतु वर नमुद, **दि.२६/०४/१९८९ रोजीचे रजि.खरेदी खत क्र.४४३ चे मुळ दस्त** माझे पक्षकाराचे वरील नामे विकेते यांचे कडून गहाळ झालेले आहेत.

तरी याबाबत कोणाचेही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशिर वाद, लवाद, दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासून ०७ दिवसांचे आंत खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा, त्यानंतर आक्षेप आल्याची याची नोंद घेतली जाणार नाही.

अमरावती, दिनांक - २८/०९/२०२६

शिक्का
ॲडव्होकेट
**राहूल व्ही.मोहोड**
प्रेरणा कॉलनी, राधा नगर,
अमरावती- ४४४६०३
मो.- ९०९६४६०६७०

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२७२/२०२६** **ने.ता.२७.१०.२०२६**

**१. सुनंदा उत्तम वडुरकर**
**२. संतोष उत्तमराव वडुरकर**
**३. सतीश उत्तमराव वडुरकर**
**४. मंगेश उत्तमराव वडुरकर**
सर्व रा.वाटपुर, पो.लोणी टाकळी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी **मयत महादेव बळीराम वडुरकर** यांचा **मृत्यू दि.२३.०५.२०१०** मध्ये वाटपुर,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला.मयताचा वारस मुलगा नामे **उत्तमराव महादेवराव वडुरकर** यांचा **मृत्यू दि.०१.१२.२०१७** मध्ये **वाटपुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र.१ ही सून असून अर्जदार क्र.२ ते ४ हे नातू आहेत.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक २८ सप्टेंबर २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

**जाहीर नोटीस**

**वि. दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती येथील एस. डी. कमलाकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क. ३८६/२०२६ ने.ता. २३/१०/२०२६

**अर्जदारः-१. नलिनी सुनील उमक,** वय ३३ वर्ष, धंदा घरकाम
**२.श्रावणी सुनील उमक,** वय ११ वर्ष, धंदा शिक्षण
**तर्फे अ.पा.क. आई अ.क. १ नलिनी सुनील उमक दोन्ही रा. नरदोडा, पोस्ट कान्होली, ता. दर्यापूर, जि. अमरावती**

**विरूध्द-गैरअर्जदार**

**१.पंचफुला गोवर्धन उमक,** वय ७० वर्ष, धंदा काही नाही रा. नरदोडा, पोस्ट कान्होली, ता. दर्यापूर, जि. अमरावती

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **सुनील गोवर्धन उमक** हे दिनाक **११/११/२०२५** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यानी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात** अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा अन्यथा अर्जदार व गैरअर्जदार यांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - मयत सुनील गोवर्धन उमक** यांच्या नावे मौजे अहमदपूर, ता दर्यापूर जि. अमरावती येथे शेतगट क १२४ क्षेत्र १.०९ हे. आर पैकी क्षेत्र ०८१ हे. आर पोख ०.०२ हे जार आकार ५. ३५ ही शेत जमिन आहे.

आज दि. २८/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

शिक्का
**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यानालय व स्तर दर्यापूर**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१६१९/२०२६**
**वंदना + २ - वि.- निरंक**
**पुढील ता.०६.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार**

1. **Smt. Vaishali Gajanan Gaikwad** , Age 41 yrs. Occ.- Housewife
2. **Nihal Gajanan Gaikwad,** Age 22 yrs. Occ.- Student
3. **Ku. Samiksha Gajanan Gaikwad,** Age 18 yrs. Occ.- Student app. No. 1 to 3, R/o. Near Sena Maharaj Temple, Jai Siyaram Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati

**विरुध्द**

**गैरअर्जदार - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Gajanan Ghanshyam Gaikwad** हे दिनांक **२१.०१.२०२१** रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **Smt. Vaishali Gajanan Gaikwad + 2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार **Smt. Vaishali Gajanan Gaikwad + 2** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१०.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१९१८/२०२६**
**सिंधु + ३ - वि.- निरंक**
**पुढील ता.१३.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार**

1. **Smt. Sindhu Manoharrao Nage,** Age 85 yrs. Occ.- Nil
2. **Smt. Jyoti Surendra Nage**, Age 54 yrs. Occ.- Housewife
3. **Ku. Shubhangi Surendra Nage**, Age 29 yrs. Occ.- Education
4. **Ku. Shukranti Surendra Nage**, Age 26 yrs. Occ.- Education above all R/o. Pannalal Bagichya, HVPM, Amravati

**विरुध्द**

**गैरअर्जदार - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Surendra Manohar Nage** हया दिनांक **१५.०७.२०२६** रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **Smt. Sindhu Manoharrao Nage + 3** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार **Smt. Sindhu Manoharrao Nage + 3** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२३.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**शेतविक्री व्यवहार संबधी जाहीर नोटीस**

सर्व जनतेस कळविण्यात येते की अमरावती जिल्हा तालुका नांदगाव खंडेश्वर मोजे खीरसांना प्र. व. ता. नादगाव खंडे' जि.प.अमरावती ग्रामपंचायत आहे येथील सर्व सर्व्हे क्रमाक गट क्र २७/४ ( भो. वर्ग १) ३ हेक्टर २४ और, आ. रु १०.३० पै. खाते क्र १६४४ यातीलवर्तमान मालकाच्या ताब्यातील १ हेक्टर ६२ आर जमीन पूर्ण तंदगभूत वस्तुसह इतर झाडा - झुडपासह, माती गोटे यात एक विहिर मोटर पंपसह

संत्राझाडे नींबू झाड अफ्रीकन सिताफळ चिकुचे झाड, मोसंबी झाड करवंद झाड आरसीसी कॉंक्रीट पद्धतीने बांधलेले दोन रूम संडास बाथरूम पाच पदरी कम्पाउंड शेताच्या धु-याने बाश्याचे बन व विहीर मोटार पंप सह दोन बोअर, व मोटरपंप सह ड्रीप जमीनीच्या आतील पाईप फिटींग सह जलपाषाणसह ज्याची चतुर सीमा :

**पुर्वेस - कवडू नारायन दहाट यांचे शेत**
**पश्चिमेस - मोतीराम राठोड यांचे उत्तरेस - रस्ता**
**दक्षिणेस - 'वानखडे यांचे शेत**

सदर जमीन / मिळकत हि पुर्णपणे नीसंदीग्ध कायदेशीर व ओझ्यातून मुक्त असल्याचे आम्हाला सांगण्यात आले आहे आमचे आशिलाने सदरची जमीन खरेदी करण्याबाबत संबंधीत वर्तमान मालक सौ दर्शना राजू टोपले - नौकरी रा. छागांनी नगर अमरावती यांच्या सोबत

विक्री करार केला असुन या शेत जमिनीवर कीवा तिच्या कोणत्या भागावर बँकेत कर्ज, बक्षिसपत्र जप्ती कौटुंबिक भाडेपट्टा कीवा इतर कोनेतेही

कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हि सुचनाप्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर लेखी पुराव्यासह हरकरत नोंदवावी हरकत न आल्यास सदर

मुदतीत कोणतेही जमिन निर्भळ (र्मीूगत ) समजुन आम्ही अंतिम व्यवहार पूर्ण करू त्यांनतर कोणतीही हरकत किवा दावा ग्राह धरला जाणार नाही यांची नोंद घ्यावी

पक्षकार
**रीतेश घनश्याम शिरभाते**
मो.९६६५८५५२९४ अमरावती

**मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र. : २६७/२०२६ नेमलेली तारीख :- २६-१०-२०२६

**१. पार्वता भुजा केशरखाने**
**२. सुनीता ज्ञानेश्वर केशरखाने**
**३. रूपेश ज्ञानेश्वर केशरखाने**
**४. राहुल ज्ञानेश्वर केशरखाने**
सर्व रा. शिरपूर, ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती,

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत भुजाआप्पा गोदाप्पा केशरखाने** यांचा मृत्यु दि. ०७.०४.२०२१ मध्ये **मुंडनिशांकराव, नांदगाव खंडेश्वर ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथे झाला. **मयताचे अर्जदार क्र. १ ही पत्नी असून अर्जदार क्र. २ ही सुन व अर्जदार क्र. ३ व ४ हे नातु** आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

**आज दिनांक : २८ सप्टेंबर २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय,**
**नादगांव खंडेश्वर**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# जगाला अध्यात्म,धर्म याचा खरा अर्थ समजावून सांगण्याची जबाबदारी भारतावर

## सरसंघचालक मोहन भागवत यांचे आशीर्वाद प्रबोधन सोहळ्यात प्रतिपादन

**चांदूरबाजार/वार्ताहर**

संत श्री.ज्ञानेश्वर महाराजांनी विश्वात्मक देवाची संकल्पना मांडून,जगाला वारकरी परंपरेच्या माध्यमातून विश्वधर्म सांगितला. सर्व धर्म आणि पंथ एकाच ईश्वरी तत्वांची देण आहे.प्रत्येकाचे उपासनेने मार्ग वेगवेगळे असले तरी,सर्व एकाच ठिकाणी येऊन मिळतात. हे आपल्या संत परंपरेने तर्क व अनुभूतीच्या आधारावर जगाला पटवून दिले आहे. यातूनच संत श्री गुलाबराव महाराजांनी सर्वांनी आपला धर्म सांभाळून,सर्व धर्म गुण्यागोविंदाने एकत्र राहावे.यासाठी धर्म समन्वयाची संकल्पना जगासमोर ठेवली आहे.भारताला संत विचारांची मोठी परंपरा आहे. यामुळेच भारत आज,अनेक अध्यात्मिक विचारधारा असूनही एकसंघ आहे.त्यामुळेच जगात धार्मिक शांतता नांदावी.यासाठी भारतच जगाचा आधार होऊ शकतो.

असे जगातील विद्वानांचे मत आहे.त्यासाठी सर्व जग भारताकडे मोठ्या आशेने पाहत आहे. म्हणूनच जगाला अध्यात्म,धर्म व धर्म समन्वयाचा खरा अर्थ समजून सांगण्याची जबाबदारी आज भारतावर आहे.यासाठी संत श्री गुलाबराव महाराजांचा धर्म समन्वयाचा सिध्दातच नव्हे तर, त्यांचे संपूर्ण साहित्य प्रेरणादायी ठरणारे आहेत. असे मनोगत सर



संघचालक मोहनजी भागवत यांनी केले. यावेळी ते संत श्री गुलाबराव महाराजाचे दर्शनासाठी माधान येथे आले असता, आशीर्वाद प्रबोधन सोहळ्यात बोलत होते.याप्रसंगी मंचावर संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध मोहोड उपस्थित होते.

आपल्या मनोगतात सरसंघचालक पुढे म्हणाले की,संत श्री गुलाबराव महाराजांचे कार्य हे एक ईश्वरीय कार्य आहे. श्री महाराज हे माधान सारख्या पवित्र ठिकाणी जन्माला आले. त्यांनी आपले ईश्वरीय कार्य करूण आपला अवतार संपवीला.श्री महाराजांनी निर्माण केलेली साहित्य संपदा ही त्यांचे पुरती मर्यादीत नाही.तर ती जगाच्या कल्याणासाठी आहे.त्यांचे साहित्याचे संकलन करणे.जतन करणे व प्रकाशित करून,ते जगासमोर आणणे.ही जबाबदारी श्री संत गुलाबराव महाराजांचे भक्तांची आहे.हे सर्व तुम्हा सर्वांना एकजुटीने करावे लागणार आहे.त्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, सदैव तुम्हाला सहकार्य करेल. या पवित्र सोहळ्याला आशीर्वाद - प्रबोधन हे नाव दिले आहे. मी येथे आशीर्वाद देण्यासाठी नव्हे तर, संत श्री गुलाबराव महाराजांचा आशीर्वाद घेण्यासाठी आलो आहे.या सोहळ्यात अमरावती विमान तळाला, संत श्री गुलाबराव महाराजांचे नाव देण्याबाबतचे मनोगत व्यक्त करण्यात आले.ही चांगली गोष्ट आहे.या साठी मी स्वतः योग्य ठिकाणी,माझा शब्द टाकेल.असे आश्वासन ही सर संचालकांनी ,सत श्री गुलाबराव महाराजांचे भक्तांना दिले.

सोहळ्याचे संचालन, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन, संस्थेचे सचिव साहेबराव मोहोड यांनी केले.

या सोहळ्याची सांगता तृप्ती खांडे यांनी म्हटलेल्या,संत श्री गुलाबराव महाराज यांच्या पसायदानाने करण्यात आली.सर संचालकांच्या सुरक्षेसाठी, पोलीस प्रशासनाकडून तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.तसेच अमरावती पासून ते मानानं पर्यंत, टप्प्याटप्प्यावर पोलीस यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली होती.

## संक्षिप्त



### तीन विद्यार्थीनीची विभागीय फेन्सिंग स्पर्धेसाठी निवड

**अंजनगाव सुर्जी -** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवा सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय तलवारबाजी (फेन्सिंग) क्रीडा स्पर्धा अमरावती येथे उत्साहात पार पडली.या स्पर्धेत सीताबाई संगई कन्या शाळेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करीत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली. फेन्सिंगमधील सेबर,ईपी आणि फॉईल या विविध प्रकारांत शाळेच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.यामध्ये स्वरा विशाल भेलांडे हिने उत्कृष्ट कामगिरी करीत द्वितीय क्रमांक पटकाविला.तसेच सृष्टी अशोक बहिरे आणि स्पृहा विशाल भेलांडे यांनीही स्पर्धेत यश संपादन केले.या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तिन्ही विद्यार्थिनींची विभागीय फेन्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या यशाबद्दल सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.उल्हास संगई,उपाध्यक्ष भरत संगई व विवेक संगई, सचिव प्रसाद संगई, सहसचिव प्रसन्न संगई,अजय संगई, कार्यकारिणी सदस्य अविनाश संगई वआशिष संगई तसेच सर्व संचालक मंडळाने यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.तसेच शाळेच्या मुख्याध्यापिकानीलिमा सांगोळे व पर्यवेक्षक अमोल डहाळे यांनी विद्यार्थिनींचे कौतुक करून स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.



### फार्मासिस्ट दिनानिमित्त विविध उपक्रम

**अमरावती-**जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती येथे विविध शैक्षणिक, संशोधनात्मक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दीप्ती रुईकर यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. Proclin Private Limited, भोपाळ येथील डॉ. मुकुल मोरया यांनी Clinical Trials या विषयावर विशेष व्याख्यान देऊन विद्यार्थ्यांना क्लिनिकल ट्रायल्सची प्रक्रिया, औषध विकासातील महत्त्व व फार्मसी क्षेत्रातील संधी याबाबत मार्गदर्शन केले.यावेळी या शैक्षणिक वर्षात पेटंट प्रकाशित झालेल्या फॅकल्टी व विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच फार्माकोव्हिजिलन्स सप्ताहानिमित्त आयोजित Quiz Competition मधील विजेत्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्या डॉ. दीप्ती रुईकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाची जबाबदारी रुपाली गावंडे व राम घोटकर यांनी सांभाळली. यावेळी प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

# साहित्य माणसाला समजून घेण्याची दृष्टी देते-प्रा.डॉ.प्रमोद गारोडे



**परतवाडा-**येथील बी. एस. पाटील महाविद्यालयाच्या पदवी व पदव्युत्तर मराठी विभागाच्या वतीने मराठी वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन उत्साहात करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. प्रमोद गारोडे उपस्थित होते. यावेळी मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रवींद्र खंडेराव, प्रा कु पूनम केदार, प्रा मयुरी ठाकरे, आकांक्षा दोतोंडे तसेच सिद्धिश्री आखरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. प्रमोद गारोडे म्हणाले, 'माणसाने माणसाला समजून घेण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे साहित्य होय. माणसाचे सुख-दुःख, प्रेम-विरह, संघर्ष, स्वप्ने, अन्यायाविरुद्धचा आवाज, निसर्गाविषयीचे प्रेम, समाजजीवनातील प्रश्न आणि माणसांच्या नात्यांमधील गुंतागुंत या सर्वांचा आविष्कार साहित्यातून होत असतो.'अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर म्हणाले की, साहित्य हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम आहे. 'साहित्याच्या वाचनामुळे विद्यार्थ्यांची भाषा समृद्ध होते, विचारांना दिशा मिळते आणि संवेदनशीलता विकसित होते. आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर करतानाच पुस्तकांशीही आपले नाते दृढ केले पाहिजे. कार्यक्रमाचे संचालन धनश्री कहाते तर आभार तनुष्का कौतिककर हिने केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. पूनम केदार, प्रा.मयुरी ठाकरे तसेच मराठी वाङ्मय मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'सज्ज आहेत माझे हात' मोहिमेचा विश्वविक्रम

## १२० हून अधिक संस्थांचा सहभाग

**अमरावती/का.प्र.**

'सज्ज आहेत माझे हात' या सीपीआर जनजागृती मोहिमेने विश्वविक्रम नोंदवला आहे. ८ जुलै ते ७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्सच्या वतीने राबविण्यात आलेल्या या मोहिमेत १२० हून अधिक शाळा, महाविद्यालये, कार्यस्थळे आणि सामाजिक संस्थांमधील तब्बल ६१,२२१ नागरिकांनी सीपीआर शिकण्याची शपथ घेतली. ५० हजार लोकांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.

या विक्रमाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सरूने 'एका महिन्यात सीपीआर शिकण्याचा सर्वाधिक संकल्प' म्हणून अधिकृत नोंद केली. अपोलो हॉस्पिटल्स एंटरप्रायझेस लिमिटेडच्या कार्यकारी उपाध्यक्षा डॉ. प्रीथा रेड्डी आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री करिष्मा कपूर यांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला



'६१ हजारांहून अधिक लोक आज दुसऱ्याला मदत करण्यासाठी सज्ज झाले आहेत. ही चळवळ देशभरातील सामान्य नागरिकांच्या हातात जीवन वाचवण्याचे ज्ञान देण्याचा प्रयत्न आहे,' असे डॉ. प्रीथा रेड्डी यांनी सांगितले. या मोहिमेची व्याप्ती भारतातील एका मोठ्या आणि गंभीर समस्येकडे लक्ष वेधते, ती म्हणजे सीपीआर बद्दल असलेले ज्ञान आणि प्रत्यक्ष कृती यातील मोठी तफावत. देशात दरवर्षी ७००,००० हून अधिक लोकांचा मृत्यू अचानक हृदयविकाराचा झटका आल्याने होतो, असा अंदाज आहे. आकडेवारी हेच सांगते की, डॉक्टर येण्याआधी सामान्य माणसाला कृती करता यावी यासाठी त्याला सक्षम करणे अत्यंत गरजेचे आहे. 'सज्ज आहेत माझे हात' च्या माध्यमातून अपोलो हॉस्पिटल्स हेच करत आहे - मदत करण्याच्या इच्छेचे रूपांतर योग्य वेळी योग्य पाऊल उचलण्याच्या आत्मविश्वासात आणि सज्जतेत करत आहे.

# माहिती अधिकाराचे महत्त्व व विधायक वापर या विषयावर व्याख्यान

**अमरावती/का.प्र.**

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती यांच्या वतीने माहिती अधिकाराचे महत्त्व व नागरिकांमध्ये जागरूकता या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.



आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी डॉ वर्षा देशमुख, प्राचार्या, डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती यांनी भूषविले तर कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून ॲड. राजेंद्र पांडे लाभले होते. प्रमुख वक्ते ॲड. राजेंद्र पांडे यांनी माहिती अधिकार, महत्त्व आणि नागरिकांमधे असलेली जागरूकता याविषयी सविस्तर व विवेचन पूर्ण मार्गदर्शन केले तसेच माहिती अधिकाराचा विधायक वापर व्हावा असे प्रतिपादन केले. डॉ. वर्षा देशमुख यांनी माहिती अधिकार व वापर याबाबत आपले विचार मांडले.

कार्यक्रम समन्वयक प्रोफेसर डॉ. चैतन्य घुगे यांनी कार्यक्रमाचे यशस्वीरीत्या आयोजन केले.तसेच या कार्यक्रमास डॉ. पाटील, डॉ. रामटेके, डॉ.देशपांडे तसेच प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अर्चना अवघड यांनी केले तसेच आभार प्रदर्शन ॲड.चव्हाण यांनी केले. प्रशासनातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्यात माहितीच्या अधिकाराची भूमिका समजून घेण्यास या व्याख्यानामुळे विद्यार्थाना मदत होईल अशी अपेक्षा आहे.

# श्री साईबाबा विद्यालयात वृक्षदिंडी व वृक्षारोपण उत्साहात



**अमरावती-**येथील स्थानिक श्री साईबाबा विद्यालय, साईनगर येथे संकल्प सेवा अभियानांतर्गत वृक्षदिंडी, वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय हरित सेना व स्काऊट-गाईड टीम, वृक्ष फाउंडेशन महाराष्ट्र आणि श्री गणेश विहार सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गणेश विहार कॉलनीतील मैदानावर हा कार्यक्रम पार पडला.विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचे संदेश देत वृक्षदिंडी काढली. यानंतर कडुनिंब, जांभूळ, बेल, वड, अंजीर, चिंच आदी विविध प्रजातींच्या सुमारे १०० रोपांची लागवड करण्यात आली. परिसरात ऑक्सिजन पार्क निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.कार्यक्रमास नगरसेविका लता देशमुख, मंजुषा जाधव, गणेश विहार संस्थेचे अध्यक्ष राजेश चांडक,वृक्ष फाउंडेशनचे अध्यक्ष हरिहर बोचरे यांच्यासह शिक्षक, पालक व नागरिक उपस्थित होते. मुख्याध्यापक राजेश टावरी यांनी वृक्षारोपणासोबतच वृक्ष संवर्धनाचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन ज्ञानेश्वर टाले यांनी केले, तर आभार राजेश चांडक यांनी मानले.

# कर्जमाफीच्या प्रतीक्षेत शेतकरी; कर्जवाटपही रखडले

## जुन्या योजनेचा लाभ अपूर्ण; नव्या कर्जमाफीतील रक्कम खात्यात जमा नसल्याने संभ्रम

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

ग्रामीण भागातील काही शेतकरी अद्याप छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७च्या प्रलंबित लाभाच्या प्रतीक्षेत आहेत. शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतरही काही शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा झालेली नसल्याने संभ्रम कायम आहे.

दरम्यान,सेवा सोसायटी सचिवांकडून लवकर कर्जवाटप करण्याची मागणी होत असून, कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या तसेच आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर शासनाची रक्कम अद्याप जमा झालेली नसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नेमकी प्रक्रिया व लाभाबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. मागील कर्जमाफीचा प्रलंबित लाभ तातडीने द्यावा, नव्या योजनेतील पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करावी आणि कर्जवाटपाची प्रक्रिया जलद करावी, अशी मागणी ग्रामीण भागातून होत आहे. महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना जाहीर असलेल्या कमाल ५०




हजारांच्या प्रोत्साहनपर लाभाचीही अनेक शेतकऱ्यांना अद्याप प्रतीक्षा आहे. कर्ज वेळेवर भरूनही लाभ मिळत नसल्याने नियमित कर्जदार शेतकऱ्यांमध्ये नाराजी असून, शासनाने प्रोत्साहनपर रक्कम तातडीने खात्यावर जमा करावी, अशी मागणी होत आहे.

'मागील कर्जमाफीचा लाभ काही शेतकऱ्यांना अद्याप मिळालेला नाही. नव्या कर्जमाफीचीही प्रतीक्षा असल्याने शासनाने तातडीने स्पष्टता करून प्रलंबित लाभ द्यावा.'

**धनश्याम ब्राह्मणे,** शेतकरी

'कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांचा संभ्रम शासनाने दूर करून पात्र लाभार्थ्यांना तातडीने दिलासा द्यावा.'

**गिरीश चौधरी,** समाजसेवक

# SSMITA मध्ये सहा दिवसीय 'दीक्षारंभ - इंडक्शन प्रोग्राम २०२६' उत्साहात

**अमरावती-** सुषिला सूर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲडव्हान्समेंट (SSMITA) येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या MBA विद्यार्थ्यांसाठी 'दीक्षारंभ – इंडक्शन प्रोग्राम २०२६' या सहा दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. २१ ते २६ सप्टेंबर या कालावधीत आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना MBA अभ्यासक्रमाची सर्वांगीण ओळख करून देण्यासोबतच त्यांच्यात व्यावसायिक दृष्टिकोन, नेतृत्वगुण, संघभावना, नैतिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी विकसित करणे हा होता.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांची नोंदणी व विविध वॉर्म-अप उपक्रमांनी सुरुवात झाली. उद्घाटन सोहळ्यात मान्यवरांचे स्वागत तसेच सरस्वती वंदना करण्यात आली. SSMTA च्या अध्यक्षा डॉ .स्मिता दिनेश सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. SSMTA चे प्रभारी संचालक प्रा. अमोल करमकर यांनी इंडक्शन कार्यक्रमाची रूपरेषा, उद्दिष्टे व अपेक्षित परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील व्यवसाय प्रशासन व व्यवस्थापन विभागाचे विभागप्रमुख डॉ. डी. वाय. चाचरकर यांनी उद्घाटनपर मार्गदर्शन केले. त्यानंतर अध्यक्षा डॉ .स्मिता दिनेश सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.समारंभाच्या उत्तरार्धात प्रा. वीरेंद्र ऑगस्टीन यांनी अत्यंत प्रभावी शब्दांत आभार प्रदर्शन केले. त्यांनी शिवयी एज्युकेशनल सोशल अँड मेडिकल ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांचे दूरदर्शी नेतृत्व, शिक्षकवर्गाची निष्ठा आणि सपोर्ट स्टाफच्या मेहनतीचे कौतुक केले तसेच संस्थेच्या परिवारामध्ये प्रवेश करणाऱ्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून स्वागत केले.

विद्यार्थ्यांसाठी 'ट्रेझर हंट'च्या माध्यमातून कॅम्पस भेट आयोजित करण्यात आली. तसेच 'From Family Legacy to Business Leadership' या विषयावर Gharrkul Industries Private Limited चे संचालक तुषार वारंगणकर यांनी मार्गदर्शन केले.

दुसऱ्या दिवशी डिजिटल सुरक्षितता आणि उद्योगविश्वाची ओळख यावर भर देण्यात आला. अमरावती विद्यापीठाच्या विकास विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी 'Think Before You Click' या विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील प्राध्यापकांची ओळख करून देण्यात आली.

तिसऱ्या दिवशी व्यवस्थापन खेळ आणि संवादकौशल्यविकासासाठी विविध उपक्रम घेण्यात



आले. विद्यार्थ्यांनी Shashwat Concept School ला भेट दिली. शाळेचे संस्थापक श्री. अतुल गायगोले यांनी शाळेची संकल्पना आणि कार्यपद्धती याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी संवादविषयक उपक्रम आयोजित करण्यात आले.

चौथ्या दिवशी MBA व्यावसायिकांकडून अपेक्षित असलेल्या कौशल्यांवर मार्गदर्शन करण्यात आले. प्रा. अमोल करमकर यांनी 'Expectations from MBA Professionals' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रा. अमित देशमुख आणि प्रा. वीरेंद्र ऑगस्टीन यांनी 'Campus to Career' विद्यार्थ्यांमध्ये संघभावना विकसित करण्यासाठी 'Tower of Hanoi' हा टीम-बिल्डिंग उपक्रम घेण्यात आला.

पाचव्या दिवशी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य, आनंदी जीवनशैली, सामाजिक बांधिलकी आणि उद्योजकतेवर भर देण्यात आला. Brahma Kumaris Rahatgaon Centre चे बी. के. प्रयोग गुणवंत निस्ताने यांनी "ब"ब ऐ्, उदद् श्देहग्हु ज्ज्हो' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. विक्रांत जाधव, सावित्री ज्योतिराव सोशल वर्क कॉलेज, यवतमाळ यांनी 'करिअरसोबत समाजासाठी योगदान' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यानंतर SGBAU Research & Incubation Foundation च्या संचालक डॉ. स्वाती एस. शेरेकर व श्री अमोल हिरुळकर यांनी 'Understanding Startups, Innovation, Incubation Ecosystem' या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सहाव्या व अंतिम दिवशी आर्थिक साक्षरतेवर मार्गदर्शन करण्यात आले. Avirat Financial Consultancy चे संचालक श्री. प्रभुराज बारबडे यांनी 'Evolving Landscape of Financial Investment Instruments' या विषयावर मार्गदर्शन केले.


त्यानंतर SSMITA चे प्रभारी संचालक प्रा. अमोल करमकर यांनी SGBAU MBA अभ्यासक्रमाची शैक्षणिक रचना, मार्गदर्शक तत्त्वे तसेच MBA व इतर कार्यक्रमांबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. 'Real Talk – MBA Edition' या संवादात्मक सत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या सत्रात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत MBA शिक्षणातील अनुभव व अपेक्षांवर संवाद साधला.

सहा दिवसांच्या या इंडक्शन कार्यक्रमामध्ये शैक्षणिक मार्गदर्शन, उद्योगभेट, करिअर नियोजन, संवादकौशल्य, टीमवर्क, आर्थिक साक्षरता, सामाजिक जबाबदारी, मानसिक स्वास्थ्य आणि स्टार्टअप व इनोव्हेशन यांचा समन्वय साधण्यात आला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना MBA प्रवासाची स्पष्ट दिशा मिळण्यासोबतच भविष्यातील व्यवस्थापन क्षेत्रातील जबाबदाऱ्यांची व्यापक जाणीव निर्माण झाली असे कार्यक्रम समन्वयक प्रा. वीरेंद्र ऑगस्टीन यांनी दिली.

# विद्यार्थिनीच्या गळयावर चाकूने वार

## -राम मेघे कॉलेज परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** कॉलेज सुटण्याच्या वेळेच्या आसपासचा परिसरात विद्यार्थ्यांची वर्दळ सुरू असतानाच एका विद्यार्थिनीवर अचानक चाकूने हल्ला झाल्याने राम मेघे कॉलेज परिसरात एकच खळबळ उडाली. डी. फार्मच्या द्वितीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थिनीच्या गळ्यावर तिच्याच परिचयातील विद्यार्थ्याने चाकूने वार केल्याची घटना मंगळवारी २९ सप्टेंबर रोजी दुपारी घडली. हल्ल्यानंतर जखमी विद्यार्थिनीला तातडीने रिम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी हल्लेखोराला पकडून बडनेरा पोलिसांच्या स्वाधीन केले. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, आरोपीचे नाव



नवीन मेघराज वनवानी असून तो आणि जखमी विद्यार्थिनी राम मेघे कॉलेजमध्ये डी. फार्मच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेतात. दोघांची पूर्वीपासून ओळख असल्याचे तपासात समोर आले आहे.

मंगळवारी दुपारी कॉलेज परिसरात विद्यार्थिनीवर अचानक





चाकूने हल्ला करण्यात आला. आरोपीने तिच्या गळ्यावर वार केल्याने ती जखमी झाली. घटनेनंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. आरडाओरड झाल्यानंतर नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत आरोपीला पकडले. यावेळी झालेल्या झटापटीत आरोपीच्या हातालाही दुखापत झाल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच बडनेरा पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. नागरिकांच्या ताब्यात असलेल्या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यानंतर हल्ल्यात वापरण्यात आलेला चाकूही पोलिसांनी तपासासाठी ताब्यात घेतला. जखमी विद्यार्थिनीला तातडीने रिम्स रुग्णालयात दाखल ☞(पान २ वर)

### ■ प्रेमसंबंधानंतर ब्रेकअप

प्राथमिक तपासात आरोपी आणि जखमी विद्यार्थिनीमध्ये पूर्वी प्रेमसंबंध असल्याची आणि त्यानंतर दोघांचे ब्रेकअप झाल्याची माहिती समोर आली आहे. ब्रेकअपनंतर आपण मानसिक तणावात होतो आणि दोन वेळा आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा दावा आरोपीने पोलिसांकडे केल्याची माहिती आहे. मात्र, आरोपीने केलेल्या या दाव्यांची पोलिसांकडून पडताळणी सुरू आहे.

## शिक्षक मतदार संघ निवडणुक :

# पहिल्या दिवशी ४४ नामनिर्देशन पत्रांची उचल

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची नामनिर्देशन प्रक्रिया आज मंगळवार, २९ सप्टेंबर पासून सुरू झाली आहे. विद्यमान सदस्य किरण सरनाईक यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर रोजी संपत असल्याने ही निवडणूक होत आहे.आज पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल झालेला नाही मात्र ४४ नामनिर्देशन अर्जाची उचल झाली आहे.आज सकाळी ११ ते दुपारी ३ वाजतापर्यंत विभागीय आयुक्त कार्यालयात ४४ नामानिर्देशपत्र उचलण्यात आले.पहिल्याच दिवशी विद्यमान आमदार किरण सरनाईक, माजी आमदार प्रा. श्रीकांत देशपांडे आणि अदिती पोहरे यांच्यासह प्रमुख उमेदवारांच्या नावाने अर्ज



उचलण्यात आले आहेत. मात्र पहिल्या दिवशी एकाही उमेदवाराने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला नाही.

७ ऑक्टोबर रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी होईल, तर उमेदवारी मागे घेण्याची अंतिम मुदत ९ ऑक्टोबर आहे. त्यामुळे अधिसूचना प्रसिद्ध होताच शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीच्या राजकीय हालचालींना वेग येणार आहे. मतदान २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत होणार असून, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी केली जाणार आहे. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम हे पाच जिल्हे येतात. मतदार नोंदणी प्रक्रियेसाठी विभागीय आयुक्त हे मतदार नोंदणी अधिकारी, जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी, तर तहसीलदार हे पदनिर्देशित अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकी साठी आहे. प्रशासनाची यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. २९ सप्टेंबर☞(पान २ वर)

# डॉक्टरांच्या हलगर्जीपणाने चिमुकलीचा बळी?

## वैद्यकीय अधिकाऱ्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

### -धारणी उपजिल्हा रुग्णालयातील प्रकार

**धारणी/प्रतिनिधीः-** वैद्यकीय यंत्रणेच्या गंभीर हलगर्जीपणामुळे आणि डॉक्टरांच्या बेजबाबदारपणाने पुन्हा एकदा एका चार वर्षांच्या चिमुकल्या मुलीचा बळी घेतल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. धारणी उपजिल्हा रुग्णालयात वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे चार वर्षीय युवानी ईश्वर जावरकर हिचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. चंद्रकांत तमेवार यांच्या विरुद्ध सोमवारी उशिरा रात्री सदोष




मनुष्यवधाचा गंभीर गुन्हा दाखल केला आहे. धारणी तालुक्यातील चिंचघाट येथील ईश्वर बालाराम जावरकर यांची चार वर्षीय मुलगी युवानी हिला प्रकृती अस्वास्थ्यामुळे १ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता धारणी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. रुग्णालयात उपचार सुरू असतानाच २ ऑगस्ट रोजी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास तिची प्रकृती अचानक खालावली. तिला श्वास घेण्यास त्रास होत असल्याचे लक्षात येताच वडिलांनी ड्युटीवरील परिचारिकेकडे धाव घेतली.

परिचारिकेने तत्काळ ड्युटीवरील वैद्यकीय अधिकारी डॉ. चंद्रकांत तमेवार यांना दूरध्वनीवरून माहिती दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. मात्र, डॉक्टर तत्काळ रुग्णालयात न आल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. तक्रारीनुसार, डॉक्टर सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास रुग्णालयात पोहोचले. या दरम्यान उपचारास विलंब झाल्याने युवानीचा मृत्यू झाल्याचा आरोप तिच्या वडिलांनी केला आहे.चिमुकलीच्या मृत्यूनंतर संतप्त झालेल्या ईश्वर जावरकर यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांकडे लेखी तक्रार करून संबंधित डॉक्टरांविरुद्ध ☞(पान २ वर)

# अन्सार नगरात अगरबत्ती कारखान्यात आगीचा भडका

## पाच हजार चौ.फुटांच्या कारखान्यात आगीचे लोळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** अगरबत्ती निर्मितीच्या कारखान्यात अचानक आगीचा भडका उडाल्याने अन्सार नगर परिसरात एकच धावपळ उडाली. सुमारे पाच हजार चौरस फुटांच्या कारखान्यात लागलेली आग काही वेळातच मोठ्या प्रमाणात पसरली. कारखान्यातील साहित्याने पेट घेतल्याने धुराचे लोट परिसरात पसरले होते. घटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली आणि शर्थीच्या प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आणली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.प्राथमिक माहितीनुसार, विद्युत शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. कारखान्यात अगरबत्ती निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य मोठ्या प्रमाणात असल्याने आगीने वेगाने पेट घेतल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे आग वाढण्याचा धोका निर्माण झाला होता. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. जवानांनी तातडीने पाण्याचा मारा सुरू करून आगीचा फैलाव रोखण्यास सुरुवात केली. कारखान्याच्या आतील भागात आग मोठ्या प्रमाणात असल्याने ती विझविताना जवानांसमोर आव्हान निर्माण झाले होते. मात्र, जवानांनी परिस्थितीवर नियंत्रण ठेवत आगीचे लोळ अन्य भागात पोहोचू दिले नाहीत. आग विझविण्याच्या कारवाईदरम्यान कारखान्याच्या



काही भागात पोहोचण्यासाठी अडचणी येत होत्या. त्यामुळे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे कर्मचारी आडे व त्यांचे सहकारी जेसीबीसह घटनास्थळी दाखल झाले. जेसीबीच्या सहाय्याने आवश्यक ठिकाणी अडथळे दूर करण्यात ☞(पान २ वर)

# शिक्षक महासंघाचे संस्थापक शेखर भोयर उमेदवारी अर्ज दाखल करणार

## आमदार किरण सरनाईकांवर लावले गंभीर आरोप

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीत बिघाडीचे संकेत मिळू लागले आहेत.भाजपचे सहसंयोजक तथा शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष शेखर भोयर यांनी येत्या ५ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती आज मंगळवार २९ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषदेमध्ये दिली आहे.


त्यांनी सांगितले की, पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनीच आपल्याला आधीपासून निवडणुकीच्या तयारीला लागण्याच्या सूचना दिल्या होत्या. यामुळे ते पूर्वीपासूनच निवडणुकीच्या कामाला लागलेले आहे. यावेळी भोयर यांनी विद्यमान आमदार किरण सरनाईक यांच्यावर जोरदार टीका केली. मागील सहा वर्षांत



शिक्षकांसाठी ठोस कामे झाली नसल्याचा आरोप करत मतदारांना साड्या वाटून आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचेही भोयर यांनी म्हटले.सरनाईक हे स्वतःच्या ताकदीवर निवडून येऊ शकत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. भाजपकडे उमेदवारी मागितल्याचा दावा ☞(पान २ वर)

# कौटुंबिक वादात अल्पवयीन मुलीसमोर अश्लील कृत्य

### -नागपुरी गेट हद्दीतील प्रकार



**अमरावती/प्रतिनिधीः-** घरातील वाद विकोपाला गेल्यानंतर अल्पवयीन मुलीसमोर अश्लील कृत्य केल्याचा धक्कादायक प्रकार नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीत समोर आला आहे. या प्रकरणी ५० वर्षीय व्यक्तीविरुद्ध नागपुरी गेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. १९ सप्टेंबर रोजी रात्री हा प्रकार घडल्याचे तक्रारीत नमूद आहे.

पोलिसांकडे दाखल तक्रारीनुसार, संबंधित कुटुंबीयांमध्ये पूर्वीपासून वाद होत असल्याचे सांगण्यात आले आहे. मार्च महिन्यापासून हे कुटुंब अमरावतीत राहत होते. आरोपी दारूच्या नशेत घरी येऊन कुटुंबीयांशी वाद घालत तसेच शिवीगाळ करीत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. १९ सप्टेंबर रोजी रात्री आरोपी दारूच्या नशेत घरी आला. त्यानंतर त्याचा अल्पवयीन मुलीच्या आईसोबत वाद सुरू झाला. वाद वाढत गेल्याने मुलगी आणि तिचा भाऊ हा प्रकार थांबविण्यासाठी मध्ये पडले. ☞(पान २ वर)

# मेळघाटातील पाच हजार मुलांकडे जन्म प्रमाणपत्रच नाही

## गांधी जयंतीला दुर्गम गावात शिबीर घेण्याची मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या तब्बल पाच हजार मुलांकडे जन्म प्रमाणपत्र उपलब्ध नाही. यात त्यांचा कोणताही दोष नाही. अशा परिस्थितीत या मुलांना आणि त्यांच्या पालकांना दिलासा देण्यासाठी आगामी २ ऑक्टोबरला गांधी जयंतीच्या दिवशी दुर्गम गावांमध्ये विशेष शिबीर लावून जन्म प्रमाणपत्र देण्यात यावे, अशी मागणी आज मंगळवार २९ सप्टेंबर रोजी दुपारी आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आली आहे. काटकुंभ येथील सरपंच ललिता बेठेकर यांनी सांगितले की, जन्म प्रमाणपत्र नसल्यामुळे विविध शासकीय सुविधांपासून ही मुले वंचित राहत आहेत. आधार कार्डमुळे सुविधा मिळतात,मात्र जन्म प्रमाणपत्र नसल्याने आधार कार्डच बनत नाहीत. आदिवासी आणि इतर समाजातील लोकांना जन्म प्रमाण☞(पान २ वर)

# १ ऑक्टोबरला गणेश विसर्जन मिरवणुकीमुळे वाहतूक व्यवस्थेत बदल

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील न्यू आझाद गणेश मंडळाच्या गणपती विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर १ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३ ते रात्री १० या वेळेत वाहतूक वळवण्यात आली असून प्रमुख मार्गांवर 'नो-एन्ट्री' लागू करण्यात आली आहे.पोलीस उपायुक्त प्रांजली सोनवणे यांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी २८ सप्टेंबर रोजी हे आदेश जारी केले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे



आदेशात म्हटले आहे. या आदेशानुसार गर्ल्स हायस्कूल चौकाकडून इर्विन चौकाकडे जाणारी वाहने पोलीस पेट्रोल पंपमार्गे बस स्टँडकडे, तर बाबा कॉर्नरकडून येणारी वाहतूक ☞(पान २ वर)

# मंदिर विश्वस्तांचे राज्यस्तरीय महासंमेलन ३ ऑक्टोबरला

## पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्राच्या मंदिर संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन, देवस्थानच्या संपत्ती आणि इनाम जमिनींची सुरक्षा तसेच मंदिर संस्थांचे पारदर्शक आणि प्रभावी व्यवस्थापन या उद्देशाने राज्यस्तरीय मंदिर विश्वस्ताचे महासंमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. महाराष्ट्र देवस्थान समिती आणि धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ३ ऑक्टोबर रोजी जनार्दन पेठ येथील एकवीरा देवी मंगल कार्यालयात सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत हे महासंमेलन आयोजित करण्यात आले असल्याची माहिती आयोजक कैलास कुमार पनपालिया यांनी आज मंगळवार २९ सप्टेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



कैलास कुमार पनपालिया म्हणाले की, या संमेलनाचे उद्घाटक म्हणून महाराष्ट्राचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे उपस्थित राहणार आहेत.संमेलनात धर्मादाय आयुक्त अमोष कलोती यांच्या सह धर्मादाय आदि उपस्थित राहणार आहेत. सध्याच्या परिस्थितीत मंदिरे आणि देवस्थान संस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.जमीन व संपत्तीचे संरक्षण,संस्थेचे व्यवस्थापन, हिशेब आणि लेखापरीक्षण, आवश्यक कागदपत्रे,मंदिर विकास, धार्मिक उपक्रम धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी समन्वय या सर्व विषयांवर तज्ज्ञ आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून विश्वस्तांना कायदेशीर व प्रशासकीय मार्गदर्शन दिले जाणार आहे. 'अनेक मंदिर - एक संघटना, एक दिशा' या संकल्पनेवर आधारित या संमेलनात विश्वस्त आपल्या मंदिरांच्या समस्या, सूचना आणि अनुभव मांडू शकणार आहेत.आयोजकांनी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील मंदिरांचे अध्यक्ष, विश्वस्त, सचिव, पदाधिकारी ☞(पान २ वर)

# पेठ इतबारपूर शेतशिवारात बिबट्यामुळे दहशत

## ग्रामस्थ धडकले दर्यापूर पोलीस ठाण्यात



**खल्लार/प्रतिनिधीः-** पेठ इतबारपूर परिसरातील शेतशिवारात बिबट्या सदृश प्राणी आढळल्याची माहिती समोर आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. प्राणी दिसल्याची माहिती मिळताच ग्रामस्थांनी सतर्क होत दर्यापूर पोलीस ठाण्यात धाव घेतली.

दरम्यान, घटनेची माहिती पोलिसांनी वन विभागाला दिली असून, वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन पाहणी करणार आहेत. या प्राण्याचा नेमका प्रकार कोणता, याबाबत वन विभागाच्या पाहणीनंतरच स्पष्टता होणार आहे. शेतशिवारात बिबट्या सदृश प्राणी आढळल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता सतर्कता बाळगण्याचे आवाहन ठाणेदार अजित राठोड यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# एसआयआर प्रक्रियेत भाजप गटनेत्याचा दारू पिऊन गोंधळ

### -निवडणूक प्रक्रियेत व्यत्यय

### -चांदूर रेल्वेतील बूथ क्र. ८० वरील प्रकाराने खळबळ

### -काँग्रेसच्या बीएलएकडून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तक्रार

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान चांदूर रेल्वे शहरातील सुभाष शाळेतील बूथ क्र. ८० वर वाद निर्माण होऊन निवडणूक प्रक्रियेत व्यत्यय आल्याचा आरोप करण्यात आला आहे. भाजपचे नगरपरिषद गटनेते निलेश उर्फ पप्पू भालेराव यांनी दारू पिऊन बूथवर येऊन बीएलओ व उपस्थित मतदारांशी आक्षेपार्ह पद्धतीने वर्तन केल्याचा दावा काँग्रेस पक्षाच्या बीएलएकडून करण्यात आला असून, याप्रकरणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. काँग्रेसचे प्रदेश



महासचिव परिक्षित जगताप यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षाचे बीएलए मोहम्मद अकबर अब्दुल अजीज व इतरांनी ही तक्रार दाखल केली.

२८ सप्टेंबर रोजी एसआयआर नोटीस प्रक्रियेचे काम सुरू असताना निलेश उर्फ पप्पू भालेराव बूथवर आले. त्यांनी बीएलओकडून नागरिकांची कागदपत्रे स्वीकारण्याबाबत आक्षेप घेत, काही कागदपत्रे खोटी असल्याचे ☞(पान २ वर)

### ■ मी दारू प्यायलो नव्हतो- भालेराव

दरम्यान, या आरोपांवर भाजपचे गटनेते निलेश उर्फ पप्पू भालेराव यांनी प्रतिक्रिया देतांना म्हटले की, सुभाष शाळेतील एसआयआर नोटीस प्रक्रियेदरम्यान टीसी नसलेले अथवा अपूर्ण कागदपत्र असलेल्या व्यक्तींचे फॉर्म स्वीकारले जात असल्याची माहिती मिळाल्याने मी तेथे गेलो होतो. 'मी भाजपचा गटनेता तसेच पक्षाचा बीएलए असल्याने मला त्या ठिकाणी जाण्याचा पूर्ण अधिकार होता. चुकीचा प्रकार आढळल्यामुळे मी स्वतः पोलिसांना तसेच इतर नगरसेवकांना बोलाविले. तसेच 'मी दारू प्यायलो होतो, हा आरोप खोटा आहे. माझ्याकडून काही चुकीचे झाले असेल तर त्याच दिवशी माझ्याविरुद्ध तक्रार का केली नाही ?', असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

# तरुणाच्या मृत्यूनंतर गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह विद्युत डेकोरेशन ठेकेदारावर गुन्हा दखल

**परतवाडा/प्रतिनिधीः-** गणेशोत्सवाच्या सजावटीसाठी उभारलेल्या लोखंडी चौकटीत विद्युत प्रवाह आल्याने तरुणाचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणात परतवाडा पोलिसांनी गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह विद्युत डेकोरेशन व फिटिंग करणाऱ्या ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

१३ सप्टेंबर रोजी सायंकाळी सदर बाजार परिसरातील राम मंदिरासमोर ही घटना घडल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. संजय देविदास पवार (रा. खरपी, ता. अचलपूर) यांचा मुलगा घरी जात असताना मंडळाच्या सजावटीसाठी उभारलेल्या लोखंडी चौकटीला त्याचा हात लागला.

त्यावेळी चौकटीत विद्युत प्रवाह असल्याने त्याला विजेचा धक्का बसल्याचे फिर्यादीत नमूद आहे. शॉक लागल्यानंतर तरुण बेशुद्ध पडला. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. घटनेनंतर वडील संजय पवार यांनी पोलिसांकडे दिलेल्या जबानीवरून परतवाडा पोलिसांनी गुन्हा क्रमांक ६९१/२०२६ नोंदविला. भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(१), १२५, १२५(ई) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह विद्युत डेकोरेशन आणि फिटिंगचे काम करणाऱ्या ठेकेदाराचा समावेश करण्यात आला आहे. सजावटीची विद्युत जोडणी करताना आवश्यक खबरदारी घेण्यात आली होती का, लोखंडी चौकटीत विद्युत प्रवाह कसा आला आणि घटनेमागील नेमकी कारणे कोणती, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.